08-06-2009 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A-1

RDB/ MMP/ KGS 11:00

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. हेमंत टकले )**

**पृ. शी.** : इयत्ता अकरावीची प्रवेश प्रक्रिया ऑन लाईन पध्दतीने करण्याच्या निर्णयामुळे निर्माण झालेली परिस्थिती

**मु. शी.** : इयत्ता अकरावीची प्रवेश प्रक्रिया ऑन लाईन पध्दतीने करण्याच्या निर्णयामुळे निर्माण झालेली परिस्थिती या विषयावर डॉ. दीपक सावंत, सर्वश्री दिवाकर रावते, अरविंद सावंत, डॉ. नीलम गोऱ्हे, ॲड. अनिल परब, सर्वश्री सुरेश जेथलिया, किरण पावसकर, गोपीकिसन बाजोरिया, परशुराम उपरकर, किशनचंद तनवाणी, रणजितसिंह मोहिते-पाटील, जितेंद्र आव्हाड, प्रा. फौजीया खान, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा

**तालिका सभापती ( श्री. हेमंत टकले )** : या अल्पकालीन चर्चेसंबंधी औपचारिक प्रस्ताव मांडता येणार नाही. या चर्चेसाठी मी 11.00 ते 11.55 वाजेपर्यंतचा वेळ दिलेला आहे. सूचना देणारे सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत आपली सूचना वाचतील आणि भाषण करतील.

डॉ. दीपक सावंत ( मुंबई विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, माझी आपल्याला विनंती आहे. आपण या अल्पकालीन चर्चेसाठी दिलेला सकाळी 11.00 ते 11.55 वाजेपर्यंतचा वेळ अतिशय कमी आहे. हा विषय महत्वाचा असून या विषयाची व्याप्ती मुंबई पासून रायगडपर्यंत आहे. म्हणून या चर्चेसाठी थोडा वेळ वाढवून देणे आवश्यक आहे. या विनंतीचा आपण सहानुभूतीपूर्वक विचार करावा.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी चर्चेला सुरुवात करावी. त्यानंतर गरज पडल्यास याबाबत निर्णय घेता येईल.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय. माननीय मंत्रिमहोदयांचे उत्तर जर दुपारी झाले तर या चर्चेची लिंक तुटेल. त्यामुळे ही चर्चा सलग घेणे आवश्यक आहे. मी माननीय मंत्रिमहोदयांनाही विनंती केलेली आहे. आपण याबाबत विचार करावा अशी माझी विनंती आहे.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी चर्चेला सुरुवात करावी.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मी नियम 97 अन्वये आपल्या अनुमतीने पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो :-

" जून 2009 च्या शैक्षणिक वर्षापासून इयत्ता अकरावीचे प्रवेश त्या त्या महाविद्यालयांतून देण्याची असलेली प्रचलित पध्दत यावर्षी शासनाने रद्द करुन त्याऐवजी आता ऑन लाईन प्रवेश सुरु केलेली असणे, परंतु सदर ऑन लाईन प्रवेश प्रक्रियेमध्ये अनेक त्रुटी असल्याने सारासार विचार न करता राबविलेल्या या पध्दतीमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणे, 80 टक्के विद्यार्थ्यांकडे इंटरनेटची सुविधा नसल्याने ऑन लाईन प्रवेश अर्ज भरण्याकरिता हजारो विद्यार्थ्यांना इंटरनेट सुविधांसाठी सायबर कॅफे अथवा संगणक सुविधा क्लासेसमध्ये महागडी प्रवेश फी भरुन जावे लागणे, त्यासाठी त्यांना फी भरुन ऑन लाईन प्रवेश घेण्यासाठी रांगा लावाव्या लागणे, ऑन लाईन प्रवेश पध्दतीमध्ये मुंबईतील 669 महाविद्यालयांमधील शाखा निवडताना विक्षर्थ्यांना होणारा नाहक त्रास, तसेच ऑन लाईन प्रवेश महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी नाकारल्यास मग विद्यार्थ्यांनी काय करावे तसेच 70-30 प्रवेशाबाबत काय निर्णय आहे, याबाबत संभ्रम निर्माण होणे, ऑन लाईन प्रवेशाबाबत प्राचार्यांचाही विरोध असून प्रवेशाबाबत विद्यार्थ्यांत व पालकांत मुळीच जागृती नसल्याने लाखो विद्यार्थ्यांच्या प्रवेशाच्या घोळामुळे व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही याबाबत मार्गदर्शन मिळत नसल्याने विद्यार्थ्यांमध्ये, पालकांमध्ये व जनतेमध्ये निर्माण झालेला संभ्रम, परिणामी ऑन लाईन प्रवेश प्रक्रियेबाबत पसरलेला तीव्र असंतोष व संतापाची लाट लक्षात घेता शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

सभापती महोदय, आपण या अतिशय महत्वाच्या आणि मुंबईकराच्या तसेच मुंबईच्या आजूबाजूच्या एमएमआरडीए परिसरातील सर्व लोकांच्या, विशेषत: विद्यार्थ्यांच्या आणि पालकांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नाबाबत चर्चा उपस्थित करण्यास परवानगी दिली त्याबद्दल सर्वप्रथम मी आपले आभार मानतो. सध्या आपण जर पाहिले तर या ऑन लाईन प्रवेश पध्दतीच्या बाबतीत प्रत्येक वर्तमानपत्रांचे मथळे झळाळून निघत आहेत. या ऑन लाईनच्या चक्रव्युहामध्ये माननीय मंत्रिमहोदय सापडलेले आहेत. त्यांची परिस्थिती अभिमन्युसारखी झालेली आहे. या चक्रव्युहामध्ये विद्यार्थी

...3...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ KGS

डॉ. दीपक सावंत ....

सापडलेले आहेत तसेच पालकही सापडलेले आहेत. या चक्रव्युहामध्ये ते शिरले परंतु त्यातून बाहेर कसे पडावयाचे याची त्यांना अजूनही काळजी वाटते हे मी दाव्याने सांगतो.

सभापती महोदय, जून 2009 च्या शैक्षणिक वर्षासाठी इयत्ता अकरावीचे प्रवेश ऑन लाईन पध्दतीने करावे असा तथाकथित धाडसी निर्णय माननीय मंत्रिमहोदयांनी घेतला त्याबद्दल मी त्यांचे स्वागत करतो. कारण अशा प्रकारच्या आधुनिकीकरणाकडे आपण जावयास पाहिजे. परंतु याबाबतीत जी कारणमीमांसा दिलेली आहे ती मजेशीर आहे. आपण या प्रयोगात का सापडलो याबाबत त्यांनी असे म्हटले आहे की, विद्यार्थ्यांना इयत्ता दहावी पास झाल्याबरोबर प्रवेशासाठी लांबच्या लांब रांगा लावाव्या लागतात तसेच तासन तास रांगेत तिष्ठत उभे राहावे लागते. पालकांना आठ-आठ दिवस सुट्टया घ्याव्या लागतात. आई-वडील देखील या सर्व कार्यक्रमासाठी हजर राहतात. त्यानंतर फॉर्म घेणे, विविध कॉलेजेसमध्ये जाऊन फॉर्म भरणे आणि ब्रोशर व फॉर्मसाठी मोजावी लागणारी किंमत अशी कारणे दिलेली आहेत. प्रत्येक आई-वडिलांना असे वाटते की, आपला मुलगा अतिशय उत्तम दर्जाच्या कॉलेजमध्ये जावा, जवळपासच्या कॉलेजमध्ये जावा. कॉलेजेसमध्ये जी मेरीट लिस्ट लावतात त्यामध्ये ट्रान्स्परंसी नसते. 5 टक्के मॅनेजमेंट कोटा असतो. अनेक वशिल्याचे लोक त्यामध्ये असतात अशी कारणमीमांसा दिलेली आहे. त्यानंतर जी मेरीट लिस्ट लावली जाते ती पाहण्यासाठी विद्यार्थ्यांना धक्काबुक्की करावी लागते. पहिली मेरीट लिस्ट, दुसरी मेरीट लिस्ट, तिसरी मेरीट लिस्ट अशा पध्दतीने पाचव्या मेरीट लिस्ट पर्यंत काही कॉलेजेस जातात. यामध्ये विद्यार्थ्यांना त्रास होतो असे त्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे आपण हा धाडसी प्रयोग केला. या गोष्टी जरी खऱ्या असल्या तरी दुसऱ्या बाजूने पालकांना याबाबतीत एक अतिशय जिज्ञासा असते की, माझा मुलगा चांगल्या कॉलेजमध्ये कसा जाईल ? याबाबत पालकांमध्ये अहमहमिका, स्पर्धा लागलेली असते. याबाबतीत मित्रामित्रांमध्ये स्पर्धा असते. त्यामुळे आनंदाने इतकी वर्षे ते हा त्रास सहन करीत होते. म्हणून त्यांना माननीय मंत्रिमहोदयांनी ऑन लाईनच्या लाईनमध्ये टाकलेले आहे. परंतु विद्यार्थी ऑन लाईनच्या लाईनमधून सुटणार नाही. लाईन त्यांच्या नशिबात कायम राहणार आहे. या ऑन लाईनची ऑफ लाईन कशी होईल हे कोणी सांगू शकणार नाही.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत....

सभापती महोदय, नैसर्गिक आपत्ती आपल्याला सांगून येत नाही. तसेच या सायन्स युगाचे आहे. कधी इंटरनेट, ब्रॉड बॅण्ड डाऊन होईल, इंटरनेटमध्ये ॲक्सेस कधी मिळेल हे सांगता येत नाही. आज महाराष्ट्रामध्ये अनेक इंटरनेट प्रोव्हायडर्स आहेत. त्यामध्ये एमटीएनएल, टाटा, आयओएल, हॅथवे, इनकेबल, रिलायन्स, आयकॉन या कंपन्यांचा समावेश आहे. या कंपन्यांचे 63 लाख सबस्क्रायबर्स आहेत. ही संख्या मोठी आहे. त्यामध्ये आता निरनिराळया माध्यमातून 2.50 लाख सबस्क्रायबर्सना समाविष्ट केले जाणार आहे. विद्यार्थ्यांच्या भविष्यावर बेतणारा हा प्रयोग आहे असे मला वाटते. यासंबंधी मंत्रिमहोदयांनी खुलासा करावा. शासन ज्या भागासाठी हा प्रयोग करीत आहे, त्या भागातील भौगोलिक परिस्थिती, सामाजिक परिस्थिती शासनाने विचारात घेतली आहे काय ? त्या भागातील शाळा, केंद्रांची संख्या आणि सगळयात महत्वाचे सध्याचे भारनियमन विचारात घेतले आहे काय ? आज मुंबईतील भांडूप, मुलुंड या भागापासूनच भारनियमनला सुरुवात होते. सकाळी 8 वाजल्यापासून मदत केंद्रे झाल्यावर ती संध्याकाळी 5 वाजेपर्यंत सुरु राहणार आहेत. परंतु या मदत केंद्रात काम करणारे एन.जी.ओ.नाहीत. ते सकाळी 10 ते 5 वाजेपर्यंत काम करणारे सरकारी नोकर आहेत. त्यांची वेळ संपल्यानंतर ते काम बंद करतील. त्याच काळात वीज नसेल तर पर्यायी व्यवस्था काय केली आहे ? शासनाने यासंदर्भात परिपत्रक काढले आहे. सर्व केंद्रामध्ये जनरेटर वा इन्व्हर्टर लावले पाहिजे असा या परिपत्रकात दम दिलेला आहे. अशाप्रकारचे परिपत्रक 100 शाळांना, कनिष्ठ महाविद्यालयांना पाठविलेले आहे. मागे हायकोर्टाने व सुप्रीम कोर्टाने सुध्दा परीक्षेच्या कालावधीत सर्व वर्गांमध्ये विजेची व्यवस्था केली पाहिजे, वर्गात एक पंखा असावयास पाहिजे असे सरकारला निदेश दिले होते. या निदेशांचे सरकारकडून पालन होत आहे काय ? आताच्या निर्णयासंबंधी अनेक भागातील पालकांचे म्हणणे आहे की, सरकार असा अट्टाहास का करीत आहे ? सरकार सर्व भागासाठी वीज पुरवू शकलेले नाही, ही वस्तुस्थिती असताना अकरावीची प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन करणे म्हणजे विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळण्यासारखे होणार आहे.

2...

NTK/ KGS/ MMP/

डॉ.दीपक सावंत....

सभापती महोदय, झोपडपट्टीत राहणाऱ्या लोकांना ऑनलाईन ॲडमिशन म्हणजे काय हे माहीत आहे काय, ऑनलाईनद्वारे प्रवेश घेण्याची विद्यार्थ्यांची व पालकांची मानसिकता आहे काय ? त्यांच्यापर्यंत ऑनलाईनचा संदेश गेलेला नाही, त्यामुळे ही संकल्पनाच अपयशी ठरलेली आहे. सन्माननीय मंत्रिमहोदयांनी मला सांगावे की, या विभागाशी संबंधित असलेले संचालक, सहसंचालक वा उपसंचालक यांना संगणक प्रणालीसंबंधी काही माहिती आहे काय ? मंत्रालय, मुंबई महानगरपालिकेचा कारभार पेपरलेस करण्याचा निर्णय झालेला आहे. परंतु आजही कोणतेही काम हाती घ्यावयाचे असेल तर आपण कागद व पेन घेऊन बसतो ना ? मग त्या झोपडपट्टीतील लोकांना याची माहिती होईल काय ? शासनाने कदाचित दक्षिण मुंबईला लक्ष्य केले असेल, दादर भागाला लक्ष्य केले असेल तर त्याबाबत काही म्हणावयाचे नाही. परंतु ठाणे, रायगड, अलिबाग यासारख्या भागासाठी शासन कोणती व्यवस्था करणार आहे ? मुंबईत धारावीत सर्वात मोठीझ ोपडपट्टी आहे, सांताक्रुझला आहे, वांद्रे या उपनगरामध्ये आहे. येथे राहणा-या विद्यार्थ्यांची काय सोय केली आहे ? स्लम डॉगच्या मुलांना टी.व्ही.वर मुलाखतीसाठी आणले होते. परंतु त्या मुलांना कॉम्प्युटरचे ज्ञान आहे काय ? मंत्रिमहोदयांनी एकरावीची प्रवेश प्रक्रिया ऑनलाईनद्वारे सुरु करण्याची घोषणा केली त्याचदिवशी मी 'सामना' या वर्तमानपत्रातून सांगितले होते की, सरकारला हा प्रयोग करावयाचा असेल तर जरुर करावा, परंतु त्याचबरोबर ऑफलाईन म्हणजे फॉर्मद्वारे सुध्दा प्रवेश प्रक्रिया सुरु ठेवावी. त्याचप्रमाणे शिवसेनेच्या शिष्टमंडळाने एक निवेदन सादर करुन शासनाला 29 प्रश्नांचा समावेश असलेली प्रश्नावली दिली होती. त्यासोबत प्रिंटेड फॉर्म दिला होता. शासनाने ही नवीन पध्दत सुरु करावी, त्याचे स्वागत आहे. परंतु या प्रश्नांचा सुध्दा त्यात समावेश करावा असे त्या निवेदनात म्हटले होते. परंतु आजही त्या प्रश्नांची उत्तरे मिळालेली नाहीत.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

(डॉ. दीपक सावंत...

सभापती महोदय, एस.एस.सी. बोर्डाचे अडीच लाख विद्यार्थी पास होतात. 669 कॉलेजेस आणि ज्युनिअर कॉलेजेस आहेत. तसेच मुंबईबाहेरच्या सी.बी.एस.ई. आणि आय.सी.एस.ई. अशा सारख्या बोर्डाचे 34 हजार विद्यार्थी असतात. म्हणजे एकूण विद्यार्थ्यांची संख्या जवळ जवळ 2.75 लाखापर्यन्त जाते. या मध्ये समाजाचा फार मोठा वर्ग सहभागी आहे, तितकेच पालक, तितकेच नातेवाईक सहभागी आहेत. या सर्वांना आपण या ऑनलाईनच्या माध्यमातून वेठीला धरलेले आहे. माननीय मंत्री महोदयांनी जी.आर. काढला. "सन 2009-10 या शैक्षणिक वर्षापासून मुंबई, ठाणे, रायगड जिल्ह्यातील तसेच मुंबई महानगरपालिका प्राधिकरण क्षेत्रातील इयत्ता अकरावीचे प्रवेश ऑनलाई करण्याबाबत" अशा प्रकारचा जी.आर. आहे. या जी.आर.नुसार सी.बी.एस.ई. आणि आय.सी.एस.ई. या बोर्डातील विद्यार्थ्याचे काय करणार ? मंत्री महोदयांनी या सर्व विद्यार्थ्यांच्या गुणांचे समानीकरण करण्याची घोषणा केली. ती घोषणा हवेत विरुन गेली. ती घोषणा अंमलात येत नाही. मग या पावणेतीन लाख विद्यार्थ्यांच्या प्रवेशाच्या बाबतीत आपण काय करणार आहात ? सी.बी.एस.ई. आणि आय.सी.एस.ई या बोर्डाच्या पदाधिका-यांनी माननीय मंत्री महोदयांनी बोलाविलेल्या बैठकीला येण्याचे नाकारले. बैठकीला डेस्क ऑफिसरच्या रँकचा माणूस आला. ते बोर्ड आपल्याला कशातच मोजत नाही. असे असताना या सी.बी.एस.ई. आणि आय.सी.एस.ई बोर्डाना पटापट एनओसी दिल्या जातात. त्या बोर्डाच्या विद्यार्थ्यांना किती गुण मिळालेले आहेत ? माझ्या माहितीप्रमाणे त्या बोर्डाच्या सुमारे 10 हजार विद्यार्थ्यांना 85 ते 95 टक्के गुण मिळाले आहेत. हे 10 हजार विद्यार्थी आमच्या डोक्यावर येऊन बसणार आहेत. आमच्या एस.एस.सी. बोर्डामध्ये 92 टक्के, 93 टक्के गुण मिळविणारे विद्यार्थी हाताच्या बोटावर मोजण्याइतके असतात. मग एस.एस.सी. बोर्ड बंद करा आणि सी.बी.एस.ई. आणि आय.सी.एस.ई बोर्डाच्या शाळा सुरु करा. एस.एस.सी. बोर्डाची गरजच काय ? सभापती महोदय, मी आणि सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील आम्ही दोघांनी प्रवेश प्रकियेच्या संदर्भात पर्सेण्टाईलचे सुतोवाच केले होते. परंतु त्या विषयी आपण काहीच केले नाही. आता ऑन लाईनच्या माध्यमातून या विद्यार्थ्यांचे आपण काय करणार आहात ? सभापती महोदय, हे ऑन लाईनचे काम कुणाला दिलेले आहे ? आपण कधी ऐकलेली नाही अशा महाराष्ट्र नॉलेज कार्पोरेशन लिमिटेड या टेक्निकल संस्थेला हे काम

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ. दीपक सावंत...)

दिलेले आहे. हे एमकेसीएल महाराष्ट्र पेट्रोकेमिकल कार्पोरेशन प्रमाणे आहे. हे एमपीसील अडीच लोकांचे आहे. तसेच हे एमकेसीएल आहे. या एमकेसीएलकडे टेक्निकल टीम आहे काय ? मी हा प्रश्न माननीय मंत्री महोदयांच्या बैठकीतही विचारला होता. परंतु त्या प्रश्नाचे उत्तर दिले गेले नव्हते. आपण ऑन लाईन सेवा देण्यास निघाला आहात. परंतु आपण जे शिवधनुष्य उचलायला निघाला आहेत ते तुमच्या छाताडावर पडले आहे. आपण त्याखाली चिरडला आहात. आपणाप्रमाणेच आता विद्यार्थी आणि पालक हे सुध्दा त्याखाली चिरडून जातील. ज्या संस्थेला आपण कॉण्ट्रॅक्ट देत आहात त्या संस्थेचे बॅक-रेकॉर्ड आपणास माहीत आहे काय? माझ्या माहिती प्रमाणे शासनाकडून जे तीन कॉण्ट्रॅक्ट गेले होते ते ती संस्था पूर्ण करु शकली नाही. अशी या एमकेसीएलची कार्यक्षमता आहे. आपण सुरुवातीला असे सांगितले की, या एमकेसीएलच्या माध्यमातून एक हजार मदत केन्द्रे उघडली जाणार आहेत. असे असताना आज मंत्री महोदय बॅकफूटवर गेले आहेत. आपण आता सांगता की, ज्युनिअर कॉलेजेस आणि शाळा ही मदत केन्द्रे केली जाणार आहेत. एमकेसीएल मार्फत हजार केन्द्रे उघडली जाणार आहेत अशी आपली घोषणा होती.....

श्री. मधुकर चव्हाण : आम्हाला त्यावेळी विश्वासात घेतले नाही. नंतर आम्हाला मंत्री महोदय बोलविणार होते....

...नंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MMP/ KGS/ प्रथम श्री. शिगम 11:15

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, सरकार काय करीत आहे, यातून सरकारने कसा मार्ग काढला आहे याबाबतीत मी थोडक्यात सांगू इच्छितो. सुप्रीम कोर्टाच्या नियमानुसार विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याचा व न देण्याचा अधिकार प्राचार्याना आहे. अशा प्रकारचा निर्णय काही वर्षापूर्वी या रज्यात झालेला आहे. सरकारने काय केले की, एम.के.सी.एल.ला मध्ये आणले आणि फसिलिटेटर अशी एक संज्ञा घेतली. या संदर्भात कोणी कोर्टात गेले असते तर हे प्रकरण ठप्प झाले असते. म्हणून सरकारने अत्यंत हुशारीने एम.के.सी.एल.ला फसिलिटेटर केले. यात एम.के.सी.एल.चा नेमका रोल काय आहे ? या बाबतची माहिती माननीय शिक्षण मंत्र्यांनी सभागृहाला समजावून सांगावी. माझ ी माननीय शिक्षण मत्र्यांना नम्र विनंती आहे की, पात्रता नसलेल्या कॉर्पोरेशनला विद्यार्थ्यांचे भवितव्य त्यांच्या हाती देऊन अतिशय क्रूर चेष्ठा सरकारने चालविली आहे. आता मी मुख्य मुद्याकडे वळतो. ऑट, कॉर्मस, सायन्स या फॅकल्टीजचा फक्त सरकार विचार करीत आहे. सरकारकडून होकेशनल, होमसायन्स आणि बायफोकल यांचा विचार केला जात नाही. परंतु सदरचे शिक्षण घेणारी देखील अनेक विद्यार्थी आहेत. अनेक मेरीट लिस्टेड विद्यार्थी होकशनल, होमसायन्स, बायफोल या संबंधीचे शिक्षण घेणारी अनेक विद्यार्थी आहेत. परंतु या शिक्षणाच्या बाबतीत सरकारने काढलेल्या परिपत्रकात कुठेही उल्लेख दिसून येत नाही.

सभापती महोदय, प्रवशासंबंधीचे फॉर्म विद्यार्थ्यांना ऑन लाईनने भरावयाचे आहेत. मुंबई किती लोकांकडे संगणक आहेत याची माननीय शिक्षण मंत्र्यांनी चौकशी केली आहे काय ? किती शाळांमध्ये संगणक कार्यरत आहेत याची चौकशी केली आहे काय ? किती शाळांमध्ये इंटरनेट कनेक्शन उपलब्ध आहेत याची माहिती माननीय मंत्री महोदयांनी घेतली आहे काय ? माझी अशी माहिती आहे की, देशामध्ये फक्त 15 टक्के लोकांकडे संगणक उपलब्ध आहेत. मी जी टक्केवारी सांगितली ती 2007-08 या कालावधीची आहे. त्यात काही प्रमाणात वाढ झाली असेल. संपूर्ण महाराष्ट्रात माझ्या माहितीप्रमाणे 30 टक्के लोकांकडे संगणक उपलब्ध आहेत आणि त्यातील 15 टक्के लोकांकडे इंटरनेट कनेक्शन उपलब्ध आहेत. आय.डी., पासवर्ड हे शब्द झोपडपट्टीतील विद्यार्थ्यांना समजतील काय ? ते शब्द त्या विद्यार्थ्यांना अवगत करुन देण्यासाठी सरकारला खूप वेळ लागणार आहे. सरकारने 400 ते 800 ते शाळा नोटीफाय केल्या आहेत. त्यातील किती शाळांकडे संगणक उपलब्ध आहेत याची माहिती शिक्षण मंत्री या सभागृहात देऊ शकतील काय ?

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत...

प्रत्येक ठिकाणी संगणक असला तरी त्या शाळेत एक संगणक असून चालणार नाही. एका शाळेत जवळपास चार तुकडया असतात. या चार तुकडयात साधारणतपणे 200 विद्यार्थी होतात. प्रत्येक शाळेत 200 विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया सात दिवसात पूर्ण करावयाची आहे. ही प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी नोटीफाय केलेल्या शाळांमध्ये कर्मचारीवर्ग उपलब्ध आहे काय ? जर त्या शाळांमध्ये या कामासाठी कर्मचारी नसतील तर दुसरीकडचा कर्मवारीवर्ग तिकडे तात्पुरत्या स्वरुपात वर्ग करणार आहात काय ? ही प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी वेगळारी वर्ग नेमणार आहात काय ? या गोष्टीचा माननीय शिक्षण मंत्र्यांनी खुलासा करावा.

सभापती महोदय, तिसरा मुद्दा असा आहे की, आपण प्रवेश प्रक्रियेसाठी ज्या शाळा नोटीफाय केल्या आहेत, त्यांच्याकडे इंटरनेटची सुविधा उपलब्ध आहे काय ? विद्यार्थ्यांनी ऑन लाईन प्रवेश अर्ज भरताना कॉलेजचा कोड लिहावयाचा आहे. कॉलेजचा कोड लिहीणे व त्या अनुषंगीक गोष्टी अतिशय क्लिष्ट आहेत. सरकार ज्या माध्यमातून काम करीत आहे ती पध्दत बरोबर आहे. परंतु आपले लोक या गोष्टीला हॅबिच्युएल झालेले नाहीत ही वस्तुस्थिती आहे. काल यांनी मॉप ड्रील घेतली. एकाच वेळी हजारो विद्यार्थी संकेतस्थळावरती गेल्यानंतर काय होणार ? काल दुपारपर्यंत तीन ते साडेतीन हजार विद्यार्थी संकेतस्थळावर गेले होते. साडेतीन हजार विद्यार्थ्यांनी लॉगिंग केले अशा प्रकारचा रिपोर्ट माझ्याकडे उपलब्ध आहे. प्रवेश घेणारे कोठे तीन लाख विद्यार्थी, कोठे अडीच लाख विद्यार्थी आणि कोठे तीन हजार विद्यार्थी याचा समन्वय कसा काय होणार हा खरा महत्वाचा प्रश्न आहे. माननीय मंत्री महोदय, आपल्या उत्तराच्या भाषणात सांगतील की, आम्ही यू.एस.मधून स्ट्रॉंग सर्व्हर आणले आहे. त्याच्या माध्यमातून प्रवेश प्रक्रियेचे काम करण्यात येणार आहे. सभापती महोदय, माझ्याकडे एक नोट आहे त्यातील काही ओळी मी या ठिकाणी वाचून दाखवितो. "The speed of the server and the configuration where the website is hosted is going to play an important role for such kind of websites. It has to be very high-end server which can handle the huge traffic and process in the request, otherwise, the problem would be the students won't be able to open the site. And in such case the result put online will never open because of the high traffic."

3...





डॉ.दीपक सावंत...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आपल्या सर्व्हरने दोन टक्के जागा व्यापाली असे आपले म्हणणे आहे. सर्व्हर म्हणजे डाटा कलेक्शन हार्डडिस्क. माझे म्हणणे बरोबर आहे काय ?

यानंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ MMP/ 11:20

डॉ.दीपक सावंत....

जर आपले इंटरनेट डाऊन असेल, ब्रॉडबॅण्ड सर्विस फेल्युअर असेल तर काय करणार? नैसर्गिक आपत्तीसारखी ही यंत्रणा कधी कोसळेल हे सांगता येणार नाही. गेल्या काही दिवसांमध्ये सकाळी 7 ते 9 या वेळेत ब्रॉडबॅण्ड सर्विस 15 दिवसातील 7 दिवस डाऊन होती, आपण याचा विचार केला पाहिजे. शासनावर टीका करण्याचा उद्देश नसून आपल्याला जागृत करीत आहे. एखादा विद्यार्थी फॉर्म भरण्याचे काम करीत असेल आणि इंटरनेट सेवा डिसकनेक्ट झाली तर त्याला वाटेल आपला फॉर्म सादर झाला. परंतु त्याचा फॉर्म निघून जाईल. त्याला वाटेल माझा फॉर्म गेलेला आहे. तो फॉर्म जाणार नाही. त्यामध्ये असलेल्या चुका कायम राहणार आहेत. या चुकांमुळे त्याचा फॉर्म कदाचित रिफ्युज केला जाईल.

सभापती महोदय, मी मघाशी सांगितल्याप्रमाणे 3 हजार विद्यार्थी फक्त संकेतस्थळावर जाऊ शकले. 62 लाख सबस्क्राईबर्स आहेत अशी माहिती दिली. तिसरी महत्वाची गोष्ट म्हणजे विकल्पमध्ये 20 पर्याय द्यायचे आहेत. त्यासाठी कोड नमूद करायचे आहेत. विकल्प 20 पेक्षा कमी दिले तर हा फॉर्म बाद होणार का? तसेच प्रत्येक विद्यार्थ्याने 20 ते 150 इतके विकल्प द्यायचे आहेत. एखाद्या अंबरनाथच्या विद्यार्थ्याने रुपारेल कॉलेजचा विकल्प दिला तर काय करणार? आपण 70:30 कोटा रद्द केला आहे. गिरगावचा विद्यार्थी कदाचित बोरिवलीला जाऊ शकतो. लोकांची डिमांड काय आहे हे महत्वाचे आहे? आपण 70:30 कोटा काढून टाकल्यामुळे मुंबई शहरातील विद्यार्थ्यांचे अतिशय नुकसान झाले आहे. त्यामुळे शासनाला पालकांच्या रोषाला सामोरे जावे लागणार आहे. 70:30 कोटी काढल्यामुळे कोणताही विद्यार्थी कुठेही जाऊ शकतो. मुंबईच्या ट्रॅफिकचा विचार करुन प्रत्येक विद्यार्थी सायन्सला ॲडमिशन घेत असतो. रोजचा प्रवास करुन अभ्यास करायचा, बारावीला चांगले मार्क मिळवून मेडिकल किंवा इंजिनिअरिंगला प्रवेश घ्यायचा त्यांचा मानस असतो. त्यामुळे शक्यतो आपल्या घराजवळ कॉलेज असावे, घराजवळ क्लास असावा जेणेकरुन आपला प्रवासामध्ये वेळ वाचेल यादृष्टीने प्रयत्न होत असतो. हा विचार शासनाने लक्षात घेतलेला नाही. जयहिंद कॉलेजमध्ये कॉमर्सची जागा रिकामी झाली तर बॉर्डरवरचा सायन्सचा विद्यार्थी असेल, सायन्स आणि कॉमर्स असा अर्ज करता येतो, परंतु एक सीट रिकामी झाली तर त्याला कॉमर्समध्ये ॲडमिशन मिळेल का? तो रिव्हर्सबॅक कसा

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत....

होणार?तुम्ही एकदा ॲडमिशन ॲक्सेप्ट केली तर रिव्हर्सबॅक करता येणार नाही असे जी.आर.मध्ये म्हटले आहे. शासनाचे असलेले सॉफ्टवेअर त्यासाठी सक्षम नाही. त्यामुळे या विकल्पाबाबत अत्यंत विचारपूर्वक निर्णय घेणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, दुसरी फेरी, तिसरी फेरी, चौथी फेरी, पाचवी फेरी कधी होणार? या फेऱ्या कशा असणार आहेत याचा उल्लेख कुठेही नाही. पहिल्या फेरीचा उल्लेख आहे. प्रिंटआऊट काढा, प्राचार्यांच्या दरवाजावर जाऊन लाईन लावून ॲडमिशन घ्या. शेवटी पालकांची रांग काही सुटत नाही. प्राचार्यांनी नाही म्हटले तर काय करायचे? पालकांनी मारामारी करायची का? It is not mandatory. मॅण्डेटरी केले तर हे फसतात. महत्वाची गोष्ट म्हणजे मायनॉरिटी कोटा. आज शासनाने मायनॉरिटी कॉलेजमध्ये जाती धर्मावर आधारित आरक्षण दिले. 50 टक्के जागा त्यांच्या त्यांनी भरायच्या. बऱ्याच मायनॉरिटी कॉलेजांच्या स्वत:च्या शाळा आहेत. मिठीबाई कॉलेजचे उदाहरण घ्या. त्यांच्या शाळांमधील इनहाऊस कोटा असतो. मिठीबाई कॉलेजमध्ये चुतर्भूज शाळेतील 50 टक्के विद्यार्थ्यांचा इनहाऊस कोटा, 20 टक्के जागा प्रवेश प्रक्रियेतून दिल्यानंतर 70 टक्के कोटा होतो. 5 टक्के जागा मॅजेनमेंट कोट्यामधून भरल्यानंतर 75 टक्के कोटा पूर्ण झाला. उर्वरित 25 टक्के आरक्षण कोणासाठी? पुन्हा त्यामध्ये आरक्षण आले. इतर मुलांनी काय करायचे?

एफ.1.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ......

म्हणजे मराठी मुलांना ॲडमिशनपासून लांब ठेवावयाचे, वंचित ठेवायचे, चांगल्या कॉलेजमध्ये ही मुले जाता कामा नये अशा प्रकारचा घाट या शासनाने घातला असे दिसते. मुंबईमध्ये किती मॉयनॉरिटी कॉलेजेस आहेत ? आणि त्यात जर जाती-धर्माचे आरक्षण असेल तर त्याच धर्माच्या विद्यार्थ्यांना घेणार आहात काय ? समजा गुजराती किंवा सिंधी बोर्डात मुलगा असेल तर त्या त्या मॉयनॉरिटीज त्यासंबंधी स्ट्रीक्टली पालन करणार आहे काय ? इन हाऊस कोट्यामध्ये अनेक गैरव्यवहार होतात असे गैरव्यवहार रोखण्यासाठी आपण हे सर्व करतो असे नाही तर त्या गैरव्यवहाराला बढावा देण्याचाच शासन हा प्रयत्न करीत आहे. त्यामुळेच हे सर्व गुंतागुंतीचे आहे व त्यामुळे गरिबांना, गरीब विद्यार्थ्यांना न्याय मिळणार नाही. तसेच याच्या संनियंत्रणाचा तर खूपच गोंधळ आहे. यात आपण म्हणतो त्याप्रमाणे कोणाची अकाऊंटेबिलिटी कोणाला नाही. ज्या वरिष्ठ महाविद्यालयांना कनिष्ठ महाविद्यालये जोडलेली आहेत त्यांचे प्राचार्य असे या जी.आर.मध्ये म्हटले आहे. परंतु सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील, आपणही शिक्षक आहात, आपण देखील शाळा चालविता, कनिष्ठ महाविद्यालयामध्ये प्राचार्य नसतो तर तो उपप्राचार्य किंवा हेड मास्टरच हा कार्यभार पाहतात, हे आपणही जाणता. अशा प्रकारच्या चुका शासनाने या जी.आर.मध्ये कराव्यात, ही दुर्दैवाची गोष्ट आहे. त्या आधारे अशा प्रकारे दोघांचेही नियंत्रण ठेवले तर लोकांचे कल्याण होणार नाही. आपण सांगितले की, यामध्ये 35 दिवसांचा कालावधी आहे, हा कालावधी खूप मोठा आहे. तिसरी महत्वाची गोष्ट म्हणजे 125 रुपये प्रवेश फी जी म्हटले आहे, त्यातील 25 रुपये फक्त मिळणार आणि या 25 रुपयात भागणार आहे काय ? हे 25 रुपये आणखी कोणा-कोणाला देणार आहात ? 125 रुपये दिल्यानंतर पुन्हा शाळेत जाऊन फॉर्म भरावयाचा पुन्हा किती फी द्यावी लागणार आहे यासंबंधीची स्पष्टता मात्र नाही. त्यानंतर विना अनुदानित तुकड्यांच्या बाबतीत विचार केला तर 4 हजार ते 12 हजार रुपये एवढी फी आकारली जाते. एखाद्या गरीब विद्यार्थ्याला विना अनुदानित तुकड्यांमध्ये ॲडमिशन देत आहे. He can't revert back. He can't take his admission back. शेवटच्या फेरीनंतर पुन्हा तुम्ही आमच्याकडे या अशा या सगळ्या गोष्टी आहेत. आज बाकीच्या कॉलेजेसमध्ये किती फी आहे आणि फी मध्ये किती डिस्क्रपेन्सी असावी ? एका कॉलेजमध्ये वर्षाची फी 20 हजार रुपये, दुसऱ्या कॉलेजमध्ये

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ......

वर्षाची फी 2400 रुपये तर अजून तिसऱ्या कॉलेजमध्ये वर्षाची फी 12 हजार रुपये अशा प्रकारे निखालस माहीत असताना अशा प्रकारचे प्रयोग शासनाने का करावेत हेच मला समजत नाही. प्रत्येक कॉलेजमध्ये भरमसाठ तुकड्यांना मान्यता दिली जात आहे. ॲडमिशनचा प्रॉब्लेम झाला मग तुकड्या वाढवून घ्या असे प्रकार चालू आहेत. काही ठिकाणी ज्युनियर कॉलेजेसची संख्या वाढत आहे. मिठीबाई कॉलेजमध्ये सर्वात जास्त फी म्हणजे 15 हजार रुपये इतकी आकारली जाते. जर एखाद्या मुलाला या कॉलेजमध्ये ॲडमिशन मिळाली तर तो गरीब विद्यार्थी काय करणार ? कोठून एवढे पैसे आणणार, त्याचे आई-वडील फी भरता येत नाही म्हणून आत्महत्त्या करणार काय ? हे सर्व महत्वाचे मुद्दे असून त्यांचाही विचार करण्याची गरज आहे. म्हणजेच या परिस्थितीत शासन म्हणून आपण टेक्निकली सक्षम नाहीत तर "आयजीच्या जीवावर बायजी उदार" ही मराठी म्हण आहे त्या म्हणीचा मात्र येथे काही उपयोग नाही. म्हणून यासंदर्भात माननीय मंत्री महोदयांना मी तीन-चार सूचना करु इच्छितो. ही जी प्रणाली आहे ती क्वॉश करावी व ओरिजिनल व परंपरागत पध्दतीनेच ही प्रवेश पध्दती सुरु ठेवावी अशी माझी पहिली मागणी आहे. कारण हे शिवधनुष्य पेलण्यासारखे नाही. कदाचित हे शिवधनुष्य आपल्याला पेलता आले असते पण आपण त्यासाठी उशिरा सुरुवात केली आहे. त्यासाठी टाईम स्पॅन नाही, आता एस.एस.सी. चा रिझल्ट लागण्याची वेळ आली आहे. दुसरे महत्वाचे म्हणजे ज्या भागात लोड शेडिंग आहे, आदिवासी भाग आहे, कॉम्प्युटरची सोय नाही, इंटरनेट जाऊ शकत नाही असा भाग यातून वगळावा, अशा भागात हा धाडसी प्रयोग शासनाने करु नये. जर शासनाला हे करावयाचेच असेल तर दोन्ही पध्दती सुरु ठेवाव्यात. कारण माननीय मंत्री महोदयांनी एकदा ही घोषणा केल्यानंतर ते जर त्यापासून मागे येणार नसतील तर उपरोक्त सूचनेचाही विचार करावा, अशी माझी मागणी आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ...

आता आपण आमचा मान ठेवून, आपण जर बॅकफूटवर जाऊन निर्णय बदलवला तर आपल्या सारखे आपणच व्हाल. त्यामुळे माझी आपल्याला कळकळीची विनंती आहे की, या पध्दतीमध्ये आपण विद्यार्थ्यांना वेठीस धरु नका. त्यामुळे ऑन लाईनची पध्दत कम्पलीट स्क्वॅश करा एवढेच मला या निमित्ताने म्हणावयाचे आहे. दुसरी गोष्ट अशी की, आपण दहावीच्या विद्यार्थ्यांच्या ॲडमिशनसाठी ऑन लाईन आणि ऑफ लाईन अशा दोन्ही पध्दती सुरु ठेवाव्यात. तिसरी गोष्ट अशी आहे की, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी सांगितल्या प्रमाणे हे शासन लोकांच्या विरोधीच निर्णय नेहमी घेत असते. विरोधक जी काही मागणी करतात त्या मागणीच्या विरोधी निर्णय हे शासन घेत असते. हे शासन मनाला वाटेल तसे कारभार करीत आहे, मनाला वाटेल तसे निर्णय घेत असते. त्यामुळे सभापती महोदय, विद्यार्थ्यांकडून ऑन लाईन फॉर्म भरुन घेता घेता या विद्यार्थ्यांकडून ऑफ लाईनचे सुध्दा फॉर्म भरुन घ्या. ज्या विद्यार्थ्याला ऑन लाईन फॉर्म भरावयाचा असेल तो ऑन लाईन फॉर्म भरेल व ज्या विद्यार्थ्याला ऑफ लाईन फॉर्म भरावयाचा असेल त्याला ऑफ लाईन फॉर्म भरु द्या. त्यामुळे ऑन लाईन व ऑफ लाईन या दोन्ही पध्दती 10 च्या ॲडमिशनच्या संदर्भात अंमलात आणाव्यात अशी या सभागृहाची मानसिकता झालेली आहे. आपण ऑन लाईन प्रक्रिया बंद केली, 10 वीच्या विद्यार्थ्यांच्या ॲडमिशनच्या संदर्भात आपण ऑन लाईनचा जो निर्णय घेतला आहे तो निर्णय रद्द केला तर विद्यार्थ्यांचा आणि पालकांचा त्रास कमी होईल. आपण अर्जूना सारखे चक्रव्यूहातून बाहेर पडला तर महाराष्ट्रातील तमाम जनता आपल्याला धन्यवाद दिल्याशिवाय राहणार नाही असे मला वाटते. त्यामुळे आपण 10 च्या विद्यार्थ्यांच्या ॲडमिशनच्या संदर्भात जो निर्णय घेतला आहे तो रद्द करावा अशी नम्र सूचना करतो . आपण विद्यार्थ्यांच्या व पालकांच्या जीवाशी खेळू नये, आपण जर या निर्णयापासून मागे आलात चांगले होईल. त्यामुळे यासंदर्भात आपण इगो करुन घेऊ नये एवढेच या निमित्ताने सांगतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, 10 वीच्या विद्यार्थ्यांच्या ॲडमिशनच्या संदर्भात सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी या ठिकाणी बरेच मुद्दे मांडलेले आहेत. मी स्वत: इलेक्ट्रॉनीकचे शिक्षण घेतलेले आहे. त्यामुळे या ठिकाणी शिक्षण मंत्र्यांनी ऑन लाईनच्या संदर्भात जो निर्णय घेतलेला आहे तो अतिशय चांगला आहे असे माझे मत आहे. परंतु या शासनाने ऑन लाईनची व्यवस्था नीटनेटकी, सुनियोजित केली असती तर ऑन लाईन प्रक्रिया चांगली झाली असती व त्यामुळे विद्यार्थ्यांना व पालकांना ॲडमिशन घेणे सोपे झाले असते. परंतु या शासनाने ऑन लाईनच्या संदर्भात ॲडहॉक पध्दतीचा निर्णय घेतला आहे. परंतु हे शासन चांगल्या योजनांचा कसा बट्टयाबोळ करते, कचरा करते, भंगार करते हे या ऑन लाईन प्रक्रियेचे मूर्तिमंत उदाहरण आहे. तुम्हाला जर प्रामाणिकपणे ऑन लाईन पध्दतीचा अवलंब करावयाचा होता तर त्या आधी आपण लोकप्रतिनिधी आणि शिक्षण तज्ञांबरोबर चर्चा करुन निर्णय घेतला असता तर या पध्दतीमध्ये आता ज्या त्रुटी राहिलेल्या आहेत त्या त्रुटी राहिल्या नसत्या असे माझे ठाम मत आहे. मला असे वाटते की, मुंबई आणि आसपासच्या विभागात ऑन लाईन प्रक्रियेने मुलांना ॲडमिशन मिळणार आहे. जर ही ऑन लाईन पध्दत मुंबई मध्ये यशस्वी होऊ शकत नाही तर ती इतर भागात कशी काय यशस्वी होऊ शकेल हे मला पडलेले एक कोडे आहे. राज्याचा आदिवासी भाग आहे त्या ठिकाणी ऑन लाईन पध्दत कधीही यशस्वी होऊ शकणार नाही. ऑन लाईन प्रक्रिया कशा पध्दतीची असते याची असंख्य मुलांना साधी माहिती देखील नाही त्यामुळे आपण मुंबई आणि मुंबईच्या आसपासच्या विद्यार्थ्यांचे अपरिमित नुकसान करणार आहात. ऑन लाईनच्या प्रक्रियेचा फटका 3.5 लक्ष मुलांना बसणार आहे. ॲडमिशनच्या संदर्भात विद्यार्थ्यांची आणि पालकांची मानसिकता लक्षात घेता आपण जो निर्णय घेतलेला आहे तो सुटेल असे कोणालाही वाटत नाही. आपण जर ऑन लाईनच्या संदर्भातील निर्णय अगोदर घेतला असता, ही पध्दत अगोदरच ॲक्सेप्ट केली असती तर ही पध्दत यशस्वी झाली असती, विद्यार्थ्यांना ॲडमिशन घेणे सोपे झाले असते. आता आपण ॲडमिशनसाठी ऑनलाईनची पध्दत स्वीकारली असून त्यामध्ये विद्यार्थी ॲडमिशनच्या संदर्भात संकेत स्थळावर जातील, फॉर्म भरतील, फॉर्मची 125 रुपये फी भरतील, त्याची पोचपावतीही त्यांना मिळेल परंतु एवढे होऊन सुध्दा यामध्ये मोठया प्रमाणात कन्फयूजन आहे.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे ....

आय.सी.एस.ई.च्या प्रश्नासबंधी 150 जणांच्या शिष्ट मंडळाने आजच माननीय मंत्री महोदयांची भेट घेतली होती.. प्रवेश प्रकियेच्या संदर्भात पालकांच्या मनामध्ये मोठया प्रमाणावर गोंधळ आहे. मिडियामध्ये सुध्दा त्या त्या पध्दतीचा ॲंगल पुढे येत असतो आणि गोंधळामध्ये भर पडत असते .या विषयामध्ये शासन अधिक स्पष्टता आणू शकलेले आहे अशी परिस्थिती दुर्देवाने नाही. एका अर्थाने ऑन लाईन प्रवेश प्रक्रिया ही चांगली आहे. दहावीचा निकाल लागल्यानंतर अनेक पालकांना दोन चार दिवस रजा काढून विविध महाविद्यालयामध्ये रांगा लाऊन फॉर्म मिळवावे लागतात व भरावे लागतात. पहाटे पाच वाजेपासून त्यांना रांगा लावाव्या लागतात काही पालकांना मात्र त्यामध्ये फारसा रस नसतो आपल्या मुलाला कोणत्याही महाविद्यालयामध्ये प्रवेश मिळाला तरी त्यांना चालतो चांगले मार्क मिळालेला एखादा विद्यार्थी बोरिवलीला रहात असेल तर पाटकर कॉलेजमध्ये रांग लावली किंवा साठे कॉलेजमध्ये रांग लावली आणि येथील आर.वाय कॉलेजमधील प्रवेश जर मिळाला नाही तर काय करावयाचे असे ठरवून तो या कॉलेजमध्ये प्रवेश धेऊन टाकतो . त्याच्या घरातील तो पहिलाच दहावी उत्तीर्ण विद्यार्थी असल्यामुळे प्रवेशाच्या संदर्भात त्यांना फारशी माहिती नसते. आता ऑन लाईन प्रवेश प्रक्रियेमध्ये काही सुधारणा होऊ शकते. एखाद्या विद्यार्थ्याला 82 किंवा 84 टक्के मार्क्स मिळालेले असतील तर तो चांगल्या कॉलेजमध्ये प्रवेश घेऊ शकतो परंतु या सगळया निगेटीव्हवर मात करणारी ऑन लाईन सिस्टीम आहे परंतु त्यासंबंधीचा आत्मविश्वास जनतेपर्यत सरकारच्या वतीने पाहोचू शकलेला नाही. या प्रवेश प्रक्रियेतून जर गेलो तर 100 टक्के न्याय मिळू शकतो असा आत्मविश्वास त्यांना मिळाला पाहिजे परंतु आज अशा प्रकारचा आत्मविश्वास आपण त्यांना देऊ शकत नाही हाच या पध्दती मधील महत्वाचा दोष आहे असे मला वाटते. मतदारसंघाचे डिलिमिटेशन होणार आहे असे ऐकल्यानंतर एक निवडणूक पुढे ढकलण्यात आली होती . प्रत्येक व्यक्तिमध्ये अननोनचे ॲप्रिहेन्शन असते. पुढे काय होईल यासंबंधीची भीती त्यांना वाटत असते. डिलिमिटेशन होणार असल्यामुळे आमदार, खासदारांनी एक निवडणुंक पुढे ढकलली होती .अशा वेळी दहावीच्या विद्यार्थ्याच्या मनामध्ये तर ही भीती राहणे स्वाभाविकच आहे अशा परिस्थतीमध्ये ही प्रवेश प्रक्रिया सुकर झाली पाहिजे, विद्यार्थ्याचा आत्मविश्वस वाढला पाहिजे अशी सरकार म्हणून व लोकप्रतिनिधी म्हणून आपली भूमिका असली पाहिजे. त्या पध्दतीने प्रवेश प्रक्रियेतून जर आपण गेलो तर चांगल्या प्रकारे प्रवेश मिळू शकेल अशा प्रकारचा

2==



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे ...

आत्मविश्वास या पध्दतीमध्ये आहे परंतु घिसाड घाईने निर्णय घेण्यात आल्यामुळे विद्यार्थ्या पर्यत हा आत्मविश्वास पोहोचू शकत नाही तेव्हा याबाबतीत घाईने निर्णय घेत असतांना या गोष्टीचा विचार केलला नाही असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. एम.केसी.एल नावाचे कॉर्पोरेशन स्थापन करण्यात आलेले आहे परंतु विद्यार्थ्यांना या प्रवेश प्रक्रिये संबंधीची माहिती जेवढया प्रमाणात पाहिजे होती तेवढया प्रमाणात मिळत नाही. या कॉर्पोरेशनच्या माध्यमातून एम.एस.सी.आय.टी.ची परीक्षा घेण्यात येते हे लोकांना माहीत आहे हे सगळे खरे असले तरी सुध्दा अजूनही अनेकांना या संबंधी पूर्ण माहिती नाही. म्हाडाच्या मार्फत लॉटरी पध्दतीने घरे देण्यात येत असल्यामुळे ही पध्दत अत्यंत पारदर्शक होती.टाटा कन्सलटन्सीच्या मार्फत ही पध्दत राबविण्यात येत असल्यामुळें लोकांनी येऊन ही पध्दत तपासावी , त्यात कोणत्याही प्रकारची गडबड होणार नाही असे म्हाडाकडून सांगण्यात आले होते . त्यासाठी त्यांच्याकडे पुरेसा वेळ असल्यामुळे त्यांनी प्रयत्न पूर्वक ती पध्दत स्वीकारली होती पंरतु या प्रवेश प्रक्रियेकरता शासनाला पुरेसा वेळ मिळालेला नाही. एमकेसीएल चांगली आहे किंवा नाही यासबंधीचे प्रश्न चिन्ह निर्माण होत आहे. एकाच वेळी अनेक विद्यार्थ्यांनी ऑनलाईन प्रवेश घेतला तर तो सर्व्हर डाऊन होईल. मी आपल्याला सांगतो की, ज्या दिवशी मुंबईवर दहशतवाद्यांनी हल्ला केला होता त्या दिवशी सर्व मोबाईल्स जाम झाले होते. त्याच बरोबर दिनांक 26 जुलै रोजी मुंबईत पाणी भरले होते त्या दिवशी सुध्दा तसेच घडले होते. क्षमते पेक्षा जास्त वापर झाल्यानंतर या गोष्टी घडणारच 10वी च्या निकाला नंतर प्रवेशाच्या बाबतीत पॅनिक मनस्थिती निर्माण होत असते. आपण जर वेळेवर फॉर्म भ्ंरनला नाही तर आपला नंबर जाईल या भितीमुळे एकाच वेळी सर्व विद्यार्थी ऑन लाईन फॉर्म भरतील याबाबतीत अवेअरनेस कॅम्पेन मोठया प्रमाणावर सुरु केले पाहिजे. तेव्हा उरलेल्या दिवसात हे कॅम्पेन कसे करणार आहात याची स्पष्टता विद्यार्थ्यांना व पालकांना आली पाहिजे एका चेळी विद्यार्थ्यांनी ऑन लाईन फॉम भरु नये असे कितीही सांगितले तरी सुध्दा विद्यार्थी एकाच वेळी फॉर्म भरणरच व आपण त्यांना थांबवू शकणार नाही.

नंतर श्री.सरफरे

अध्यापित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

आणि त्यामुळे यामध्ये मिडियाचा सहभाग असेल, एन.जी.ओं.चा सहभाग असेल, राजकीय पक्षांचा सहभाग असेल या सर्वांना आपण बरोबर घेऊन केले पाहिजे. भारतीय जनता पार्टीने आपापल्या विभागामध्ये दहा-वीस मदत केंद्रे सुरु केली, शिवसेनेने त्यांच्या विभागामध्ये पाच-दहा मदत केंद्रे सुरु केली, आणि बाकीच्या पक्षांकडून सुध्दा अशाप्रकारची मदत केंद्रे सुरु होतील. त्यामध्ये एनजीओ सुध्दा उतरु शकतात. अशाप्रकारची मदतीची भूमिका ते करु शकतात. या संदर्भात आपण या लोकांना कधी बोलाविले आहे काय? राजकीय पक्षाच्या लोकांना बोलाविले आहे काय? मुंबई महानगरपालिकेच्या महापौरांना बोलावून त्यांच्या वॉर्ड ऑफिसमध्ये अशाप्रकारची सोय आपण उपलब्ध करु शकतो काय? अशाप्रकारचे आपण कँपेन करुन ही योजना यशस्वी करु शकतो. मुंबईमध्ये ऑनलाईन ॲडमिशन सिस्टीम यशस्वी झाली तर मुंबईतील सर्व विद्यार्थ्यांना आणि पालकांना ती अभिमानास्पद बाब वाटेल. या पध्दतीने आपल्याला ती यशस्वी करावयाची आहे. हे ध्यानात घेऊन सर्व सामाजिक व राजकीय संघटनांबरोबर महानगरपालिकेच्या शाळांची सुध्दा आपल्याला मदत घेता येईल. आपण याबाबतीत शाळांची मदत घ्यावयाचे ठरविले तर आज शाळांची अशी मानसिकता झालेली आहे की, दहावीची मार्क शीट मुलाच्या हातात दिली की आम्ही सुटलो असे त्यांना वाटत असते. अशापध्दतीचे त्या शाळेच्या मुख्याध्यापकांचे व क्लार्कचे वर्तन असते. त्याचप्रमाणे ज्या विद्यार्थ्यांना कमी मार्क पडतात ते गुण पडताळणीसाठी एस.एस.सी. बोर्डाकडे अर्ज करतात. अशाप्रकारचे अर्ज बोर्डाकडे पाठविण्याच्या बाबतीत शाळांना ते काम कंटाळवाणे आणि किचकट स्वरुपाचे वाटते. आपल्या मुलाला अपेक्षेएवढे मार्क न मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांचे पालक सर्व कागदपत्रांची पूर्तता करुन फॉर्म भरतात. तरीसुध्दा त्या शाळांच्या मुख्याध्यापकांची त्या विद्यार्थ्यांना मदत करण्याची फारशी मनस्थिती नसते. त्यामुळे ऑनलाईन फॉर्म भरण्याच्या बाबतीत त्या शाळांचे मुख्याध्यापक फ्रेश मूडमध्ये असतील अशाप्रकारे आपण गृहीत धरणे चुकीचे आहे. ही नवीन डोकेदुखी आमच्या माथी कशासाठी मारता? अशाप्रकारची त्यांची भूमिका असते. कोणतेही ॲडिशनल काम करण्याची टेंडसी आपल्याला त्याठिक्णी दुर्दैवाने पहावयास मिळत नाही. हे काम करण्यासाठी आपण एक्स्ट्रा फोर्स वापरला पाहिजे. सभापती महोदय, विधानसभेच्या निवडणुका लवकरच होणार असल्यामुळे अनेक राजकीय पक्ष हे काम उत्साहाने करतील. आणि ही पध्दत यशस्वी होण्यास त्यांची देखील आपणास थोडी मदत होईल. त्यामुळे राजकीय पक्ष आणि त्यांचे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

उत्साही कार्यकर्ते आपापल्या विभागामध्ये पाच-दहा सेंटर वाढवून त्याठिकाणी अशापध्दतीने अर्ज भरण्याची प्रक्रिया पार पाडतील. तेव्हा आपण याचाही विचार केला आहे की नाही माहीत नाही? त्यामुळे ज्याला आपण ब्लेसिंग इन डिसगाईज म्हणतो त्या अर्थाने त्याचा उपयोग होईल. यामध्ये राज्य सरकार एक हजार मदत केंद्रे सुरु करणार आहे. ही केद्रे आपल्या असलेल्या शाळांना धरुन आहेत काय? या शाळा वगळून एमकेसीएलची मान्यता असलेली एमएससीआयटीची केंद्रे ठिक ठिकाणी आहेत. एमकेसीएलच्या मान्यतेशिवाय एमएससीआयटीचा कोर्स करता येत नाही. त्यामध्ये त्यांच्या बऱ्याच अटी असतात. . त्यामुळे हे संगणक कोर्स शिकण्यासाठी एमएससीआयटीचे जे खाजगी क्लासेस आहेत त्यांना सुध्दा आपण सांगितले पाहिजे की, तुमच्याकडे 20 क्लासेस असतील तर त्यापैकी 5 क्लासेसचा वापर यासाठी आपण केला पाहिजे. अशाप्रकारची क्लासेस गल्ली बोळामध्ये आपल्याला सापडतील. त्याचा आपल्याला नक्की उपयोग होऊ शकतो. त्यामुळे 1 हजार केंद्रे सुरु करीत आहात ती कोणकोणत्या भागामध्ये आहेत याबाबतची माहिती जनतेपर्यंत पोहोचली नाही. मुळात ही ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया पूर्णपणे लिगली फुलप्रुफ आहे काय? यामध्ये काहीतरी मुद्दे काढून नॅचरल जस्टीस म्हणून घटनेचा आधार घेत कुणीतरी कोर्टामध्ये जाईल. कारण कोर्टाचा भयानक अनुभव आपल्याला आला आहे. म्हणजे "जो न देखे रवि, वह देखे कवि" त्याप्रमाणे "वह न देखे कोर्ट,". त्यामुळे कोर्ट कोणत्या ॲंगलने आपला निर्णय देई ल हे आपल्याला समजू शकत नाही. नॉन ग्रँटच्या धोरणापासून बऱ्याच गोष्टींची वाट कोर्टाच्या अनेक निर्णयामुळे लागली आहे असे माझे प्रामाणिक मत आहे. आणि म्हणून हे लिगली फुलप्रूफ आहे काय? कोर्ट अशी भूमिका घेणार होते हे आपल्याला माहीत नव्हते असे आपण म्हणून चालणार नाही. आणि म्हणून आपल्याला या विषयाची खात्री लोकांना करुन द्यावी लागेल. यामध्ये लहान लहान गोष्टी अंतर्भूत आहेत त्या प्रेस करीत असतांना त्यामध्ये मॅन्युअली काही चुका झाल्यावर लोक कॉलेज आणि इंस्टिटयूटवर खापर फोडतात.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ KGS/ MMP/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 11:45

श्री.विनोद तावडे . . . .

पण ऑन लाईन झाले की मग ते खापर सिस्टीमवर फोडले जाते. म्हणजे एखाद्याला मार्क कमी पडले होते आणि आठ दिवसांनी रि-चेकींग केल्यानंतर त्यामध्ये वाढ झाली. मग त्याने कोणता अर्ज भरावयाचा ? हा अर्ज भरल्यानंतर ओरिजनल अर्जातील मार्क पुन्हा वाढणार आहेत काय आणि त्यामुळे तो पुढच्या राऊंडमध्ये येणार आहे काय ? याबाबतीत काय होणार ? मग मी जाऊन रडलो, आई-वडील तेथे आल्यानंतर त्यांनी चेहरा बारीक केल्यावर प्रिन्सिपॉलनां दया येते, तो त्यांच्याकडील मॅनेजमेंट कोट्यामधून ॲडमिशन देतो. पण ऑन लाईन सिस्टीम मध्ये अशा प्रकारे रडणे वगैरे गोष्टी नाहीत. मग माझे काय होईल ? तर मला ॲडमिशन मिळणार नाही असे त्या विद्यार्थ्याला वाटते. इतर वेळी जर ॲडमिशन मिळाली नाही तर ती नशिबामुळे मिळाली नाही आणि आता जर मिळाली नाही तर ती ऑन लाईन मुळे मिळाली नाही अशा प्रकारची मानसिकता विद्यार्थी व पालक यांची होऊ शकते. त्यामुळे नंतर जर गुणपत्रिकेमध्ये काही बदल झाले तर अशा प्रकारचे जे प्रश्न निर्माण होणार आहेत, अडचणी येणार आहेत, त्यांना कशा प्रकारे तोंड देणार आहोत या बाबतीत लोकांना माहिती मिळणे आवश्यक आहे असे मला माननीय मंत्री महोदयांना सांगावयाचे आहे. पण सगळयात महत्वाचे मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, शिक्षण विभागाने कोणताही निर्णय घेत असताना किमान एक ॲकॅडमिक इयर अगोदर घेतला पाहिजे. परंतु आपण अचानकपणे काही सुचले म्हणून त्या-त्यावेळी त्याची कार्यवाही करतो, ते योग्य नाही. आपण या वर्षापासून ऑन-लाईनव्दारे प्रवेश देण्याची पध्दत सुरु करीत आहोत. पण ती पुढच्या वर्षापासून सुरु झाली असती तरी काही बिघडले नसते.आपल्याला याबाबतीत वर्षभर तयारी करता आली असती.मागच्या वेळी परसेंन्टाईलच्या बाबतीत देखील असेच घडले आणि त्यामुळे आपली हाय कोर्टामध्ये वाट लागली. यावर्षी वेगळा विषय आहे, त्यावर आपण वेगळी चर्चा करु.

**तालिका सभापती (श्री.हेमंत टकले)** : आपण अल्पकालीन चर्चेसाठी 12.00 वाजेपर्यंत वेळ निश्चित केली होती. परंतु आता आपण माननीय मंत्री महोदयांच्या उत्तरासह 12 वाजून 25 मिनिटांपर्यंत ही वेळ वाढविण्यात येत आहे. त्यामुळे या चर्चेमध्ये भाग घेणाऱ्या सन्माननीय सदस्यांना साधारणपणे 12 वाजून 10 मिनिटांपर्यंत बोलता येईल. म्हणून माझी अशी विनंती आहे की, सन्माननीय सदस्यांनी आपले म्हणणे थोडक्यात मांडले तर अधिक सन्माननीय सदस्यांना भाषण करण्यासाठी संधी मिळू शकेल. त्यामुळे याबाबतीत सन्माननीय सदस्यांनी सहकार्य करावे अशी विनंती आहे.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आपण उर्वरित चर्चा ऑन लाईन करु या. माझे म्हणणे एवढेच आहे की, ऑन लाईन सिस्टीम चांगली आहे. मी याचा पुरस्कर्ता आहे. मी इलेक्ट्रॉनिक इंजिनिअर असल्यामुळे, माझ्या इतर सहकाऱ्यांपेक्षा स्वाभाविकपणे या सिस्टीमच्या बाबतीत जास्त आग्रही असेन. पण आम्ही जे मुद्दे मांडत आहोत, त्याबाबतीत सांगावयाचे तर सन्माननीय सदस्यांचा ऑन लाईनला विरोध नाही. पण यासाठी जी पूर्वतयारी करुन, लोकांच्या मनातील शंका-कुशंकाचे निरसन करुन, मग ही सिटीम सुरु करावयास हवी होती. मघाशी सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर म्हणाले, त्याप्रमाणे आदिवासी पाड्यावरील विद्यार्थी असेल तर त्याला तेथे कॉम्प्युटर उपलब्ध आहे की नाही ? हा चर्चेचा वेगळा विषय आहे. पण अशा प्रकारचे अनेक प्रश्न आहेत. लोकांच्या या प्रश्नांना उत्तरे मिळण्याची संधी उपलब्ध व्हावयास हवी होती, ती झाली नाही. त्यामुळे या सिस्टीमच्या बाबतीत मोठया प्रमाणावर कन्फ्युझन आहे. त्यामुळे किमान पुढच्या काळामध्ये एक अग्रेसिव्ह अवेअरनेस कम्पेन म्हणजे केवळ पाट्या टाकण्याचे नाही तर लोकांना कन्व्हीन्स् करुन ही सिस्टीम कशाप्रकारे राबविता येईल याबाबत विचार झाला पाहिजे. यादृष्टीने माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिले तर ही सिस्टीम काही प्रमाणात सुसह्य होऊ शकते असे मला वाटते. एवढेच मला यानिमित्ताने सांगावयाचे आहे.

-----

. . . .जे-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : मला सन्माननीय सदस्यांना विनंती करावयाची आहे की, सर्व सन्माननीय सदस्यांनी पाच मिनिटांमध्ये आपले भाषण पूर्ण करावे.

श्रीमती अलका देसाई (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी ऑन लाईन सिस्टीमचा पुरस्कार करीत असताना, सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडेजी यांना धन्यवाद देऊ इच्छिते. कारण केव्हातरी या गोष्टीला सुरुवात झाली पाहिजे हे त्यांनी कबूल केले आहे. जेव्हा मी मुंबई शहरामध्ये काम करण्यास सुरुवात केली, तेव्हा माझ्या परिसरामध्ये मग विक्रोळी असेल, भांडूप असेल किंवा मुलूंड असेल इ.ठिकाणी के.जी.पर्यंत शाळा सुरु होत्या, तेथे बारावीपर्यंत किंवा त्यापुढच्या शिक्षणासाठी सुध्दा मान्यता देण्यापर्यंत मी काम केले आहे. त्या परिसरातील शाळा-कॉलेज असतील, त्यांना आम्ही मदत केली. परंतु एखाद्या विद्यार्थ्याला जर 70 टक्के मार्क मिळाले असतील आणि त्याला 11 वी मध्ये प्रवेश मिळावा यासाठी माझ्यासारखी व्यक्ती एखाद्या कॉलेजमध्ये गेली तर असे सांगितले जाते की, आम्ही या मुलाला ॲडमिशन दिले असती, पण तुम्ही या मुलाच्या आईला किंवा बाबांना पाठवून द्या. कारण माझ्याकडून डोनेशनचा स्विकार कसा करणार ? ही यामागची त्यांची अडचण होती किंवा विद्यार्थ्याकडून डोनेशन घेतल्याशिवाय ॲडमिशनच द्यावयाची नाही. मी येथे एवढयासाठी नमूद करीत आहे की, यामध्ये काही मंडळींची अतिशय कुचंबणा झालेली आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई......

त्या कुचंबणेच्यापोटी सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्य या ठिकाणी बोलत आहेत. 669 कॉल्जे्स आहेत या प्रत्येक कॉलेजे्सच्याबाहेर सरकारमार्फत विद्यार्थ्यांना मदत देण्यात यावी. शासनामार्फत या सगळया प्रक्रियेमध्ये भाग घेण्यात यावा आणि गरीबातील गरीब मुलांना देखील चांगल्या कॉलेजे्समध्ये प्रवेश मिळावा हे जे सरकारे उद्दिष्ट आहे त्या उद्दिष्टपुर्तीसाठी शासनाने ही ऑन लाईन प्रवेशाची प्रकिया सुरु केलेली आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी उपस्थित करण्यात आलेल्या लोडशेडिंगच्या मुद्याशी मी सुध्दा सहमत आहे. लोडशेडिंगचा प्रश्न शासन आपल्या स्तरावर कशा प्रकारे सोडविणार आहे ? याचे उत्तर यासभागृहाला मिळाले पाहिजे. इयत्ता अकरावीत प्रवेश देताना सर्वसामान्यांच्या आणि श्रीमंतांच्या मुलांना एका रांगेत आणून प्रवेश देण्यात यावेत. रुपारेल कॉलेजमध्ये 90 टक्क्यापेक्षा कमी गुण असणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जात नाही, याचा मला अनुभव आहे. माझा मुलगा त्या ठिकाणी शिकायला होता. रुईया आणि केळकर कॉलेजमध्ये सुध्दा तीच अवस्था आहे. मी याबाबतीत प्राचार्यांना दोष देत नाही. त्यामध्ये मॅनेजमेंटचा दोष असतो. मॅनेजमेंटचा दोष प्राचार्यांच्या माथी मारला जातो. पण या वेळी हे होणार नाही व सर्वसामान्यांच्या मुलांना देखील या चांगल्या कॉलेजमध्ये ॲडमिशन मिळेल याची खबरदारी शासनाने घ्यावी. तसेच हे ॲडमिशन्स् ऑन लाईनच्या माध्यमातूनच देण्यात यावेत, अशी मी विनंती करते व माझे दोन शब्द पूर्ण करते.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील ( मुंबई विभाग शिक्षक ) :सभापती महोदय, मी मुद्यांची पुनरावृत्ती करणार नाही. एका गोष्टीसाठी माननीय शिक्षण मंत्र्यांचे अभिनंदन केले पाहिजे. यापूर्वी शिक्षण खात्याकडून जो अनुभव आम्हाला मिळत होता त्यापेक्षा चांगला अनुभव आणि सुखद धक्का देणारा अनुभव नव्या शिक्षण मंत्र्यांनी दिलेला आहे. या प्रश्नाच्याबाबतीत लोकप्रतिनिधींना, प्राचार्यांना आणि याच्याशी संबंधित असणाऱ्या सर्व गघटकांना शासनाने विश्वासात घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्यासाठी मी त्यांचे अभिनंदन करतो. ऑन लाईन प्रवेशाची योजना चांगली आहे, त्याबद्दल कोणाचे दुमत नाही. परंतु यातील अडचणींच्या बाबतचे निराकरण सरकार कसे करणार आहे? हा खरा प्रश्न आहे. ऑन लाईन प्रवेश प्रक्रियेमध्ये कोणत्याही मुलाचे नुकसान होणार नाही, ऑन लाईनवर काही विद्यार्थ्यांचे अर्ज चुकले, किंवा ऑन लाईन फेल झाल्यामुळे विद्यार्थ्यांना अर्ज भरता आले नाहीत तर त्या प्रत्येक विद्यार्थ्याला प्रवेश मिळेल, याची हमी माननीय शिक्षण मंत्र्यांची घेतली तर चांगले वातावरण निर्माण होऊ शकेल.

सभापती महोदय, मी तीन-चार मुद्दे या ठिकाणी मांडणार आहे. त्यापैकी पहिला मुद्दा असा आहे की, मेरिट्सचे कॉलेजे्स कोणते आहेत आणि त्यांची क्रमवारी शासन कशी ठरविणार आहे? हा मुद्दा सुध्दा अनुत्तरीत आहे. रुपारेल कॉलेज महत्वाचे आहे की, रुईया कॉलेज महत्वाचे आहे आणि हिंदुजा कॉलेज महत्वाचे आहे की, जयहिंद कॉले्ज महत्वाचे आहे? यांची क्रमवारी कशी ठरविणार?

सभापती महोदय, माझा दुसरा मुद्दा विनाअनुदानित तुकडयांबाबतचा आहे. अनुदानित कॉलेजे्समध्ये सुध्दा विनाअनुदानित तकडया पुष्कळ आहेत. मुंबईतील कॉलेजेसमधील या विनाअनुदानित तुकडयांधील प्रवेश महागडे आहेत. सर्वसामान्य मुलांना ते परवडणारे नाहीत. म्हणून या विनाअनुदानित तुकडयांबाबतचा मुद्दा देखील अनुत्तरीत आहे.

सभापती महोदय,तिसरा मुद्दा भाषिक अल्पसंख्याक महाविद्यालयासंबंधी आहे. भाषिक गटांचा तो घटनात्मक अधिकार आहे,त्याबद्दल वाद नाही. पण त्या भाषिक गटातील विद्यार्थ्यांना प्रवेश मिळेल याची खात्री बाळगण्यासाठी सदर प्रवेश ऑन लाईन कां केले नाहीत? ते प्रवेश देखील ऑनलाईन करण्याची आवश्यकता होती. हिंदी भाषिक विद्यार्थ्यांना हिंदी गटामध्ये प्रवेश

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील.....

देण्याचा अधिकार कॉलेजे्सकडे वेगळा कां देण्यात आला? जनरल प्रवेश ऑन लाईनवर देण्यात येणार आहेत आणि भाषिक अल्पसंख्याक गटांचे प्रवेश हे त्या त्या महाविद्यालयांच्या प्रचार्यांकडे किंवा व्यवस्थापनाकडे देण्यात आले आहेत हा भेदभाव करण्याची आवश्यकता नव्हती.

सभापती महोदय, माझा चौथा मुद्दा असा की, प्रवेशासाठी एकूण उपलब्ध सीट्स किती आहेत आणि त्याततील अनुदानित सीट्स किती आहेत? याबाबतची नेमकी आकडेवारी समोर आली तर यातील बरेचसे प्रश्न सुटू शकतात.

सभापती महोदय, माझा पाचवा मुद्दा असा आहे की, मी याबाबतीत थाडयावेळापूर्वीच मुद्दा मांडलेला आहे. ऑन लाईन प्रवेश प्रक्रियेमध्ये काही पात्र मुलांना प्रवेश मिळाले नाही तर त्या मुलांना प्रवेशाची खात्री शासनाने देण्याची आवश्यकता आहे. याबाबतीत प्राचार्यांची अशी तक्रार आहे की, त्यांच्या अधिकारावर अतिक्रमण होत आहे, तेव्हा त्यांचा सन्मान कसा राखला जाईल, याबद्दल माननीय मंत्रिमहोदयांनी खुलासा करण्याची आवश्यकता आहे.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील ....

सगळ्यात महत्वाचा मुद्दा असा आहे की, एमएमआरडीए परिसरातील जो ग्रामीण भाग आहे, जो आदिवासी भाग आहे किंवा जो लोड शेडींगचा भाग आहे त्या भागातील विद्यार्थ्यांच्या प्रवेशाची व्यवस्था कशी करणार ? यातून वसई भागातील विद्यार्थ्यांना वगळण्याचा विचार सुरु आहे. त्याप्रमाणे रायगड किंवा अन्य परिसरातील विद्यार्थ्यांबाबत कशी व्यवस्था करणार याबाबत विचार करावा. पालघर, डहाणू अशा बाहेरच्या भागातील विद्यार्थ्यांना सुध्दा असे वाटते की आपण रुपारेल कॉलेजमध्ये प्रवेश घ्यावा. त्या ठिकाणी वसतिगृहाची व्यवस्था आहे. म्हणून त्या ठिकाणी विद्यार्थ्यांना प्रवेश घ्यावासा वाटतो. अशा विद्यार्थ्यांच्या बाबतीत काय व्यवस्था करणार ? या प्रवेशाच्या बाबतीत जो एक अडचणीचा मुद्दा पर्सेंटाईलच्या संदर्भात आहे त्याबाबत सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी उल्लेख केला. गेल्या वर्षी सीबीएसई आणि आसीएसईच्या जवळपास 10 हजार विद्यार्थ्यांनी एसएससी बोर्डाच्या विद्यार्थ्यांवर अतिक्रमण केले. त्यामुळे पर्सेंटाईलचा पर्याय काढण्याचा प्रयत्न केला होता. तो पर्याय घाईघाईने शोधल्यामुळे कोर्टामध्ये तो पर्याय टिकू शकला नाही. तो मुद्दा आजही कायम आहे. त्यावर आपण अजूनही उपाय शोधलेला नाही. या प्रवेशामध्ये एसएससी बोर्डाच्या विद्यार्थ्यांसाठी 90 टक्के प्रवेश राखून ठेवण्याचा विचार माननीय मंत्रिमहोदय करीत आहेत. त्यातून प्रश्न सुटेल असे मला वाटत नाही. त्यासाठी काही मूलभूत उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. यामध्ये सगळ्यात महत्वाचा मुद्दा असा आहे की, पूर्वी इंग्रजी माध्यमाकडे ओढा असावयाचा त्यामुळे मराठी शाळा, भाषिक शाळा कमी व्हावयास लागल्या. आता सीबीएसई आणि आयसीएसईच्या शाळा वाढावयास लागल्या आहेत. इंग्रजी माध्यमाच्या तुकड्या कमी व्हावयास लागल्या आहेत. त्यामुळे प्रवेशातील जो गोंधळ आहे त्यात मूलभूत मुद्दा हा दर्जाचा आहे. दर्जाच्या बाबतीत त्या शाळा पुढे आहेत अशी भावना आहे. प्रत्यक्षात सगळा अभ्यासक्रम एक आहे परंतु वस्तुस्थिती अशी आहे की, आपले एसएससी बोर्ड देशात पहिल्या दहामध्ये सुध्दा नाही, ही वस्तुस्थिती आहे. देशात अव्वल नंबर दिल्लीच्या सीबीएसई आणि आयसीएसई बोर्डाचा आहे. दुसरा क्रमांक बिहारच्या बोर्डाचा आहे. त्यानंतर बाकीच्या बोर्डांचा क्रमांक लागतो. दर्जाच्या बाबतीत आपण तेराव्या क्रमांकावर आहोत. त्यामुळे आपल्याला दहा पावले पुढे येऊन त्यांच्याशी स्पर्धा

...2...

RDB/ KGS/ MMP/

श्री. कपिल पाटील ....

करावयाची आहे. जोपर्यंत आपला दर्जा वर आणत नाही तोपर्यंत महाराष्ट्रातील मुले स्पर्धा करु शकणार नाहीत. मी स्वत: अनेक शिक्षकांशी शिबिरातून बोलतो आणि चर्चा करतो. सायन्स आणि गणित या दोन विषयांची सीबीएसई बोर्डाची जी पुस्तके आहेत ती जशीच्यातशी लागू करावीत. ती पुस्तके लागू केल्याशिवाय स्पर्धात्मक परीक्षेमध्ये आपली मुले पुढे जाऊ शकणार नाही. या दोन विषयांवर त्यांचा दर्जा ठरतो. मी शिक्षकांच्या वतीने नव्हे तर पालकांच्या वतीने मागणी करतो की, महाराष्ट्रातील मुलांना या स्पर्धेमध्ये उतरावयाचे असेल तर गणित आणि सायन्स या दोन्ही विषयाची दिल्लीच्या सीबीएसई बोर्डाची पुस्तके जशीच्यातशी आपल्याकडे लागू करावीत. आपण त्यांच्यापेक्षा दोन इयत्ता मागे आहोत. त्यामुळे या विषयांचा अभ्यासक्रम ॲडव्हान्स करावा. ते मुलांना झेपेल काय याची चर्चा मी करु इच्छित नाही. आपण इयत्ता पहिलीपासून इंग्रजी विषय सुरु केला त्यालाही सुरुवातीला विरोध झाला होता. परंतु त्याचे परिणाम आज आपण पाहात आहोत. त्यामध्ये काही त्रुटी आहेत आणि त्यामध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. त्याच पध्दतीने याबाबत सुध्दा विचार करावा. आपण आता जो निर्णय घेतला तो पुढच्या वर्षी लागू करु शकतो. वर्षभर अगोदर निर्णय घेतला तर तो अंमलात आणणे सोपे होईल. म्हणून मी या निमित्ताने तशी मागणी करतो. महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना सशक्त करणे आणि त्यांना स्पर्धेत उतरण्यासाठी सक्षम करण्याची जबाबदारी शासनाने उचलावी, एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

----

....3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MMP/

डॉ. नीलम गोऱ्हे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी नियम 97 अन्वये जी चर्चा या ठिकाणी उपस्थित केलेली आहे त्याचे समर्थन करण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, आपण गेली काही वर्षे सभागृहामध्ये पाहतो की, संपूर्ण शिक्षणाच्या प्रक्रियेमध्ये जेव्हा प्रयोग होतात त्यावेळी अतिशय महत्वाची गोष्ट म्हणजे विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांच्या मनामध्ये प्रचंड ताण आणि गोंधळ निर्माण होतो आणि त्यांच्यावरच्या ताणतणावाचा परिणाम संपूर्ण शहरभर होतो. गेल्या वर्षी सुध्दा प्रवेशाच्या वेळी आपल्याकडे शेकडो विद्यार्थी प्रत्येक कॉलेजमध्ये अस्वस्थतेने वाट बघत होते. ते टाळण्यासाठी आपण ऑन लाईन प्रवेश सुरु करीत आहोत असे आपण म्हणतो. जी.आर. मध्ये असे शब्द आहेत की, विद्यार्थ्यांना ऑन लाईनवरच प्रवेश घ्यावा लागेल. नॉलेज कॉर्पोरेशन लिमिटेड यांच्या बद्दलचा अनुभव पाहिला तर ते फायद्यामध्ये चालविले आहे परंतु या ठिकाणी आपल्याला विद्यार्थ्यांच्या फायद्याचा विचार करावयाचा आहे. जीमॅट सारखी परीक्षा, सीईटीसारखी परीक्षा वरच्या स्तरावर गेलेले विद्यार्थी, इयत्ता बारावी पास झालले विद्यार्थी अनेक वर्षे चांगल्या पध्दतीने देत आहेत.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MAP/ SBT/ MMP/ यापूर्वी श्री.बरवड 12:00

डॉ.नीलम गोऱ्हे...

दहावीच्या परीक्षेच्या कालावधीत काही शाळांमध्ये विजेची कनेक्शन्स नाहीत असे निदर्शनास आल्यानंतर उच्च न्यायालयामध्ये हा विषय गेल्यावर उच्च न्यायालयाला यासंबंधी सरकारला आदेश द्यावा लागला. त्यावेळी असे निदर्शनास आले की, ब-याच शाळांमध्ये किमान सुविधा नाहीत. ज्या विद्यार्थ्यांच्या घरी इंटरनेटची व्यवस्था नाही, ज्या पालकांना संगणकाची माहिती नाही अशा लोकांचा मूळ प्रश्न मोठा आहे. अनेकदा आपण पाहतो की, प्रत्येक वेळी संगणाकावरील यंत्रणा अद्ययावत केली आहे की नाही, याबद्दल लोकांच्या मनामध्ये शंका तयार झालेल्या असतात. म्हणून टप्प्याटप्प्याने याबाबतचा निर्णय करावयास पाहिजे होता. यासंबंधी अंतर्गरित्या जी काही तयारी करावयास पाहिजे ती तयारी विद्यार्थ्यांनी करण्याऐवजी त्यांनी कोणत्याही प्रकारे प्रवेश अर्ज भरला तरी त्याच्यावर प्रक्रिया करुन तो ऑनलाईनवर घेणे ही बाब शासनाला अशक्यप्राय नाही. शासनाने स्वत:ची सक्षमता तयार करण्याऐवजी केवळ विद्यार्थ्यांवर हा जो भार टाकलेला आहे त्याचा फार मोठा फटका बसण्याची मला धास्ती वाटते. या चर्चेनंतर मंत्रिमहोदय उत्तर देणार आहेत. पण प्रत्यक्ष प्रवेश देताना त्रुटी समोर येतील तेव्हा हा निर्णय राबविणारे कोण शिक्षण मंत्री आहेत, कोण आमदार आहेत त्यांना शोधून झोडावे असे सरळसरळ लोक बोलू लागतात. तुम्ही सत्ताधारी पक्षात असा वा विरोधी पक्षात असा, तुम्ही याला जबाबदार आहात असे ते गृहित धरतात. अधिकारी वर्गाकडून या पध्दतीमध्ये त्रुटी राहिलेल्या असल्या तरी त्याची जबाबदारी शासनावर येत असते. ऑनलाईन प्रवेशाच्या निर्णयात जो 'च' लावलेला आहे तो किती महत्वाचा आहे हे आपण जाणतो. काही वेळेला तो महत्वाचा असतो पण येथे मात्र हा 'च' काढून टाकला पाहिजे. प्रत्येक विद्यार्थ्याला आपल्या सोयीनुसार पर्याय स्वीकारण्याची मुभा देण्याचा शासनाकडून विचार झाला तर विद्यार्थ्यांची सोय होईल आणि बऱ्याच मोठया मनस्तापापासून, कायदा व सुव्यवस्थेच्या प्रश्नातून शासनाची सुटका होईल असे मला वाटते.

शिवसेनेच्या माध्यमातून मदत केंद्रे सुरु करण्यात आलेली आहेत. परंतु संपूर्ण मुंबईतील विद्यार्थ्यांना ही मदत पोहोचण्याच्या दृष्टीकोनातून शासनाने ही यंत्रणा सुकर व सुलभ करावी असे मला वाटते. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी वेगवेगळया पध्दतीने मंत्रिमहोदयांना विनंती

2...

08-06-2009 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) M-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे...

करुन पाहिले आहे. यापूर्वीचे सन्माननीय शिक्षण मंत्री सुध्दा घेतलेला निर्णय अशाच पध्दतीने रेटत जात होते. त्यानंतर शिक्षण मंत्री बदलले हे सगळयांना माहीत आहे. विद्यमान सन्माननीय शिक्षण मंत्र्यांना आमच्या शुभेच्छा आहेत. अशाप्रकारे रेटून नेलेल्या निर्णयाचे परिणाम विद्यार्थी व शिक्षण तज्ज्ञांना वर्षानुवर्षे भोगावे लागतात. म्हणून शासनाने घेतलेल्या निर्णयामुळे अगदी 10 विद्यार्थ्यांचे नुकसान होणार असेल तर त्या निर्णयाबाबत शासनाने फेर विचार करावा अशी विनंती करावीशी वाटते, एवढे बोलून मी माझे भाषण संपविते. धन्यवाद.

-------

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी अकरावीच्या प्रवेशासाठी ऑनलाईनची पध्दती सुरु करण्यात येणार आहे, त्याबाबत चर्चा उपस्थित केली आहे. या प्रस्तावाला असलेली वेळेची मर्यादा लक्षात घेऊन मी नेमके मुद्दे मांडण्याचा प्रयत्न करणार आहे.

सभापती महोदय, सन्माननीय शिक्षण मंत्र्यांनी ऑनलाईनची घोषणा केली ती बातमी सर्व वर्तमानपत्रातून वाचावयास मिळाली. त्यासंबंधी शासनाच्या माध्यमातून निरनिराळया बैठक झाल्या आहेत. या निर्णय प्रक्रियेमध्ये आमदारांना सुध्दा सहभागी करुन त्यांचे याबाबत काय विचार आहेत हे जाणून घ्यावे यासंदर्भातील पत्र आम्ही शासनाला पत्र दिले होते. त्यानंतर शासनाने आमदारांना या निर्णयामध्ये सहभागी करुन घेतले. ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेचे निश्चितपणे स्वागत केले पाहिजे. परंतु त्यापूर्वी जेवढी तयारी करावयास पाहिजे होती ती झालेली नाही. म्हणून या पध्दतीसंबंधी माझ्या मनामध्ये अनेक शंका आहेत. अनेक सन्माननीय सदस्यांनी सुध्दा शंका उपस्थित केलेल्या आहेत. प्रमुख मुद्दा मांडावयाचा झाल्यास, शासनाने ग्रामीण भागात राहणाऱ्या, आदिवासी पाडयांमध्ये राहणा-या मुलांचा विचार केला आहे काय ? सध्या आदिवासी पाडयात राहणारी मुले सुध्दा मोठया प्रमाणावर शिक्षण घेत आहेत. पण तेथील शाळांमध्ये संगणक नाही, संगणक असला तर शिक्षकांना त्याचे ज्ञान नाही. मी त्या मुलांना भेटण्यासाठी गेलो होतो. 90 टक्के गुण मिळविलेल्या मुलांच्या घरी वीज नसल्याचे दिसून आले होते. त्यामुळे अशा विद्यार्थ्यांच्या प्रवेशाची इंटरनेटद्वारे सोय कशी होणार याचा खुलासा होणे अत्यंत आवश्यक आहे. साधारणपणे जून महिन्याच्या तिसऱ्या आठवडयात दहावीचा निकाल लागल्यानंतर पाऊस सुध्दा सुरु होणार आहे. ग्रामीण भागात पाऊस सुरु झाला की वीज सुध्दा बंद पडते. आधीच तेथे लोडशेडिंग आहे. पावसामुळे विजेचे खांब पडतात, वायर्स तुटतात, अशा परिस्थितीत ही प्रवेश प्रक्रिया सुरु राहणार आहे. यासंबंधी शासनाने साधकबाधक विचार करण्याची गरज आहे. त्याठिकाणच्या विद्यार्थ्यांनी नेमके काय करावयाचे ?

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. संजय केळकर....)

हे विद्यार्थी कशा प्रकारे प्रवेश घेणार ? त्यांच्या प्रवेशाची काय सोय केलेली आहे ? नजिकच्या शाळा किंवा कॉलेजेसमध्ये सोय केली तरी तेथे लोड शेडिंग असल्यामुळे शाळा-कॉलेजेसमध्ये जनरेटर, इन्व्हर्टर नसणार. मला या निमित्ताने एवढेच सांगावयाचे आहे की, या ऑन लाईन प्रवेश प्रक्रियेमध्ये ग्रामीण भागातील विद्यार्थी कोणत्याही प्रकारे वंचित राहाता कामा नये. अर्जामध्ये दोन ऑप्शन्स दिलेले आहेत. त्या ऐवजी सायन्स, आर्टस् आणि कॉमर्स असे तीन ऑप्शन्स ठेवायला हरकत नाही. व्हेरिफिकेशनच्या बाबतीत अनेक तक्रारी असतात. एखाद्या विषयामध्ये 40 मार्क्स मिळाल्यानंतर तो विद्यार्थी व्हेरिफिकेशनचा अर्ज करतो आणि त्याला त्यामध्ये 84 मार्क्स पडलेले असतात. मग अशा व्हेरिफिकेशनसाठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांनी कशा प्रकारे प्रवेश घ्यायचा ?तेव्हा अशा विद्यार्थ्यांचा देखील ही ऑन लाईन प्रक्रिया राबविताना विचार करायला पाहिजे. या प्रक्रियेमध्ये एमकेसीएलचा निश्चित रोल काय आहे हे देखील मंत्री महोदयांनी सांगणे आवश्यक आहे. एमकेसीएल हजार केन्द्रे उघडणार आहे की शाळा आणि कॉलेजेस ही देखील केन्द्रे असणार आहेत ? तेव्हा याही गोष्टीचा देखील मंत्री महोदयांनी खुलासा करावा. ही प्रवेश प्रक्रिया सुरु झाल्यानंतर जर त्या प्रक्रियेमध्ये बिघाड झाला तर विद्यार्थी आणि पालक सैरभैर होतील आणि त्या त्या भागातील लोकप्रतिनिधींना ते पकडून जाब विचारतील. तेव्हा याही गोष्टीचा विचार होणे आवश्यक आहे. म्हणून जोपर्यन्त या प्रक्रियेचे होमवर्क होत नाही तो पर्यन्त ती प्रक्रिया यशस्वी होणार नाही. म्हणून या सर्व गोष्टींचा मंत्री महोदयांनी विचार करावा अशी मी विनंती करुन माझे दोन शब्द संपवितो.

----

...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, शासनाने कनिष्ठ महाविद्यालयामधून ऑन लाईन प्रवेश देण्याच्या संदर्भात जो धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे तो निर्णय राबवितांना ज्या विविध अडचणी येणार आहेत, समस्या निर्माण होणार आहेत त्या अडचणींची, समस्यांची सन्माननीय सदस्यांनी या सभागृहामध्ये चर्चा करुन शासनाला जागृत करण्याचा प्रयत्न केलेला आहे. ही प्रक्रिया राबविताना अनेक अडचणी येणार आहेत हे जरी खरे असले तरी शासनाने याबाबतीत धोरणात्मक निर्णय घेतलेला असल्यामुळे ही प्रक्रिया यशस्वीरीत्या राबविण्यासाठी सन्माननीय मंत्री महोदयांनी स्वत: खूप मेहनत घेतलेली आहे त्यामुळे मला असे वाटते की या निर्णयापासून शासन मागे येऊ शकणार नाही. म्हणून ही प्रक्रिया यशस्वी होण्यासाठी विद्यार्थी, पालक, शाळाप्रमुख यांचे सहकार्य घेण्याची आवश्यकता आहे. या निमित्ताने मी दोन-तीन मुद्यांचा उल्लेख येथे करु इच्छितो. ऑनलाईन प्रवेशासाठी फॉर्म भरुन देण्याच्या संदर्भात अनेक सन्माननीय सदस्यांनी पालकांना आणि विद्यार्थ्यांना असलेल्या संगणकाच्या अज्ञानाचा उल्लेख केलेला आहे.ग्रामीण भागातील, झोपडपट्टयांच्या शाळातील विद्यार्थ्यांना संगणकाचे आणि ऑनलाईन प्रवेश घेण्यासंबंधी असलेले अज्ञान, शाळांची गैरसोय या सर्व गोष्टी विचारात घेऊन ही प्रक्रिया यशस्वी करण्यासाठी ज्या ज्या शाळातून हे विद्यार्थी उत्तीर्ण होऊन बाहेर निघतील त्या शाळाप्रमुखांवर किंवा त्या शाळांतील संगणकाचे ज्ञान असणा-या शिक्षकांवर विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रवेश घेण्यासाठी सहाय्य करण्यासंबंधीची जबाबदारी निश्चित करण्याची आवश्यकता आहे. तशी जबाबदारी निश्चित करण्यासंबंधी शासन निर्देश देणार आहे काय ? उत्तीर्ण झालेले विद्यार्थी गुणपत्रिका, रिझल्ट घेण्यासाठी जेव्हा शाळांमध्ये येतील त्यावेळी त्यांना या ऑनलाईन प्रवेशासंबंधी त्या त्या शाळेतून मार्गदर्शन मिळण्याच्या संदर्भात शासनाने ठोस भूमिका घेण्याची आवश्यकता आहे. प्रवेशाच्या संदर्भात या सभागृहामध्ये अनेक वेळा चर्चा झाली. सी.बी.एस.ई. आणि आय.सी.एस.ई. आणि एस.एस.सी.बोर्डाचे विद्यार्थी यांच्या गुणांचे समानीकरण करण्याच्या संदर्भात अडचणी आहेत. प्रवेशाच्या बाबतीत सी.बी.एस.ई. आणि आय.सी.एस.ई. बोर्डाचे विद्यार्थी पुढे असतात.उदा. रुपारेल कॉलेजमधील प्रवेशप्रक्रिया पाहिली तर 50 विद्यार्थ्यांमध्ये पहिले 49 विद्यार्थी हे सी.बी.एस.ई. आणि आय.सी.एस.ई. बोर्डाचे असतात तर 50वा विद्यार्थी हा एस.एस.सी. बोर्डाचा असतो.

...नंतर श्री. गिते...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते....

अशी परिस्थिती असेल तर आपल्याला काय उपाययोजना करता येईल. मागच्या वर्षी शासनाने प्रवेशासंबंधी निर्णय घेतला होता, तो अयशस्वी ठरला. याच्या संदर्भात फेरविचार करण्याची आवश्यकता आहे. सभापती महोदय, शासनाने या विद्यार्थ्यांना ऑन लाईन प्रवेश देताना ऑप्शन देण्याची वा पर्याय देण्याची तरतूद केलेली आहे. प्रवेश अर्ज भरताना विद्यार्थी पर्याय देतीलही. बहुतेक विद्यार्थी हे अनुदानित विभागातील महाविद्यालयामध्ये प्रवेश देण्यासंबंधी पर्याय देतील. पण अनेक विना अनुदानित आणि कायम अनुदानित महाविद्यालयातील तुकडया आहेत, तेथील पर्याय देणार नाहीत. अनुदानित महाविद्यालयांमधील तुकडयांमधील जागा पूर्ण झाल्या तर त्या विद्यार्थ्यांना त्यांनी ठरविलेल्या महाविद्यालयात प्रवेश मिळणार नाहीत. तसेच अन्य महाविद्यालयांचे प्रर्याय देऊनही प्रवेश मिळू शकला नाही. तर अडचण निर्माण होण्याची शक्यता आहे. विना अनुदानितच्या तुकडया, अनुदानितच्या तुकडया आणि विद्यार्थ्यांनी केलेली मागणी या सगळया बाबींचा विचार होण्याची शक्यता आहे. काही विद्यार्थ्यांना, काही शाळांना, तसेच काही पालकांना असे वाटते् की, माझा विद्यार्थी इयत्ता दहावी पर्यंत ज्या शाळेत शिकला. त्या शाळेत इयत्ता 11 वी व इयत्ता 12 वी वर्ग आहेत, मग त्या विद्यार्थ्याला गुणांची टक्केवारी कितीही असली तरी तो त्याच शाळेत शिकला पाहिजे. शाळेला असे वाटते की, हा विद्यार्थी इयत्ता पहिली पासून दहावीपर्यंत शिकला आहे. म्हणून त्यास याच शाळेला प्रवेशासाठी प्राधान्य मिळाले पाहिजे. ज्या शाळेत विद्यार्थी इयत्ता दहावीपर्यंत शिकला, त्याच शाळेत त्या विद्यार्थ्यांना प्रवेश मिळावा यासाठी शासनाने कोटा ठरवून देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, तिसरा मुद्दा असा आहे की, मुंबई शहराच्या क्षेत्रात वा एम.एम.आर.डी.च्या क्षेत्रात शासनाने ऑन लाईन प्रवेश प्रक्रिया सुरु करण्याचा निर्णय घेतलेला आहे. काही भागांना वगळण्याचा निर्णय घेतला आहे असे आम्ही वृत्तपत्रात वाचले आहे. ज्यांना या प्रक्रियेत समाविष्ट व्हावयाचे नाही वा सहभागी व्हावयाचे नाही त्यांना वगळयाची मुभा देणार आहात काय ? जुन्याच पध्दतीने प्रवेश प्रक्रिया सुरु ठेवण्यासंबंधी शासन त्यांना परवानगी देणार आहे काय ? कला, विज्ञान आणि वाणिज्य शाखेमध्ये एकूण किती जागा उपलब्ध आहेत. कोणत्या महाविद्यालयात किती जागा उपलब्ध आहेत यासंबंधीची माहिती माहिती पुस्तकात उपलब्ध होणार असली तरी वृत्तपत्रातून किंवा जाहिरातीच्या माध्यमातून ही माहिती लोकांपर्यंत, विद्यार्थ्यांपर्यंत,

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते...

पालकांपर्यंत पोहोचविण्याची आवश्यकता आहे. या संपूर्ण प्रक्रियेमध्ये सर्वांनी सहकार्य करणे आवश्यक आहे. या ठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, ही प्रक्रिया एका वर्षापूर्वीर सुरु व्हावयास पाहिजे होती. सन्माननीय सदस्यांचे म्हणणे बरोबर आहे. त्याची पूर्व तयारी करणे आवश्यक होते हे जरी खरे असले तरी आपण आता एक पाऊल पढे गेलेलो असल्यामुळे आपल्याला आता मागे येता येणार नाही. या संदर्भात आमदारांचे, खासदारांचे, पालकांचे, शैक्षणिक संस्थांच्या संचालकांचे, प्राचार्यांचे, मिडियाचे या सगळयांचे सहकार्य घेऊन ही प्रक्रिया आपल्याला कशा प्रकारे यशस्वीरित्या राबविता येऊ शकेल असा प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. धन्यवाद.

----------

**तालिका सभापती ( श्री. हेमंत पटले )** : माननीय शिक्षण मंत्र्यांच्या उत्तरासह ही चर्चा पूर्ण करावयाची असल्यामुळे मी सभागृहाची वेळ दुपारी 12.50 वाजेपर्यंत वाढविण्यात येत आहे. सन्माननीय सदस्यांनी आपापली मते थोडक्यात मांडावीत अशी माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे. आता श्री. अरविंद सावंत यांनी आपले भाषण सुरु करावे.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी उपलब्ध करुन दिली, त्याबद्दल मी आपले आभार मानतो. या विषयाच्या बाबतीत सन्माननीय सदस्यांची विस्तृत चर्चा मी ऐकलेली आहे. सध्या जे शिक्षण मंत्री आहेत, त्यांना शिक्षण क्षेत्राचा फार मोठा अनुभव आहे. त्यांच्याकडे सर्व फॅकल्टीच्या संस्था आहेत. त्यांच्या संस्थेत विद्यार्थ्यांना प्रवेश कसे दिलेत त्यासंबंधी त्यांना दांडगा अनुभव आहे. म्हणून यासंदर्भात मी एवढेच म्हणतो की, इयत्ता 12 वी च्या परीक्षेनंतर सी.ई.टी.ची परीक्षा होते. सी.ई.टी.परीक्षा योग्य आहे की अयोग्य हा एक वेगळाच वादाचा मुद्दा आहे. परंतु त्या ठिकाणी सी.बी.एस.ई.आलेले विद्यार्थी आणि एस.एस.सी.बोर्डाचे विद्यार्थी सगळेत सी.ई.टी.परीक्षेस बसतात आणि त्यातून जे विद्यार्थी पात्र होतात त्यांना इंजिनिअरींग, मेडीकल इत्यादी फॅकल्टीचा प्रवेश मिळतो. येथे नेमके उलटे असे घडते की, अशी तौलनिक परीक्षा घेण्याची कुठलीच सुविधा नसल्यामुळे सी.बी.एस.ई.आणि आय.सी.एस.ई. मधून उत्तीर्ण होणा-या विद्यार्थ्यांना अधिक गूण मिळतात. त्यांना भाषेचे विषय त्यांना नाहीत. एस.एस.सी.बोर्डाला भाषेचा विषय आहे. म्हणून या बोर्डातील विद्यार्थ्यांना कमी गूण मिळतात. म्हणून गेल्या वर्षी पर्सेन्टाईलचा घोळ निर्माण झाला होता. माझी एकच सूचना आहे की, आपण ऑन लाईन प्रवेश प्रक्रिया फॉर्म स्वीकारणार आहात. त्याची कट ऑफ डेट सरकारने ताबडतोबीने जाहीर करावी. ग्रामीण भागातील विद्यार्थी प्रवेशाच्या अडचणींवर मात कशी करता येईल याचा गांभीर्याने विचार करणे गरजेचे आहे. ग्रामीण भागात संगणकाच्या पुरेशा सुविधा उपलब्ध नाहीत ही गोष्ट मान्य आहे. परंतु प्रवेश प्रक्रियेस अजून 15 दिवसांचा अवधी आहे. या 15 दिवसांत ॲडमिशन कोणालाही ग्रँट करावयाचे नाही. आपण ही प्रवेश प्रक्रिया 10 तारखेस सुरु केली तर 25 तारखेपर्यंत ऑन लाईनवर प्रवेशाचे अर्ज स्वीकारले जातील. 25 तारखेनंतर प्रवेशाची प्रक्रिया सुरु होईल. या ठिकाणी ट्रॅफिक जामचा तांत्रिक मुद्दा उपस्थित झाला होता. ट्रॅफिक वाढले तर सर्व्हस आपोआप डाऊन होईल. सर्व्हर डाऊन झाला विद्यार्थ्यांना पुन्हा अनंत अडचणींना सामोरे जावे लागेल. सर्व्हर डाऊन जरी झाला व या प्रवेश अज स्वीकारण्यासाठी 15 दिवसाचा अवधी मध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश फॉर्म भरण्याची प्रक्रिया पूर्ण करता येईल.

यानंतर श्री. भोगले...

अग्रेषित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत........

दुसरा मुद्दा हा नैसर्गिक आहे. माझ्या मुलाला रुपारेल किंवा रुईया कॉलेजमध्येच ॲडमिशन मिळाले पाहिजे अशी प्रत्येक पालकाची इच्छा असते. परंतु रुपारेल कॉलेजमध्ये व्होकेशनलला ॲडमिशन मिळालेले पहिले 50 विद्यार्थी हे सीबीएसई किंवा आयसीएसई बोर्डाचे असतात, त्यामुळे त्या टप्प्यात एसएससी बोर्डाच्या विद्यार्थ्यांना ॲडमिशन मिळत नाही. सीबीएसई आणि आयसीएसई बोर्डाच्या विद्यार्थ्यांची संख्या अंदाजे 25 हजारच्या आसपास असते, परंतु एसएससी बोर्डाच्या विद्यार्थ्यांची संख्या 2.5 लाखाच्या घरात आहे. त्यामुळे शासनाने प्रत्येक कॉलेजमध्ये 5 टक्के जागा या सीबीएसई आणि आयसीएसई बोर्डाच्या विद्यार्थ्यांसाठी राखून ठेवाव्यात व उर्वरित जागा एसएससी बोर्डाच्या विद्यार्थ्यांना द्याव्यात, म्हणजे न्याय दिल्यासारखे होईल अशी सूचना करुन मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल धन्यवाद देतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, हा विषय मानला तर गंभीर आहे आणि म्हटले तर सोपा आहे. गंभीर एवढ्यासाठी आहे की, देशामध्ये लोकसंख्या वाढीवर आळा नसल्यामुळे संपूर्ण देशात शैक्षणिक परिस्थिती बिघडलेली आहे. शिक्षणासाठी पुढे येणाऱ्या मुलांना शिक्षण कसे द्यायचे ही मुळात चिंतेची बाब आहे. शैक्षणिकदृष्टया महाराष्ट्र हा देशात चौथ्या किंवा पाचव्या क्रमांकावर आहे असे आर्थिक पाहणी अहवाल सांगतो. त्यामुळे आपण त्यामध्ये फार पुढे आहोत असे म्हणून कौतुक करुन घ्यायची गरज नाही. केंद्र सरकारने माननीय श्री.अटलबिहारी वाजपेयी यांच्या पंतप्रधानपदाच्या काळात सर्वशिक्षा अभियान योजना देशभरात अंमलात आणली नसती तर महाराष्ट्रात काय झाले असते याचा फक्त विचार करा. या विषयाकडे गंभीरतेने पहात असताना वाढती विद्यार्थ्यांची संख्या, घटनात्मक अधिकार आणि घटनात्मक जबाबदारी विचारात घेता प्राथमिक शिक्षण सर्वांना देणे ही शासनाचीच जबाबदारी आहे. परंतु प्राथमिक शिक्षण दिल्यानंतर माध्यमिक शिक्षणाकडे जाणाऱ्या विद्यार्थ्यांचा ओढा कमी होत आहे. प्राथमिक शाळातील विद्यार्थ्यांची गळती याबाबत चर्चा केली जाते त्यावेळी आमच्या शिक्षकांचे काय होईल याची चर्चा करणारे शिक्षक प्रतिनिधी असल्यामुळे मी त्याबद्दल बोलणार नाही. तो विषय वेगळा आहे. दरवर्षी एसएससी परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये लाखाच्या संख्येने वाढ होत आहे. एमएमआरडीए क्षेत्रापुरता हा मर्यादित विषय असला तरी जवळजवळ 1/5 विद्यार्थी एमएमआरडीए भागातील असतात. हा प्रश्न अचानक का निर्माण झाला हे मला कळले नाही. या महाराष्ट्रातील शिक्षण विभागाला हा शाप आहे का? स्व.पी.जी.खेर शिक्षणमंत्री असताना त्यांनी महाराष्ट्राची तरुण पिढी गारद केली. प्रत्येक शिक्षणमंत्री हा दुराग्रही व हट्टी असतो. तो असे काही निर्माण करतो की त्यालाच चिकटून राहतो आणि वाटोळे झाले तरी चालेल, मी केले तेच बरोबर आहे ही त्याची भूमिका असते. काही काळापूर्वी श्री.वसंत पुरके हे शिक्षणमंत्री होती. त्यांनी किती हट्ट करावा. विदर्भामध्ये उन्हाळा अधिक असतो म्हणून जुलैपासून शैक्षणिक सत्र सुरु करावे याबाबत त्यांनी इतका हट्ट केला की त्यांना कोर्टाने चोपून काढले. त्यांच्या डोक्यातून सतत नवीन हट्ट निर्माण व्हायचा. त्यांनी आणखी दोन-तीन हट्ट केले. त्यांनी राज्यात दीड हजार शाळा वाटल्या. किरकोळ ही भानगड न करता होलसेल पध्दतीने शाळांचे वाटप केले. दीड हजार शाळांमध्ये 10 टक्के म्हणजे 150 शाळा स्वत:च्या पदरात पाडून घेतल्या. गोण्या भरुन अर्ज गोळा झाले. हे या

..3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.............

राज्यामध्ये काय चालले आहे? अनुदान न मिळणाऱ्या शाळा. विनाअनुदानित शाळांबाबत युध्द परवडले परंतु हे नको असे म्हणण्याची पाळी आली आहे. एक मंत्री म्हणाले आठवड्यात आदेश काढतो, दुसरे मंत्री म्हणाले, आठवड्यात आदेश काढतो. सन्माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदम म्हणाले आदेश काढतो.

...क्यू.1...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

सांगण्याचे तात्पर्य एवढेच की प्रत्येक वेळेस प्रत्येक मंत्री आपल्या शिक्षण खात्यामध्ये हट्ट करतो. माजी शिक्षण मंत्री प्रा. मोरे, ते सध्या हयात नाहीत म्हणून त्यांच्या बद्दल जास्त बोलणे उचित ठरणार नाही. परंतु त्यांचा एक हट्ट मला आवडला होता आणि त्याबाबत मी त्यांना सकाळी 6.05 वाजता फोन करुन त्यांचे अभिनंदनही केले होते. त्यांनी त्यावेळेस हट्ट धरुन असा निर्णय घेतला होता प्रत्येक शाळेत मुलींसाठी बाथरुमची व्यवस्था असावी. हा त्यांचा या पाच दहा वर्षातील एक क्रांतिकारी असाच निर्णय होता. परतु आमचे तडजोडीचे मंत्री आहेत त्यामुळे जाता जाता शेवटी आणि मावळत्या सरकारच्या मावळत्या काळात प्राप्त झालेले हे शिक्षण मंत्र्यांचे पद आहे. ज्याप्रमाणे विझणारा दिवा नेहमी जास्त प्रज्वल्लीत होतो असे दाखविण्याचा प्रयत्न कदाचित माननीय शिक्षण मंत्र्यांचा असेल. परंतु सध्याच्या माननीय शिक्षण मंत्र्यांचा अनुभव दांडगा आहे. तसेच हा अनुभव प्राथमिक पासून सर्व प्रकारच्या उच्च शिक्षणापर्यंतचा आहे. त्यामुळेच मला त्यांच्याकडून चांगल्या अपेक्षा आहेत. त्यांनी देखील असा ऑनलाईन प्रवेशासंबंधीचा हट्ट का धरावा, हे मला समजत नाही. वास्तविक जी.आर. काढताना आम्ही सर्व आमदार त्यांना भेटून विनंती केली होती की, ऑनलाईन प्रवेशाचा हा प्रयोग करण्यास आमचा विरोध नाही, आपल्या प्रयोगाचे आम्ही स्वागत करतो परंतु एकदम बदल न करता दोन्हीही पध्दती सुरु ठेवाव्यात. त्यावर ते म्हणाले की, हा निर्णय फक्त एमएमआरडीएच्या क्षेत्रापुरताच मर्यादित आहे. परंतु एमएमआरडीएचे क्षेत्र म्हटले तरी त्यात ठाणे जिल्हा आणि अर्धा जास्त रायगड जिल्हा समाविष्ट होतो. पण आम्ही करणार म्हणजे करणारच अशी भूमिका घेऊन हा जी.आर. काढण्यात आला. मला वाटते प्रत्येक शिक्षण मंत्र्यांना आपल्या काळात काही तरी नवीन करण्याची इच्छा असते. निवडणुका आल्यानंतर कोण कुठे असेल, कदाचित दुसरे सरकारही येईल आणि आपण कुठे असू हे सांगता येत नाही. जर हे दोन वर्षापूर्वी झाले असते तर त्यात दुरुस्त करण्याची संधी तरी मिळाली असती परंतु आता शेवटचाच कालावधी असल्यामुळे हे करण्याची घाई होत आहे. आमचा योजनेला विरोध नाही तर तिच्या अंमलबजावणीच्या संदर्भात ही चर्चा आहे. आम्ही आपला अहवालही स्वीकारलेला आहे आणि यापूर्वी त्या पध्दतीने माननीय उध्दवजींच्या नेतृत्वाखाली हजारोंच्या संख्येने सेंटर्स काढून विद्यार्थ्यांना मदत चालू केली आहे. काल माझ्या हस्ते 2-3



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ......

ऑनलाईनचे उद्‌घाटन केले आहे. कुठल्याही गोष्टीचे सोने कसे करावे हेच संस्कार माननीय शिवसेना प्रमुखांनी आमच्यावर केलेले आहेत. मी काल उद्‌घाटन करता केवळ तेवढ्यापुरतेच मर्यादित उद्‌घाटन केले नाही तर जे जे स्कॉलर विद्यार्थी आले होते त्यांच्या बाबतीत आमच्या कार्यकर्त्यांनाही विनंती केली की, ऑनलाईन प्रवेश घेण्याच्या वेळेस सर्वच फॅकल्टिजचा विचार करावा व तसा उल्लेख त्यात करावा. तसेच विद्यार्थ्यांचे कौन्सिलींग करुन त्यांना कुठल्या कुठल्या फॅकल्टिजमध्ये इंटरेस्ट आहे, कुठल्या फॅकल्टिजमध्ये त्यांना करियर करावयाचे आहे यासंबंधीचे मार्गदर्शन करावे. माननीय मंत्री महोदयांच्या कल्पनेतून ही योजना आलेली असल्यामुळे त्यांनी काही तरी चिंतन केलेच असेल पण तरी देखील आमची विनंती आहे की, ही योजना शासनाने राबवावी आणि नेहमीची पध्दती देखील सुरु ठेवावी. तसेच यावर्षी प्रायोगिक तत्वावर ही योजना राबवावी आणि पुढच्या वर्षात ती मार्गाला लावावी अशी विनंती करतो आणि आपल्या योजनेचे स्वागत देखील करतो परंतु मुलांची अडचण लक्षात घेऊन त्यांची देखील काळजी करतो यादृष्टीने ती राबवावी अशी पुन्हा विनंती करतो व माझे दोन शब्द संपवितो.

-------

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.वसंत पवार (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था ) : माननीय सभापती महोदयांनी मला या विषयाच्या संदर्भात बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी प्रथम माननीय सभापती महोदयांचे आभार व्यक्त करतो व त्यांना धन्यवाद देतो. शासनाने ऑन लाईन प्रक्रियेचा जो निर्णय घेतला त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. खरे म्हणजे या निर्णयाचे स्वागत सर्व सन्माननीय सदस्यांनी करावयास पाहिजे होते असे मला वाटते. आपण ऑन लाईन प्रवेश प्रक्रियेला कारण नसतांना घाबरत आहोत परंतु विद्यार्थी "ऑन लाईन" प्रक्रियेला मुळीच घाबरत नाहीत. विद्यार्थ्यांना आता संगणकाचे चांगले ज्ञान प्राप्त झालेले आहे. संगणकाच्या ज्ञानाबद्दल ते कॉम्पीटंन्ट आहेत. उलट आपल्या सारख्या पालकांनाच संगणकाचे ज्ञान कमी आहे. नवीन पिढी संगणकाचे शिक्षण चांगल्या प्रकारे घेत आहेत. माझ्या संस्थेत कॉलेज लेव्हचे तसेच पी.जी.लेव्हलचे प्रवेश "ऑन लाईन"च्या मार्फतच दिले जातात. ऑन लाईन पध्दत ही चांगली पध्दत आहे. "ऑन लाईन" पध्दतीमध्ये प्रवेश देतांना कोणतीही अडचण येत नाही. आता विद्यार्थ्यांची ग्रास्पींग पॉवर वाढलेली आहे.

सभापती महोदय, विधान भवनात संगणक प्रक्रियेला आताच सुरुवात झालेली आहे. विधानमंडळाने एसएमएसच्या माध्यमातून सन्माननीय सदस्यांना, अधिवेशन केव्हा सुरु होणार आहे याची माहिती देण्यास सुरुवात केलेली आहे. काही का होईना एसएमएस मार्फत माहिती देण्याची जी सुरुवात विधानमंडळाने केली आहे ती चांगली आहे.

श्री. जयंत पाटील : (खाली बसून ) एसएमएस मराठीतून दिला असता तर चांगले झाले असते.

डॉ. वसंत पवार : सभापती महोदय, इंग्रजीमधून एसएमएस देण्यास सुरुवात झालेली आहे ही चांगली सुरुवात आहे. त्यामुळे मी स्वत: माननीय सभापती महोदयांना यासंदर्भात धन्यवाद देतो.

सभापती महोदय, "ऑन लाईन"च्या संदर्भात माझ्या दोन तीन सूचना आहेत. "ऑन लाईन" पध्दतीमध्ये मॅनेजमेंट कोटयाला आपण धक्का लावून नये. मॅनेजमेंटचा कोटयाला अजिबात हात लावू नये. त्यांना जो काही कोटा ठरवून दिलेला आहे त्यामध्ये अजिबात हात लावू नये तसेच माझी दुसरी सूचना आहे की, दहावी पास झाल्यानंतर अकरावीमध्ये ॲडमिशन घेतांना एसएससी बोर्डाच्या विद्यार्थ्यांना 90 टक्के प्रवेश द्यावा व 10 टक्के प्रवेश सीबीएससी व आयसीएससीच्या विद्यार्थ्यांना द्यावा तसेच जे विद्यार्थी सीबीएसई किंवा आयसीएसईच्या माध्यमातून उत्तीर्ण झालेले

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.वसंत पवार...

आहेत त्यांना त्यांच्या कॉलेजमध्ये 90 टक्के कोटा द्यावा व 10 टक्के कोटा एसएससी बोर्डाच्या मुलांना द्यावा. ही पध्दत जर अंगीकारली तर त्यामध्ये कोणतीही अडचण येणार नाही. त्यामुळे राजीव गांधीचे संपूर्ण भारतात संगणकाच्या संदर्भात जे स्वप्न होते ते स्वप्न साकार करणे या सरकारला शक्य होईल. "ऑन लाईन"च्या संदर्भात महाराष्ट्र शासनाने राजीव गांधीचे स्वप्न पुर्ण करण्याच्या दृष्टीने उचललेले एक पाऊल आहे असे म्हटले तर ते चूक ठरणार नाही. महाराष्ट्र शासनाने "ऑन लाईन"च्या संदर्भात जे पाऊल टाकलेले आहे त्याचा आदर्श इतर राज्य सुध्दा घेतील अशी मला खात्री आहे.

सभापती महोदय, आमच्या कॉलेजच्या समोर आम्ही मंडप टाकतो व वायफाय पध्दतीने संगणकावर विद्यार्थ्यांना ॲडमिशन देतो त्यामध्ये काहीही अडचण येत नाही. "ऑन लाईन" प्रवेश प्रक्रियेच्या संदर्भात विद्यार्थ्यांना त्रास होऊ नये यासाठी अधिका-यांकडे जबाबदारी द्यावी अशीही विनंती करतो. महाराष्ट्र शासनाने प्रवेश प्रक्रियेच्या संदर्भात जी "ऑन लाईन" प्रक्रिया सुरु केली आहे त्याबद्दल महाराष्ट्र शासनास धन्यवाद देतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो.

------

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (शालेय शिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत तसेच अन्य सन्माननीय सदस्यांनी "ऑन लाईन"च्या संदर्भात या ठिकाणी विचार मांडलेले आहेत. सन्माननीय सदस्यांनी मुंबई आणि एमएमआरडीएच्या परिसरात "ऑन लाईन" विषयाच्या भूमिकेच्या बाबतीत आपली चिंता व्यक्त करीत असतांना काही चांगल्या सूचना देखील राज्यसरकारला केलेल्या आहेत. या योजनेची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे कशी करता येईल याबाबत सहकार्य करण्याची भूमिका देखील त्यांनी स्वीकारलेली आहे त्याबद्दल मी सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत करतो, अभिनंदन करतो.

सभापती महोदय, "ऑन लाईन" पध्दत सुरु करतांना मी नव्याने मंत्री झालो त्यामुळे मी "ऑन लाईन" पध्दत सुरु केली आहे असा अर्थ काढणे चुकीचा आहे. गत वर्षी प्रवेश प्रक्रियेत झालेल्या गोंधळाचा विचार करता आणि गत वर्षी दहावीचे निकाल जाहीर झाल्यानंतर ही प्रक्रिया सुरु करण्याचा प्रयत्न झाला होता व त्यामध्ये बहुतांशी गोंधळाची स्थिती निर्माण झाली होती. त्या गोंधळाची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून ही पध्दत आता थोडया अगोदर सुरु केली गेली. मी मान्य करतो की, "ऑन लाईन" प्रवेशाच्या संदर्भाला वन अॅकॅडेमिक इयर द्यावयास पाहिजे होते.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राधाकृष्ण विखे पाटील ...

दोन्ही बाजूचे काही सन्माननीय सदस्य तसेच पालकांचे शिष्ट मंडळ मला येऊन भेटले होते त्या वेळी त्यांनी मला असे सागितले की, या जटील व्यवस्थेतून सरकारने काही तरी चांगला मार्ग काढावा. गेल्या वर्षी प्रवेश प्रक्रियेमध्ये जो गोंधळ निर्माण झाला होता त्या बाबतीत सर्वांच्या सहमतीने मार्ग काढण्यात यावा अशा प्रकारची विनंती सर्वांकडून करण्यात आली होती . मुंबईतील प्रवेश प्रक्रियेसंबंधी सन्माननीय सदस्यांना जेवढी माहिती आहे त्या पेक्षा मला कमी माहिती आहे. परंतु प्रसार माध्यमातून , वर्तमानत्रातून मला काही माहिती मिळते किंवा सन्माननीय सदस्यांकडूनही मला काही माहिती मिळते त्यानुसार एका एका व्यक्तिला प्रवेशासाठी पाच ते दहा महाविद्यालयामध्ये रांगा लावाव्या लागतात. मुलाचे पालक एका महाविद्यालयातील रांगेत उभे राहतात, मुलाची आई दुस-या महाविद्यालयातील रांगेत उभी असते, स्वत: विद्यार्थी तिस-या महाविद्यालयातील रांगेत उभा राहतो किंवा काही वेळेस दुस-या व्यक्तीला एजंट म्हणून 100 रुपये देऊन रांगेत उभे राहण्यास सांगितले जाते. पहाटे पाच वाजल्यापासून या रांगा लागलेल्या असतात. आता पावसाळा सुरु होणार असल्यामुळे पालकांना त्रास होतो किंवा एखाद्या कुटुंबातील कोणी व्यक्ती आजारी असते त्याचे टेन्शन असते. त्याचबरोबर विद्यार्थ्यांच्या प्रवेशाचे टेन्शन पालकांना असते. काही वेळेस या विद्यार्थ्यांकडून पालकांना डबल टेन्शन देण्याचा प्रयत्न होत असतो. या त्रासा ऐवजी सुलभ पध्दत कशी आणता येईल या दृष्टीने ही पध्दत सुरु करण्याचा शासनाने विचार केला होता. म्हणूनच सर्व विचारांती शासनाने ऑन लाईन प्रवेश प्रक्रियेसंबंधीचा निर्णय घेतला होता. या निर्णयाच्या बाबतीत सन्माननीय सदस्यांनी काही भावना व्यक्त केल्या आहेत. जी जुनी पध्दत सुरु होती तीच चांगली होती असे वाटावयास नको अशा प्रकारची भावना सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केली होती. मुंबईच्या जन जीवनाशी त्यांचा संबंध असल्यामुळे व त्यांनी जी प्रवेश प्रक्रिया अनुभवली आहे त्यातून त्यांनी सरकारला या प्रवेश प्रक्रिये संबंधी सूचक इशारा दिलेला आहे. सभापती महोदय, त्यांनी ज्या सूचना केलेल्या आहेत त्या सूचनांचे मी स्वागत करतो . या चर्चेच्या निमत्ताने सन्माननीय सदस्यांनी जी चिंता व्यक्त केलेली आहे त्यातून अधिक जागरुकतेने सरकारने पावले टाकली पाहिजेत यासाठीच त्यांनी आपल्या भावना व चिंता व्यक्त केली होती. ही प्रवेश प्रक्रिया अधिक चांगल्या प्रकारे कशी करता येईल या दृष्टीने सरकारला अधिक चांगल्या प्रकारचे मार्गदर्शन त्यांच्याकडून मिळाले आहे. या प्रवेश

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राधाकृष्ण विखे - पाटील ..

प्रक्रियेमध्ये अनेक घटकांचा समावेश असतो. राज्य सरकारच्या वतीने मुंबईतील एमएमआरडीए क्षेत्रातील सर्व संस्था चालकांची तसेच प्राचार्याची एक बैठक रविंद्र नाटय मंदिरामध्ये घेतली होती. मुंबईतील लोकांशी पहिल्यांदाच संवाद झाला होता. त्या बैठकीसाठी 934 व्यक्ती हजर होत्या. सन्माननीय सदस्य श्री कपिल पाटील सुध्दा त्यावेळी हजर होते.त्यावेळी वेतनेतर अनुदान, तुकडयांची मान्यता , शिक्षण विभागातून होणारा त्रास इत्यादी अनेक गोष्टीवर त्या सर्वांनी टीका केली होती. त्यावेळी ही ऑन लाईन प्रवेश प्रक्रिया कशा प्रकारची आहे हे समजावून घेतले होते. ऑन लाईन प्रवेश प्रकिया सुरु करीत असतांना संस्था चालकांच्या हक्कावर कोणती गदा येणार आहे , मुलभूत ढाच्यामध्ये सरकार काही बदल करणार आहे काय अशा प्रकारचे अनेक प्रश्न निर्माण करण्यात आले होते त्या सर्व प्रश्नांचे स्पष्टीकरण त्याच फोरममध्ये शासनाने देण्याचा प्रयत्न केला होता. त्यानंतर मुंबईतील काही शिक्षण तज्ज्ञ आणि प्राचार्याशी चर्चा केली होती गत वर्षीच्या प्रवेश प्रक्रियेच्या धोरणासबंधी ज्या प्रसार माध्यमांनी वाभाडे काढले होते त्यासर्वाना चर्चेसाठी बोलावून त्यांच्याही सूचना आम्ही ऐकल्या होत्या व सरकारची भूमिका त्यांच्यासमोर मांडण्यात आली होती. त्यांनी ज्या काही सूचना केल्या होत्या त्या सूचना विचारात घेऊन त्या सूचनांचा अंतर्भाव या धोरणात केला होता. मायनॉरिटीज कॉलेजेसचे काही प्रश्न होते. या निर्णयाच्या निमित्ताने सरकार आपल्या हक्कांवर काही गदा आणत आहे काय असा त्यांचा प्रश्न होता तेव्हा सर्व मायनॉरिटीज कॉलेजेसच्या संस्थ्ां चालकांची आणि प्राचार्याची एक बैठक के.सी. कॉलेजमध्ये आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी 400 पेक्षा जास्त व्यक्ती उपस्थित होत्या. टी.एम. पै फाऊन्डेशनच्या निर्णयामध्ये सर्वोच्च न्यायालयाने जो निर्णय दिला होता त्याचा आदर राखून मायनॉरिटीज कॉलेजेसमध्ये 50 टक्के कोटा त्याना देण्यात आला होता त्यामध्ये सरकार कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप करणार नाही हे सरकारने स्पष्ट केले होते. मायनॉरिटीज कॉलेजेसना जो 50 टक्के कोटा देण्यात आला आहे त्यात अन्य काही व्यक्तिंना प्रवेश दिला जातो काय ,त्या ठिकाणी मागच्या दाराने कोणाला प्रवेश दिला जातो काय ? याबाबतीत सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी एक मुद्दा उपस्थित केला होता. त्या बाबतीत आम्ही त्यांना असे सांगितले होते की, सगळया प्रवेश प्रक्रिया झाल्यानंतर प्रवेशाच्या याद्या शासन निश्चित तपासून पाहणार आहे त्यामध्ये कोठे गैर प्रकार होणार नाही हे पाहिले जाईल..

3..



असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.राधाकृष्ण विखे पाटील .......

काही धार्मिक अल्पसंख्याकाची कॉलेजेस आहेत तर काही भाषिक अल्पसंख्याकांची कॉलेजेस आहेत. माननीय सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने कोठेही उल्लंघन होणार नाही हे पाहिले जाईल असे त्यांना पहिल्यांदाच सूचित करण्यात आलेले आहे त्याचबरोबर या महाविद्यालयाच्या चालकांना व प्राचार्यांना अशीही विनंती केलेली आहे की, जी मायनॉरिटीज कॉलेजेस आहेत त्यामध्ये 50 टक्के कोटा पहिल्या सात दिवसात पूर्ण करण्यात यावा.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राधाकृष्ण विखे पाटील...

आम्ही आमची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी सात दिवस थांबण्यास तयार आहोत. पहिल्या सात दिवसामध्ये तुमच्या मायनॉरीटीज कोटयाच्या जागा भरल्या की मग जनरल कोटयासाठी आमच्या जागा उपलब्ध होतील. त्यामुळे बॅकडोअर एन्ट्रीज होणार नाही. आणि म्हणून तुमचा कोटा तुम्ही सात दिवसात भरा. कारण जनरल कोटयामधून ती मुले प्रवेश घेणार आणि मायनॉरिटीजच्या जागा रिकाम्या ठेवणार. त्यामुळे जादा पैसे देऊन बॅकडोअर इंट्री घेऊन प्रवेश घेतले जातात अशा तक्रारी सातत्याने येत होत्या त्याला पायबंद घालण्यासाठी हा मुद्दा उपस्थित करण्यात आला त्यासाठी आपण सूचना दिल्या आहेत. सभापती महोदय, यामध्ये 5 टक्के मॅनेजमेंट कोटा होता. त्याबाबत सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांना मी सांगितले आहे की, यामध्ये पूर्ण अधिकार महाविद्यालयांचा आहे. यामध्ये आपण विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्यानंतर "आम्ही या विद्यार्थ्यांना प्रवेश दिला आहे" अशा विद्यार्थ्यांची यादी आपण सरकारकडे पाठवावी.. त्यामध्ये आम्ही तुमच्या अधिकार कक्षेवर बंधने घालणार नाही. किंवा 5 टक्के मॅनेजमेंट कोटयामध्ये हस्तक्षेप करणार नाही. हे आम्ही अतिशय स्पष्ट केले आहे. या मूलभूत गोष्टी आपण केल्या आहेत. त्याचप्रमाणे ज्या कनिष्ठ महाविद्यालये आणि शाळांकडे इंटरनेटची सुविधा आहे अशा जवळ जवळ 700 ते 800 शाळांचे प्राचार्य आणि मुख्याध्यापक यांची एक बैठक रुईया कॉलेजमध्ये झाली. त्यांना याबाबत शासनाची भूमिका समजावून सांगण्यात आली. त्यांनी यामध्ये पूर्ण सहकार्य देण्याचे मान्य केले आहे. त्याचप्रमाणे सभापती महोदय, मुंबई पॅरन्टस टिचर्स असोसिएशन या पीटीएच्या घटकांना आपण बोलाविले होते. त्यावेळी जवळ जवळ 500 च्या वर घटक हजर होते. त्यांना सुध्दा ही भूमिका समजावून सांगितली. त्यामध्ये पालकांच्या काय अडचणी आहेत, विद्यार्थ्यांच्या बाजूने काय अडचणी आहेत त्याबाबत त्यांची देखील भूमिका समजावून घेतली. मुंबईच्या परिक्षेत्रातील सर्व सन्माननीय आमदारांना विनंती केल्यानंतर राज्य सरकारची विनंती मान्य करुन ते या बैठकीला उपस्थित राहिले. त्यावेळी देखील बऱ्याच आमदारांकडून सूचना करण्यात आल्या. त्या सूचनांचा अंतर्भाव आम्ही राज्य शासनाच्या धोरणामध्ये केला आहे. हे सर्व करीत असतांना यामध्ये मी सुरुवातीला सांगितले की, जे स्टेक होल्डर आहेत त्यांचा यामध्ये विचार झालेला आहे. राज्य सरकारची हीच भूमिका राहिली आहे की, यापुढील काळात फी रेगुलेटरी ॲथॉरिटी आणतांना मोठया प्रमाणावर फी

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ MAP/

श्री. राधाकृष्ण विखे पाटील...

वाढीचा जो प्रश्न निर्माण झाला आहे. त्याबाबतची कार्यवाही एक महिन्यात सुरु होईल. त्यावेळी सर्व स्टेक होल्डर्सना आपण बोलावीत आहोत. त्यामध्ये सन्माननीय आमदारांचे सुध्दा म्हणणे ऐकून घेतले जाणार आहे.शेवटी त्यामध्ये पालकांचे शोषण होते. सहावा वेतन आयेग लागू करण्याच्या नावाखाली मोठया प्रमाणात भरमसाठ फी वाढविण्याचे प्रकार सुरु आहेत. त्याबाबत आपण स्पष्ट निर्देश दिले आहेत. त्यामुळे बहुतांशी विद्यालयांनी आपली फी वाढ थांबविली आहे. आणि वाढीव घेतलेली फी परत करण्यास सुरुवात केली आहे. सांगण्याचा मुद्दा असा की, स्टेक होल्डरमध्ये ज्यांचा ज्यांचा समावेश आहे, त्यामध्ये लोकप्रतिनिधी म्हणून जे लोक आमच्यासमोर प्रश्न मांडतात. त्यांची उत्तरे राज्य सरकारकडून आपल्याला मिळाली पाहिजेत. लोकांचे प्रश्न राज्य सरकारकडून सुटले पाहिजेत म्हणून लोकांचा सन्माननीय आमदारांवर दबाव असतो. त्यामुळे त्यांची भूमिका गैर नाही. त्यांनी उपस्थित केलेले प्रश्न हे सरकारला मार्गदर्शन करणारे असतात असे मी सुरुवातीला सांगितले. त्यामधून आमचे सुध्दा उद्बोधन होत आहे. समाजाचे प्रश्न आमदारांच्या, या सभागृहाच्या माध्यमातून थेट सरकारपर्यंत येतात. ते सोडविण्यासाठी आम्हाला वेगवेगळया पर्यायाचा शोध घ्यावा लागते. सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी महत्वाचे मुद्दे उपस्थित केले. त्यामध्ये एमकेसीएलचा मुद्दा होता. सर्व्हरच्या बाबतीत प्रश्न उपस्थित केले. मॉक ड्रीलच्या बाबतीत प्रश्न होते. काल मॉक ड्रील झाली. आम्ही जी तात्पुरती व्यवस्था निर्माण केली होती त्यामध्ये पहिल्यांदाच 5228 विद्यार्थ्यांनी लॉग ऑन केले होते.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील . . . .

तसेच एक लाखाच्यावर हिटस् आमच्या साईटला मिळालेल्या आहेत. आपण दोन तासाचा सर्व्हर टाईम दिलेला होता. त्याच्यामध्ये किती लॉगिंग होऊ शकते ? त्यामध्ये आणखी काही बदल करावा लागेल काय ? याला बऱ्याच ठिकाणी उत्तम प्रतिसाद मिळाला आहे. तसेच यामध्ये पासवर्ड वगैरे काही नाही. त्यामध्ये आय-डी वगैरे काही नाही, स्कूल कोड नंबर नाही. तुम्ही एस.एस.सी.च्या परीक्षेला जाण्यापूर्वी जो डाटा भरलेला आहे, तो डाटा आधीच आमच्या बोर्डाने ऑन लोड केलेला आहे. आता अतिशय सोपा फॉर्म असून तो इंग्रजी व मराठी या दोन्ही भाषेमध्ये आहे. विद्यार्थ्यांनी फक्त त्यांच्या परीक्षेचा रोल नंबर लॉगिंग करावयाचा आहे. मग तुमचा फॉर्म समोर येतो आणि त्या मध्ये सगळी माहिती भरलेली आहे. फक्त विद्यार्थ्यांसाठी एकच काम ठेवण्यात आलेले आहे आणि ते म्हणजे टीक करावयाची, म्हणजे विद्यार्थ्यांना कोणता विषय घ्यावयाचा आहे, कोणत्या महाविद्यालयामध्ये प्रवेश पाहिजे. उद्या राज्य शासनाच्यावतीने आमची ऑफिशिअल वेब साइर्ट लाँच होत आहे आणि त्यात सर्व महाविद्यालयांची माहिती आहे. त्यानुसार त्या-त्या महाविद्यालयांमध्ये गेल्या वर्षी किती टक्क्याला शेवटची ॲडमिशन बंद झाली आहे ते देखील दाखविण्यात आले आहे. उदाहरण द्यावसयाचे तर जर एखाद्या विद्यार्थ्याला कल्पना असेल की, मला 60 टक्क्यापर्यंत परसेंटेज मिळणार आहे. तर मी 90 टक्क्यापर्यंत का जावे ? तशी त्याला परवानगी आहे, आपण त्याला थांबविलेले नाही. पण त्या विद्यार्थ्याला किमान गेल्या वर्षी महाविद्यालयांमध्ये किती टक्क्याला शेवटची ॲडमिशन बंद झाली आहे याची त्याला माहिती असावी हा उद्देश आहे. जे विकल्प उपलब्ध आहेत, त्याची माहिती दिलेली आहे म्हणजे मग त्याने पहिल्या 20 महाविद्यालयामध्ये अर्ज करावा. पण आपण विद्यार्थ्यांना कोणत्याही महाविद्यालयामध्ये प्रवेश घेण्यापासून थांबविलेले नाही. या मॉक ड्रिलच्या निमित्ताने सर्व्हर टेस्टींगचा भाग होता. मी स्वत: हिंदूजा कॉलेजमध्ये हजर होतो. त्यावेळी माझ्याबरोबर विधानसभेचे सहकारी मित्र श्री.अरविंद नेरकरसाहेब होते. त्यांनी तेथे प्रशिक्षण केंद्र सुरु केले आहे. त्यावेळी 500 च्यावर मुले केंद्रामध्ये होती. माझ्याकडे सगळया मुलांच्या सह्या आहेत, प्रत्येकाकडे मोबाईल नंबर आहेत, त्यासंबंधातील कागद माझ्याकडे आहे. त्यावेळी मी सर्व विद्यार्थ्यांना विचारीत होतो की, यामध्ये काय अडचणी आहेत ? याबाबतीत काय केले पाहिजे ? पण बहुतांशी विद्यार्थ्यांनी याचे स्वागत केले आहे. लॉग-इन करताना रोल नंबर लॉग-इन केल्यावर संपूर्ण माहिती भरलेला अर्ज आपोआप समोर येतो. मला असे वाटते की, पूर्वी एवढी सोपी पध्दत

. . . .यु-2

नव्हती. या सर्व पार्श्वभूमीवर सन्माननीय सदस्यांनी एम.के.सी.एल.बाबत मुद्दा उपस्थित केलेला आहे.मला सांगितले पाहिजे की, आज राज्यामध्ये होणाऱ्या सगळया सी.ई.टी.च्या परीक्षा होतात, मग त्या इंजिनिअरींगच्या असतील, मेडिकलच्या असतील, फार्मसीच्या असतील, बी.एड.किंवा डी.एड.च्या असतील, या विभागामध्ये लक्षावधी विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. या सर्व सी.ई.टी.च्या परीक्षांची प्रक्रिया एम.के.सी.एल.च्या मार्फत होते.म्हणून एम.के.सी.एल.ला सी.ई.टी.च्या सर्व परीक्षांच्या बाबतीत माहिती असल्यामुळे आणि राज्य सरकारचे नॉलेज कॉर्पोरेशन असल्यामुळे, आपण आणखी खाजगी संस्थेकडे हे काम देण्यापेक्षा, ज्यांनी अगोदरच सी.ई.टी.च्या परीक्षांच्या बाबतीत काम केलेले आहे, म्हणून त्यांचा अनुभव लक्षात घेता एम.के.सी.एल.कडे काम दिलेले आहे. त्यामुळे याबाबतीत अडचण काही अडचण येणार नाही. आपल्याला जी प्रक्रिया पूर्ण करावयाची आहे, ते करीत असताना ऑन लाईन करण्यासाठी एक पुस्तक काढण्यात आलेले आहे. अशी जवळजवळ तीन लाख पुस्तके छापलेली आहे. परंतु हे पुस्तक एवढे मोठे का दिसते ? कारण मुंबईचे 20 झोन करण्यात आलेले आहेत. तेव्हा प्रत्येक झोन कोणकोणती कॉलेजेस् येतात. तेथे कोणकोणती फॅकल्टी आहे, त्यांचे फोन नंबर काय आहेत याची माहिती असल्याने हे पुस्तक वाढलेले आहे. त्यामध्ये एक फॉर्म दिलेला आहे.

श्री.अरविंद सावंत (खाली बसून) : आम्हाला देखील ते पुस्तक द्यावे.

श्री.राधाकृष्ण विखे पाटील : सभापती महोदय, आम्ही हे पुस्तक उद्या वितरीत करीत आहोत. या पुस्तकामध्ये प्रीॲम्बलपासून सगळया गोष्टी छापलेल्या आहेत. ज्या शाळेमध्ये मदत केंद्र आहे, त्या शाळेचे नाव, यामध्ये कोण जबाबदार रहाणार आहे त्या व्यक्तीचे नाव, त्यांचे फोन नंबर वगैरे सगळे आहे. थोडक्यात हेल्प लाईन प्रमाणे प्रत्येक महाविद्यालयाची माहिती त्यामध्ये अंतर्भूत केलेली आहे. फक्त शासनाने हे पुस्तक वाचण्यासाठी काही व्यवस्था केलेली नाही एवढाच यातील एक भाग आहे. विद्यार्थ्याने हे पुस्तक वाचावे अशी यातील भूमिका आहे. आपण सूचना केल्याप्रमाणे या पुस्तकामध्ये फॉर्म सुध्दा दिलेला आहे. एक रंगीत व्ह्युजल टाकलेले आहे की, मुलांनी फॉर्म कशा प्रकारे भरावा याचे एक चित्र व्ह्युजलाईज केलेले आहे. या पुस्तकामध्ये देण्यात आलेला फॉर्म जरी विद्यार्थ्यांनी काढून व्यवस्थितपणे भरावयास पाहिजे.मुंबईमध्ये जवळजवळ 874 मदत केंद्रे आणि महाविद्यालये असून केवळ 751 महाविद्यालयांमध्ये प्रवेश होणार आहे. परंतु मुंबईमध्ये 350

. . . .यु-3

08-06-2009 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) U-3

च्यावर सबमिशन सेंटर्स् आहेत आणि दहावीच्या विद्यालयांमध्ये इंटरनेटची सुविधा आहे. ज्याठिकाणी फॉर्म भरुन दिला जातो अशी 800 केंद्रे आहेत.

यानंतर कु.थोरात . . . .

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील ....

एम.के.सी.एल.चे 600 केंद्र नोटिफाईड केले आहेत. शासन ते केंद्र सुरु करीत आहे. एम.के.सी.एल.चा प्रतिनिधी, त्या सेंटरवर रहाणार आहे, संबंधित महाविद्यालयाचा एक प्रतिनिधी सुध्दा महाविद्यालयात थांबणार आहे. तसेच ज्युनियर कॉलेजचा किंवा शाळेचा पर्यवेक्षक किंवा मुख्याध्यापक याला जबाबदार रहाणार आहे. त्या सर्वांची नावे या पुस्तिकेमध्ये छापलेली आहेत. त्यामुळे विद्यार्थी त्याठिकाणी गेल्यानंतर, त्यांनी कोणाकडे माहिती विचारावयाची याबाबतचा प्रश्न उदभवणार नाही. सन्माननीय सदस्यांनी, या ठिकाणी झोपडपट्टीचा मुद्दा उपस्थित केला आहे. त्याबाबतचे मॅपिंग शासनाने केलेले आहे. उदाहरणार्थ रात्रशाळा, झोपडपट्टी क्षेत्र, आदिवासी क्षेत्र, फोर्ट, मशिद बंदर, कुलाबा, गिरगाव, गँटरोड, भायखळा, काळाचौकी, परेल, दादर, धारावी, सायन, माटुंगा, वडाळा, माहिम आणि वरळी या भागाचे मॅपिंग केलेले आहे. एकूण 57 रात्र माध्यमिक शाळा आहेत. या शाळांमधील 1595 विद्यार्थी इयत्ता बारावीच्या परीक्षेला बसले होते. या शाळांचा 85 टक्के निकला अपेक्षित धरला तर 1352 विद्यार्थी पास होतील. त्यांच्यासाठी त्या भागामध्ये 27 मदत केंद्र उघडण्यात येणार आहेत. रिझल्ट लागल्यानंतर फॉर्म भरण्यासाठी या विद्यार्थ्यांना 7 दिवसांचा कालावधी देण्यात येणार आहे. या 7 दिवसांच्या कालावधीमध्ये विद्यार्थी कधीही ऑन लाईनवरुन फार्म भरु शकतात. सदर फॉर्म भरण्याची मुदत वाढविण्यात यावी अशी डॉ. दीपक सावंत यांनी मागणी केलेली आहे, त्याबाबतीत विचार करता येईल. परंतु या 7 दिवसाच्या कालावधीत 1352 विद्यार्थी जवळच्या केंद्रावर जाऊन फॉर्म सबमिट करु शकतात. या 1200 ते 1400 केंद्रापैकी कुठल्याही केद्रावर विद्यार्थी फॉर्म सबमिट करण्यासाठी गेल्यानंतर त्यांना कुठल्याही प्रकारची फी आकारली जाणार नाही. राज्य शासनाने मोफत ऑन लाईन फॉर्म भरण्याची व्यवस्था केलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी दुसरा मुद्दा उपसिथत केला की, हा फॉर्म फक्त ऑन लाईनच भरावयाचा आहे काय? तर असे नाही. विद्यार्थी फॉर्म भरुन जवळच्या केंद्रावर सबमिट करण्यासाठी गेल्यानंतर सदर केंद्रावर ते फॉर्म स्वीकारण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यासाठी विद्यार्थ्यांना पैसे लागणार नाहीत. याठिकाणी 125 रुपयाचा मुद्दा उपस्थित करण्यात आलेला आहे. विद्यार्थ्यांनी फॉर्म घेऊन सबमिशन सेंटरवर जाणचे कारण असे की, त्या विद्यार्थ्याचे जातीचे प्रमाणपत्र असेल, स्काऊट ॲन्ड गाईड मध्ये भाग घेतलेला असेल, खेळात प्रावीण्य

मिळविलेले असेल, फ्रिडम-फायटरचा पाल्य असेल किंवा अन्य काही प्रमाणपत्रांच्या तपासणीची





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आवश्यकता आहे, ती व्यवस्था अद्याप ऑन-लाईनवर होऊ शकत नाही. किमान फॉर्म मिळविण्यासाठी दहा कॉलेज समारे लाईनमध्ये सात-सात तास उभे रहावे लागत होते, तो मानसिक छळ कमी झालेला आहे. फॉर्म भरण्याचीही अडचण नाही. तो मॅन्युअली देण्यात आलेला आहे. फक्त तो त्या सेंटर्सवर जाऊन सबमिट करावयाचा आहे. विशेष करुन यातून काही आदिवासी भाग वगळण्याच्या सूचना आलेल्या आहेत त्याचा शासनाच्या माध्यमातून विचार करण्यात येईल. ज्या भागामध्ये इंटरनेटची सोय नाही त्या ठिकाणचे विद्यार्थी इंटरनेटवर फॉर्म कसे भरतील असा प्रश्न आहे. त्या भागातील शिक्षक प्रशिक्षित करण्याचा कार्यक्रम सुरु झालेला आहे. त्यामुळे त्याठिकाणच्या विद्यार्थींचे देखील फार्म भरुन घेण्यात येणार आहेत जवळच्या सेंटरवर ऑनलाईन फॉर्म भरण्याची व्यवस्था शासनामार्फत करण्यात येईल. त्यामुळे त्या विद्यार्थ्यांना फॉर्म भरण्यासाठी 50 ते 100 मैल प्रवास करुन येण्याची आवश्यकता रहाणार नाही. अशा प्रकारची सोपी पध्दत करण्याचा प्रयत्न केलेला आहे. विद्यार्थ्यांनी भरलेला फॉर्म घेऊन येताना ते फॉर्म प्रवासात गहाळ झाले तर काय करणार? असाही प्रश्न याठिकाणी उपस्थित होऊ शकतो. त्यामुळे यादृष्टिकोनातून सगळी काळजी घेण्यात येईल. मला असे वाटते की, हायपोथेटिकल कन्सिडरेशन ठेवले पाहिजे. सगळे धोके लक्षात घेतले पाहिजेत. या चक्रव्युहातून कसे बाहेर पडावयाचे आहे, याबद्दल मी या ठिकाणी सांगितलेले आहे. यातून या सगळया गोष्टी ॲन्टिसिपेट केलेल्या आहेत. सगळयात महत्वाचे असे की, फॉर्म भरल्यानंतर समजा एखाद्या मुलुंडच्या विद्यार्थ्यांने, त्याच्या फॉर्मवर दादरचे पहिले कॉलेज निवडलेले असेल तरी त्याला दादरला जाण्याची आवश्यकता रहाणार नाही. मुलुंडच्या झोनमध्ये जी महाविद्यालये निवडण्यात आलेली आहेत त्यापैकी जवळच्या महाविद्यालयात जाऊन त्या विद्यार्थ्याला तो फॉर्म सबमिट करता येईल. त्याने त्याठिकाणी जाऊन फार्म सबमिट केल्यानंतर, त्याबाबतची पावती त्या कॉलेजकडून देण्यात येईल. त्याला पावती देण्यात आली म्हणजे, त्याचा फॉर्म ॲक्सेप्ट झालेला आहे. त्यामुळे प्रवेशाच्यावेळी त्याचे नाव त्या कॉलेजच्या यादीमध्ये आलेले आहे काय हे पहाण्यासाठी त्याला जाण्याची आवश्यकता रहाणार नाही. विद्यार्थ्यांना दोन प्रकारे यासंबंधिची माहिती मिळेल. जवळ जवळ 99 टक्के मुलांकडे मोबाईल आहेत. तसेच त्यांच्या पालकांकडेही मोबाईल आहेत.प्रवेश प्रक्रियेसंबंधिची माहिती महाविद्यालयामध्ये डिस्पले करण्यात येणार आहे. इंटरनेटवर सुध्दा ती यादी डिस्प्ले करण्यात

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील....

येईल तसेच त्यांच्या मोबाईलवर एस.एम.एस. करुन, त्यांना कोणत्या दोन कॉलेजे्समध्ये ॲडमिशन मिळालेले आहे, हे कळविण्यात येईल. त्याशिवाय विद्यार्थ्यापर्यंत आणखी कोणत्या प्रकारे ही माहिती पुरविण्यात यावी याबाबतीत सन्माननीय सदस्यांच्या काही सूचना असतील तर त्याचा सुध्दा विचार करता येईल.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील .....

आम्ही या तीन गोष्टी निवडलेल्या आहेत. विद्यार्थी इंटरनेटवर जाईल. त्यात कोणते कॉलेज मिळाले याची माहिती आहे. एसएमएसच्या बाबतीत मी मघाशी सांगितले तसेच कॉलेजमध्ये नॉर्मल यादी लागणार आहे. त्यांना दोन विकल्प दिलेले आहेत. पहिला विकल्प देताना जर त्याच्या लक्षात आले की, आपल्याला दुसऱ्या स्ट्रिमला ॲडमिशन मिळणार आहे, कारण दुसऱ्या कॉलेजच्या ॲडमिशनमध्ये दुसऱ्या राऊंडमध्ये जागा उपलब्ध आहे तर त्याचा जो पहिला विकल्प आहे तो सोडून तो दुसऱ्या राऊंडला दुसऱ्या कॉलेजमध्ये मेरीट लिस्ट प्रमाणे त्याचे नाव अप होत राहील आणि त्या ठिकाणी त्याला प्रवेश घेता येईल. ते काही आम्ही रद्द करणार नाही. प्रचलित पध्दतीमध्ये सुध्दा इंजिनिअरींग कॉलेज वगैरेच्या ॲडमिशनच्या बाबतीत असे आहे की, एकदा आपण ॲडमिशन घेतली की, आपल्याला परत मागे जाता येत नाही.

श्री. विनोद तावडे : किती विद्यार्थ्यांकडे मोबाईल आहे वगैरे बाब सोडून द्यावी पण ज्या सब्मीशन सेंटरला फॉर्म सब्मीट केला आहे तिथे जर कळले की मला कोठे ॲडमिशन मिळाली आहे तर ते योग्य होईल. समजा मुलुंडच्या कॉलेजमध्ये 2500 फॉर्म सब्मीट झाले तर त्या 2500 विद्यार्थ्यांची यादी त्या कॉलेजमध्ये जर लागली तर सगळेच कन्फ्युजन संपून जाईल असे मला वाटते.

श्री. राधाकृष्ण विखे पाटील : सभापती महोदय, तशी काही अडचण नाही. म्हणून मी म्हटले की, सन्माननीय सदस्यांनी सूचना करावी. विद्यार्थ्याला असे वाटते की, ज्या ठिकाणी आपण फॉर्म सादर केला त्याच सेंटरला परत जाऊन चौकशी करावी. त्या ठिकाणी सुध्दा आपण यादी डिस्प्ले करु. मुंबईच्या जागेच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. मोते यांनी प्रश्न उपस्थित केला होता. मुंबईमध्ये कला विभागाच्या 43129 जागा आहेत. विज्ञान विभागाच्या 62521 जागा आहेत. वाणिज्य विभागाच्या 1 लाख 47 हजार जागा आहेत. बायफोकलच्या 9452 जागा आहेत आणि एमसीव्हीसीच्या 2515 आहेत. याप्रमाणे एकूण 2 लाख 64 हजार 783 जागा एमएमआरडीए क्षेत्राच्या अंतर्गत आहेत. इयत्ता दहावीच्या परीक्षेला बसलेले विद्यार्थी 2 लाख 80 हजार 912 आहेत आणि 85 टक्के निकाल जरी लागला तरी 2 लाख 38, 770 विद्यार्थी पास होतील. आपल्याकडे

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ SBT/

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील ....

2 लाख 64 हजार 783 जागा आहेत. म्हणजे कोठेही, कोणीही इयत्ता अकरावीच्या प्रवेश प्रक्रियेपासून वंचित राहणार नाही याची काळजी घेतलेली आहे. परंतु रिजनल बॅलंस ठेवण्यासाठी उद्या जर विशिष्ट भागामध्ये, वसई विरार भागाला ऑन लाईनमध्ये घेण्याचे कारण असे आहे की, त्या भागातील मुले तिकडे प्रवेश घेणार आहेत परंतु त्या भागातील काही मुले गुणवत्ता यादीमध्ये आल्यानंतर उद्या त्यांना जादा गुण मिळाले आणि त्यांना लोकलव्दारे मुंबईमध्ये येण्याची इच्छा असेल तर त्याला वंचित ठेऊ नये. अन्यथा त्या भागात त्यांचे प्रवेश होणारच आहेत. ज्या ठिकाणी वाढीव तुकड्या मागतील त्यांना तुकडी देण्याच्या सूचना उपसंचालकांना दिलेल्या आहेत. परत सरकारकडे प्रस्ताव पाठवू नका अशा सूचना दिलेल्या आहेत. वाढीव तुकडीची मागणी आली आणि शेवटच्या राऊंडला कोणाला पाहिजे असेल, काही विद्यार्थी राहिले असतील त्याबाबत सूचना दिलेल्या आहेत. पण टक्केवारी आणि आकडेवारी पाहिली तर तशी काही परिस्थिती नाही. सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी सुनियोजन वेळेत करण्याच्या संदर्भात सूचना केली. त्यांनी दोन तीन महत्वाच्या सूचना केल्या. त्यांनी अवेअरनेसबाबत सूचना केली. त्यांनी सांगितले की, ॲग्रेसिव्हली कॅम्पेन व्हावयास पाहिजे. आम्ही आता डिजिटल बोर्ड करुन ऑन लाईन प्रवेश प्रक्रिया कशी करावी, फॉर्म कसा भरला पाहिजे याअनुषंगाने सगळ्या महत्वाच्या ठिकाणी बोर्ड डिस्प्ले करीत आहोत. वर्तमानपत्रातील जाहिरातीच्या माध्यमाचा उपयोग करणार आहोत. इन्सर्शनचा उपयोग करणार आहोत. आवश्यकता वाटल्यास वेगवेगळ्या भागामध्ये रिजनल सेंटरवर पालकांचे किंवा विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण घेण्याची कार्यवाही करता येईल. मला सन्माननीय सदस्यांना सांगितले पाहिजे की, अनुदानित प्राचार्य संघटना, विनाअनुदानित प्राचार्य संघटना आणि ज्युनिअर कॉलेज प्राचार्य संघटना या सगळ्यांनी सरकारच्या पुढाकाराला आपला पाठिंबा देऊ केलेला आहे. ही सगळ्यात महत्वाची गोष्ट आहे. कारण त्यांच्या सहकार्याशिवाय सरकार हे काम करणे शक्य नाही. त्यांनी स्वत:हून पुढाकार घेतला आणि आम्हाला सांगितले की, आम्ही आता या प्रक्रियेमध्ये सरकारबरोबर आहोत. सन्माननीय सदस्यांची ऑफ लाईनची जी सूचना होती त्याबाबत सांगू इच्छितो की, ऑन लाईन प्रक्रिया आहे पण मॅन्युअली फॉर्म भरुन घेण्याच्या संदर्भात मी सांगितले.

...3...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ SBT

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील ......

ते आम्ही करणारच आहोत. ते फॉर्म भरुन घेतले जातील. विद्यार्थी नजिकच्या सेंटरवर जाईल. धारावीचा जो प्रश्न आहे त्याबाबत सांगू इच्छितो की, झोपडपट्टीचे टोटल मॅपिंग केल्यामुळे मुंबईतील सर्व झोपडपट्ट्यांचे मॅपिंग आहे. आदिवासी भागातील मुलांचे मॅपिंग आहे. म्हणून ती काळजी घेतलेली आहे. लोड शेडींगचा प्रश्न आहे. ज्या ठिकाणी लोड शेडींग होणार आहे त्याबाबत आम्ही राज्य विद्युत मंडळाच्या मुख्य अभियंत्यांशी त्या भागामध्ये निदान प्रवेश प्रक्रियेच्या काळामध्ये लोड शेडींगचे वेळापत्रक बदलता येईल काय याबाबत चर्चा केली. दुसरे म्हणजे जनरेटर उपलब्ध करण्याच्या संदर्भात शासनाने सक्ती केलेली नाही.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील....

त्याठिकाणी आवश्यकता वाटल्यास शाळेला जनरेटर उपलब्ध करुन देण्याबाबत मदत करु.

डॉ.दीपक सावंत : शासनाने त्या परिपत्रकामध्ये जनरेटर वा इन्व्हर्टरचा उल्लेख केलेला आहे.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : त्या परिपत्रकामध्ये शासनाने तशी सूचना केली आहे. शाळा जनरेटर वा इन्व्हर्टर उपलब्ध करुन देण्यासंबंधी असमर्थ असेल तर सरकार मदत करण्यास तयार आहे. परंतु त्या परिपत्रकात जनरेटर वा इन्व्हर्टरचा उल्लेख नव्हता असे कोणीही म्हणू नये यासाठी त्यात त्याचा उल्लेख केलेला आहे. सरकार आपल्या अधिकारांचा गैरवापर करीत आहे असे म्हणणे चुकीचे आहे. आपल्याला सकारात्मक भूमिकेतून जावे लागेल. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी कौन्सिलिंगच्या संदर्भात सूचना केली आहे. ही सूचना स्वागतार्ह आहे. त्यासंबंधी जरुर विचार करता येईल. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी सीबीएसई व आयसीएसई या मंडळामध्ये असलेली गणित व सायन्स या विषयांची पाठ्यपुस्तके एसएससीच्या अभ्यासक्रमात समाविष्ट करावीत अशी सूचना केली आहे. या सूचनेचा विचार करण्यात येईल. सीबीएसई व आयसीएसईच्या बोर्डाकडून मराठी माध्यमातील मुलांवर गुणांच्या संदर्भात अन्याय होतो असे म्हटलेले आहे. याबाबत सरकार गंभीरपणे विचार करीत आहे. 90 टक्के जागा एसएससीच्या विद्यार्थ्यांसाठी राखून ठेवाव्यात अशाप्रकारची भूमिका सरकार घेत आहे. ही बाब कायदेशीररित्या पडताळून पहात आहे. आवश्यकता वाटल्यास सरकार न्यायालयासमोर आपली बाजू मांडील. परंतु एसएससी बोर्डाच्या विद्यार्थ्यांवर अन्याय होता कामा नये यासाठी सरकारची न्यायालयात जाण्याची तयारी आहे. ऑनलाईन पध्दत पारदर्शक असेल. शासनाचा हा बालहट्ट नाही. शासन पालकांचा हट्ट पूर्ण करण्याचा प्रयत्न करीत आहे. एमकेसीएलसंबंधी सभागृहात अनेक मुद्दे उपस्थित झाले आहेत. सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनांचे मी स्वागत करतो. या सूचना सरकारला मदत करणा-या आहेत. सरकार कोणत्याही महाविद्यालयाच्या व्यवस्थापनामध्ये हस्तक्षेप करणार नाही. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी कालच एका मदत केंद्राचे उद्‌घाटन केल्याचे टी.व्ही.वर मी पाहिले आहे. त्याप्रमाणे सर्व सामाजिक संघटनांनी याबाबत पुढाकार घ्यावा आणि सरकारला ही योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी सहकार्य करावे अशी विनंती करतो.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सन्माननीय शिक्षण मंत्र्यांनी चांगले समर्पक उत्तर दिले आहे. परंतु जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये शिकणारे चांगले विद्यार्थी आहेत. हे विद्यार्थी खाजगी शिक्षण संस्थांच्या प्रत्येक शाळेच्या दारामध्ये प्रवेशासाठी चकरा मारत असल्याचे चित्र नेहमी दिसते. त्यांना प्रवेश मिळत नाही. मेरिटनुसार अकरावीला प्रवेश मिळणार आहे, हे खरे आहे. परंतु ग्रामीण भागात 50 टक्के, 60 टक्के, 70 टक्के गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्याला प्रवेशापासून वंचित रहावे लागणार आहे. आम्ही यासंबंधी विचारणा करतो तेव्हा संस्थाचालक किंवा जिल्हा परिषदेचे पदाधिकारी असे म्हणतात की, आम्हाला अकरावीच्या तुकडया वाढवून मिळत नाहीत. शासनाने मुंबई सारख्या मोठया शहरामध्ये अकरावीच्या प्रवेशाची व्यवस्था केली आहे. परंतु ग्रामीण भागातील अकरावीत प्रवेश घेणा-या सर्व विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाईल असे उत्तर सरकारने दिले तरच या विद्यार्थ्यांचे समाधान होईल.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, ग्रामीण भागातील विद्यार्थी असो की, मुंबई शहरातील असो सर्व क्षेत्रातील विद्यार्थी असो, कोणत्याही विद्यार्थ्यांना अकरावीच्या प्रवेशासाठी अडचण येणार नाही.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. राधाकृष्ण विखे-पाटील.....)

तुकड्यांची आवश्यकता आहे असे आपल्याला वाटले तर आपण शिक्षण संस्थाचालकांना तशी विनंती करा. तुकड्या वाढवून देण्याप्रकरणी मंत्रालयापर्यन्त येण्याची आवश्यकता नाही . राज्यातील सर्व विभागातील शिक्षण उप संचालकांना वाढीव तुकड्यांना मान्यता देण्याचे अधिकार दिलेले आहेत.

श्री. पांडरंग फुंडकर : शिक्षण संस्थाचालक आणि जिल्हा परिषद तुकडया वाढविण्यास तयार नाहीत. त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहाणार आहेत. त्यांना अकरावीला प्रवेश मिळणार नाही अशी स्थिती निर्माण झालेली आहे.

**तालिका सभापती** : अल्पकालीन चर्चा आता संपली आहे.

सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1 वाजून 15 मिनिटांनी भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 1.01 ते 1.15 वाजेपर्यन्त स्थगित झाली.)

----

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MMP/ SBT/ प्रथम श्री.शिगम 13:15

**स्थगितीनंतर**

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**प्रश्नोत्तराचा तास ठरलेल्या वेळी घेणेबाबत**

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी :सभागृहातील कामकाजाचा क्रम नियमाप्रमाणे ठरलेला असतो. काही महत्वाच्या विषयावर किंवा एखादी चर्चा दिवसभरात पूर्ण झाली नाही तर ती दुस-या दिवशी अतिरिक्त वेळ घेऊन चर्चा पूर्ण करीत असतो. आपला पूर्वीपासूनचा नियम असा आहे की, सभागृहाचा पहिला तास म्हणजे सकाळी 11.00 वाजता किंवा दुपारी 12.00 वाजता प्रश्नोत्तराचा तास सुरु होतो. नियमाप्रमाणे प्रश्नोत्तराचा तासात बदल होणार आहे, त्या वेळेतच प्रश्नोत्तराचा तास सुरु झाला पाहिजे अशा प्रकारची प्रथा आणि परंपरा आपण आतापर्यंत पाळत आलेलो आहोत. प्रश्नोत्तराचा तास प्रश्नोत्तराच्याच वेळी घेण्यात आला पाहिजे व त्यासाठी जेवढा वेळ देण्यात आलेला असतो तेवढा पूर्णपणे वेळ त्यास दिला गेला पाहिजे. कोठल्याही परिस्थितीत प्रश्नोत्तराची तासाची वेळ कमी होता कामा नये.

**सभापती** : सभागृहात असे प्रसंग येतात की, एखाद्या महत्वाच्या विषयाच्या बाबतीत एखादी अतिरिक्त चर्चा घेण्यात येते. इयत्ता 11 वी च्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशाचा बाबतीत शासन नवी पध्दत सुरु करणार आहे आणि त्या महत्वाच्या विषयावर सभागृहात चर्चा होणे गरजेचे होते. ही चर्चा सकाळी 11.00 ते 11.55 वाजेपर्यंत उत्तरासह पूर्ण व्हावी असे अपेक्षित होते. परंतु पीठासीन अधिकारी म्हणून तालिका सभापती उपस्थित होते, त्यांना मी सांगितले होते की, ही चर्चा आजच पूर्ण करणे गरजेचे आहे. काही वेळेस अशी परिस्थिती निर्माण होते की, एखादी चर्चा सभागृहात सुरु झाली तर ती चर्चा ठरवून दिलेल्या वेळेत होत नाही. त्यामुळे त्याचे उत्तर नंतर घेण्यात येते. आजचा विषय महत्वाचा असल्यामुळे ही चर्चेसाठी थोडा जास्त वेळ दिला गेला ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. अशा चर्चामुळे प्रश्नोत्तराच्या तासावर कोणताही परिणाम होणार नाही याची दक्षता नेहमी घेणे गरजेचे आहे. या सभागृहात प्रश्नोत्तराचा तास हा सगळयात महत्वाचा आहे. आज प्रश्नोत्तराचा तास दुपारी 12.00 वाजता होता तो पुढे गेलेला आहे ही वस्तुस्थिती आहे. एखाद्या अपवादात्मक परिस्थितीत प्रश्नोत्तराचा तास पुढे जातो. प्रश्नोत्तराचा तास ठरवून दिलेल्या

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

सभापती.....

वेळीच घेण्यात येईल याची यापुढे मी निश्चितपणे काळजी घेईन. मी माननीय विरोधी पक्ष नेते, माननीय उप मुख्यमंत्री आणि सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, एखादी महत्वाची चर्चा सभागृहात करतो, ती चर्चा सुध्दा ठरवून दिलेल्या वेळेत उत्तरासह पूर्ण झाली पाहिजे अशी आपण सर्वांनी काळजी घेणे गरजेचे आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी यांनी महत्वाचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. सभापती महोदय, एखाद्या घटनेचे, एखाद्या प्रश्नांचे महत्व व गांभीर्य लक्षात घेऊन त्या विषयाची अतिरिक्त चर्चा आपण सभागृहात उपस्थिती करतो. परंतु सभागृहाचे कामकाज करण्यासंदर्भात नियम तयार करण्यात आलेले आहे आणि त्या नियमाप्रमाणे आपण कामकाज करीत असतो. नियमांचे व वेळेचे तंत्र पाळून प्रश्नोत्तराचा तास हा वेळेवर सुरु करण्याची जवळ जवळ सगळया राज्यातील विधानसभा आणि विधान परिषद सभागृहांमध्ये पध्दत आहे. एखाद्या वेळेला अपवाद झाला तर ती गोष्ट वेगळी आहे.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ SBT/ MMP/ 13:20

प्रा.बी.टी.देशमुख....

पण ती चर्चा प्रश्नोत्तराच्या तासानंतर सुध्दा आपल्याला घेता येऊ शकते. विशेषत: प्रश्नोत्तराचा तास, लक्षवेधी सूचना, नियम 93 च्या सूचना हा भाग आहे तो दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना अंडर नोटीस ठेवत असतो. वेळेचा जो भाग आहे, प्रश्नोत्तराच्या तासाची वेळ कायम ठेवावी यात चूक नाही. प्रश्नोत्तराच्या तासाची वेळ ठरल्याप्रमाणे सुरु व्हावी. वर्षानुवर्षे अशी पध्दत आहे की, सकाळच्या विशेष बैठकीतील कामकाज ठरलेल्या वेळेत पूर्ण झाले नाही तर दुपारच्या सत्रात आपल्या अधिकारात त्यासाठी वेळ दिली जाते.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, हा संवेदनशील विषय आहे. अशा विषयावर गटनेते आणि आम्हाला चेंबरमध्ये बोलवावे. याठिकाणी केलेली चर्चा काही कारणांनी बाहेर जाते. सभागृहाच्या दृष्टीने ते बरोबर नाही. आपण आम्हाला चेंबरमध्ये बोलवावे. आम्ही आपले म्हणजे त्याठिकाणी मांडू.

**सभापती** : आपण सूचित केल्याप्रमाणे ज्या सन्माननीय सदस्यांची चर्चा आपण घेतो त्यांची आणि अन्य सन्माननीय सदस्यांची ही स्वत:ची जबाबदारी राहील की, चर्चा आणि मंत्रीमहोदयांचे उत्तर दिलेल्या वेळेत पूर्ण झाले पाहिजे. काही वेळेला असे होते की, चर्चा पूर्ण होते परंतु मंत्रीमहोदयांचे उत्तर पूर्ण होत नाही. कार्यक्रमपत्रिकेतील प्रत्येक बाब महत्वाची आहे. कार्यक्रमपत्रिकेवर प्रश्नोत्तराचा तास, अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेचा पहिला दिवस हे विषय महत्वाचे असून ते कार्यक्रमपत्रिकेवरच आहेत. सदनाच्या दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी सूचित केल्याप्रमाणे ज्या ज्यावेळी असा प्रसंग येईल, त्या त्यावेळी गटनेते आणि विरोधी पक्षनेते.............

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सकाळी विशेष बैठक होते त्याबाबत गटनेत्यांना कुठे बोलावले जाते? सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांच्या भावनांबद्दल मला आदर आहे. सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख म्हणाले की, प्रश्नोत्तराचा तास, लक्षवेधी सूचना, नियम 93 च्या सूचना दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांच्या असतात.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, प्रश्नोत्तराचा तास वेळेवर सुरु करण्याची पूर्वापार पध्दत आहे. तो आजचा विषय नाही असे मी म्हटले. आपण सर्व गटनेत्यांना बोलावून घ्यावे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : या सदनामध्ये जे जे कामकाज होते ते दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांचे कामकाज असते. तुम्ही भाग घेत नाही तो तुमचा दोष आहे.

**सभापती** : आपल्या सर्वांच्या भावना माझ्या लक्षात आल्या आहेत. प्रश्नोत्तराच्या तासाला सर्वात अधिक महत्व देण्याबाबत विचार करावयाचा आहे. सन्माननीय सदस्यांना मी हेही सांगेन की, त्यांचा एखादा विषय मी आगावू वेळेत स्वीकारला असेल तर तो वेळेत पूर्ण करण्याची जबाबदारी त्या सन्माननीय सदस्यांनीही घ्यावी आणि ठरलेल्या वेळेत मंत्रीमहोदय उत्तराचे भाषण पूर्ण करतील. सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांचे म्हणणे आहे की, हे कसे करणार?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, आपण असे म्हणालात की, एखाद्या विशिष्ट वेळी विशेष बैठकीस परवानगी दिली तर ठरलेल्या वेळेत तो विषय पूर्ण केला पाहिजे. मी या निर्णयाशी सहमत आहे. परंतु ज्या ज्यावेळेला चर्चेला सुरुवात होते त्या त्यावेळी पीठासीन अधिकारी म्हणून जे कोणी त्या स्थानावर असतील त्यांनी त्या वेळेला विरोधी पक्षाला आणि सत्ताधारी पक्षाला वेळेचे बंधन घालून दिले पाहिजे. पहिल्या वक्त्यानी अधिक वेळ घेतला तर त्या पक्षातील पुढच्या सदस्यांना वेळ दिला नाही तरच हा प्रश्न मिटेल. अन्यथा हा प्रश्न मिटणार नाही अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांनी सांगितले ते बरोबर आहे. याठिकाणी मला खात्री आहे, पीठासीन अधिकारी त्या त्यावेळी कठोर निर्णय घेतील. सन्माननीय सदस्यांना वेळ वाटून देतील, मंत्रीमहोदयांना वेळ देतील आणि दिलेल्या वेळेत चर्चा कशी पूर्ण होईल ते पाहतील.

-----------

2बी.1....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**नियम 289 च्या प्रस्तावांसंबंधी**

**सभापती** : तारांकित प्रश्न चर्चेला घेण्यापूर्वी माझ्याकडे नियम 289 अन्वये चार प्रस्ताव आलेले आहेत. त्यातील पहिल्या प्रस्तावाची सूचना सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, प्रा.बी.टी.देशमुख, सर्वश्री नितीन गडकरी, केशवराव मानकर, कपिल पाटील, गोपीकिशन बाजोरिया यांनी "अर्थसंकल्प सादर करताना सिंचन क्षेत्राचा संपूर्ण अनुशेष संपुष्टात आल्याचे जाहीर करण्यास मला आनंदन होत आहे" यांनी दिली असून ही सूचना आज घेण्याऐवजी उद्या घ्यावी, अशी विनंती केली आहे त्यासाठी मी परवानगी दिलेली आहे. तसेच या अनुषंगाने जो निर्णय घ्यावयाचा आहे तो देखील मी उद्या घेईन.

या व्यतिरिक्त सन्माननीय सदस्य सर्वश्री. रामनाथ मोते, संजय केळकर, विनोद तावडे यांनी "मुंबई विद्यापीठाअंतर्गत बी.कॉम. व सेल्प फायनान्स या अभ्यासक्रमांच्या 70 हजार जागा उपलब्ध असणे" या विषयाच्या अनुषंगाने जी निमय 289 च्या प्रस्तावाची सूचना दिलेली आहे त्या प्रस्तावाच्या संदर्भात मी माझ्या दालनातच त्याबाबतची लक्षवेधी सूचना स्वीकारण्यात येईल, असा निर्णय घेतला आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी "पवनराजे निंबाळकर यांच्या हत्येप्रकरणी खासदार डॉ. पद्मसिंह पाटील यांना झालेली अटक तसेच थोर समाजसेवक अण्णा हजारे यांच्या खुनाची देण्यात आलेली सुपारी" या विषयासंबंधी नियम 289 च्या प्रस्तावाची सूचनादिली आहे तसेच चौथी नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर, श्री. दिवाकर रावते, श्री. नितीन गडकरी यांनी देखील "पवनराजे निंबाळकर यांच्या हत्येप्रकरणी खासदार डॉ. पद्मसिंह पाटील यांना झालेली अटक" या विषयासंबंधी सूचना दिलेली आहे. या दोन्ही सूचनांच्या अनुषंगाने एक-एक, दोन-दोन मिनिटात हा प्रस्ताव कसा महत्वाचा आहे हे सांगितले तर मला निर्णय देण्याच्या दृष्टीने योग्य होईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, नियम 289 अन्वये सूचना पाठवून प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्यासंबंधी विनंती केलेली आहे. या सूचनेत जो विषय आहे तो अतिशय गंभीर स्वरुपाचा आहे. या राज्यात दि. 3 जून, 2006 रोजी पवनराजे निंबाळकर आणि त्यांचा चालक श्री. काझी यांची कळंबोली येथे गाडी थांबवून हत्त्या करण्यात आली आहे. ही हत्त्या झाल्यानंतर महाराष्ट्रामध्ये खळबळ माजली होती. हल्लेखोर सापडले नाहीत म्हणून माननीय पवनराजे निंबाळकर यांच्या परिवारातील काही लोकांनी राज्यशासनाकडे एक निवेदन सादर केले होते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

त्यात हत्त्येसंबंधीची संपूर्ण माहिती दिली होती तसेच पोलिसांबद्दल त्यांच्या मनात संशय असून योग्य ती कारवाई करणार नाही म्हणून या प्रकरणी सीबीआय मार्फत चौकशी झाली पाहिजे अशीही मागणी त्यांनी केली होती. तसेच त्यात त्यांनी काही नावांचाही उल्लेख केला होता परंतु त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. त्या अनुषंगाने या सभागृहात तारांकित प्रश्न, कायदा व सुव्यवस्थेवरील चर्चा, नियम 93 अन्वये सूचना अशा अनेक आयुधांच्या माध्यमातून हा मुद्दा उपस्थित झाला होता. कायदा व सुव्यवस्थेवरील चर्चेमध्ये त्यांनी दिलेले निवेदन देखील वाचून दाखविण्यात आले व त्याचे इतिवृत्त माझ्याकडे आहे. असे असताना गेली तीन वर्षे ही चौकशी चालूच आहे अशा प्रकारचे थातुरमातुर उत्तर देऊन या प्रकरणाला दडपण्याचा प्रयत्न शासनाने केला आहे आणि श्री. पवनराजे निंबाळकर यांच्या कुटुंबियांना न्याय देण्यापासून वंचित केले आणि त्यामुळे हे प्रकरण कोर्टात गेले. या प्रकरणाची सीबीआयमार्फत चौकशी करावी अशी मागणी विरोधी पक्षाने तसेच पवनराजे निंबाळकर यांच्या कुटुंबियांनी देखील केली तरी देखील शासनाने अशा चौकशीला मान्यता दिली नाही. श्री. पवनराजे निंबाळकर यांच्या कुटुंबियांनी तत्कालीन गृहमंत्री श्री. आर.आर.पाटील यांनी त्यांच्या दालनात भेट घेऊन विनंती केली त्यावेळेस सुध्दा सीबीआय चौकशीची मागणी केली होती परंतु ती मागणी सुध्दा फेटाळण्यात आली आणि त्यांना सांगितले की, शासनामार्फत चौकशी करतो. तीन वर्षे झाली आणि या चौकशीतून काहीच निष्पन्न झाले नाही म्हणून हे प्रकरण कोर्टात गेले आणि कोर्टाने पोलिसांवर ताशेरे मारुन या प्रकरणाची चौकशी सीबीआयकडे देण्यासंबंधीचे आदेश दिले. त्यानंतर सीबीआयने ही चौकशी केली त्यावेळी या राज्याचे विद्यमान खासदार डॉ. पद्मसिंह पाटील यांचे नाव त्यात आले, त्यांना अटक झाली. अशा प्रकारे गेली तीन वर्षे आघाडी सरकारने हे प्रकरण दडपले. अशा प्रकारे या राज्यात सुपारी देऊन राजकीय लोकांच्या हत्त्या केल्या जात असतील तर सर्वसामान्य माणूस सुरक्षित राहू शकत नाही. म्हणून राज्यातील जनतेला अशा दहशतीपासून बाहेर काढण्यासाठी या विषयावर नियम 289 च्या प्रस्तावाच्या अनुषंगाने चर्चा होण्याची आवश्यकता आहे. तसेच या प्रकरणात आणखी काही लोकांचा हात असू शकतो व त्याला आणखी व्यापक स्वरुप येऊ शकते म्हणून या प्रकरणाबाबत प्रश्नोत्तराचा तास बाजूला करुन अशा राज्याच्या दृष्टीने महत्वाच्या असलेल्या प्रश्नावर सभागृहात चर्चा करावी असा उल्लेख आम्ही नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावात केलेला आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी नियम 289 अन्वये आपल्याकडे एक प्रस्ताव दिलेला आहे. या प्रश्नाची अर्जन्सी का आहे हा सगळयात महत्वाचा विषय आहे. ही घटना अतिशय दुर्दैवी आहे. कै.पवनराजे निंबाळकर यांचे चिरंजीव हे या विषयाच्या संदर्भात माननीय विरोधी पक्ष नेत्यांना तसेच गृहमंत्री व आम्हाला सुध्दा भेटले होते. राजकीय दबावामुळे गृहविभाग बरोबर कारवाई करीत नाही असे आम्हाला त्यांनी सांगितले होते. या प्रश्नाच्या प्रश्नाच्या संदर्भात राजकीय दबावामुळे गृहविभाग योग्य प्रकारे कारवाई करीत नाही असे माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी या सभागृहात वारंवार आरोप केला होता तसेच या विषयाच्या संदर्भातील मुद्दा नियम 93 अन्वये तसेच लक्षवेधी सूचनेद्वारे उपस्थित केला होता. या प्रश्नाच्या संदर्भात त्यावेळी गृहविभागाने जी उत्तर दिली होती व आज सीबीआयच्या फाईंडींगमुळे जी वस्तुस्थिती बाहेर आलेली आहे त्यामध्ये विसंगती आहे. सीबीआय चौकशीचे दोन मार्ग असतात. पहिला मार्ग असा आहे की, राज्यशासनाने सीबीआयची मागणी केली तरच सीबीआय चौकशी करीत असते. जोपर्यंत राज्य सरकार सीबीआय चौकशीचे आदेश देत नाही, रिकमेंड करीत नाही तोपर्यंत सीबीआयला चौकशी करता येत नाही. दुसरा मार्ग असा आहे की, जर हायकोर्टात केस गेली आणि सन्माननीय न्यायमूर्तींनी सीबीआय चौकशीचे आदेश दिले तरच सीबीआय मार्फत चौकशी होऊ शकते. विरोधी पक्षांकडून हा विषय जेव्हा सभागृहात वेळोवेळी उपस्थित करण्यात आला त्यावेळेस सरकारने सांगितले की, या केसमध्ये सर्व चौकशी बरोबर होत आहे. राज्यशासनाने त्यांचे या केसच्या संदर्भातील फाईंडींग वेळोवेळी आम्हाला सांगितलेले आहे. ही केस जेव्हा हायकोर्टात गेली तेव्हा हायकोर्टाने या विषयाच्या संदर्भात सीबीआय चौकशीचे आदेश दिले. त्यामुळे पवन राजे यांच्या मृत्यूच्या संदर्भात सीबीआयने कारवाई केलेली आहे. सीबीआयने केलेली कारवाई आणि राज्य सरकारने केलेली चौकशी यामध्ये संदिग्धता निर्माण झालेली आहे. या केसच्या संदर्भात सीबीआयने चौकशी केल्यानंतर खासदार श्री. पद्मसिंह पाटील यांना या केस मध्ये खुनाचा आरोप लावून अटक केले गेली आहे. ही जी विसंगती आहे त्याला जबाबदार कोण आहे? These are the lapses related with the State Government or Police Administration. There are two intentions, one is bonafide and the other is

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ...

malafide. हा विषय महत्वाचा आहे. माझी आपल्याला विनंती आहे की, जर राज्य सरकारने मेलाफाईड इन्टेंशनने ही केस पध्दतशीरपणे दाबून ठेवली असेल आणि या प्रकरणी सीबीआयकडून झालेल्या चौकशीतून सर्व माहिती बाहेर आली असेल तर ही गंभीर बाब आहे. यामध्ये सरकारचे अपयश दिसून येते. कायदा आणि सुव्यवस्थेच्या दृष्टीने शासनाचे अपयश असल्यामुळे सन्माननीय विरोधी पक्ष नेते आणि आम्ही असा प्रश्न उपस्थित केलेला आहे की, Government is directly responsible and CBI is working under the Prime Minister's Office (PMO) आणि त्या इनव्हेस्टीगेशन एजन्सीने म्हणजे सीबीआयने काढलेले निष्कर्ष आणि त्या प्रमाणे केलेली कारवाई, तीन वर्ष ही केस महाराष्ट्र शासनाकडे प्रलंबित असतांना महाराष्ट्र शासनाने काढलेले निष्कर्ष यात असलेली संदिग्धता आहे त्यामुळे या केसच्या संदर्भात राज्यसरकारचे अपयश दिसून येते. आज महाराष्ट्रात कायदा आणि सुव्यवस्थेची स्थिती अतिशय वाईट आहे. काल नाशिकमध्ये एका इसमाने 50 मोटारसायकली जाळून टाकल्या. महाराष्ट्रात अशा प्रकारच्या घटना एकामागून एक घडत आहेत. त्यामुळे आमची आपल्याला विनंती आहे की, या विषयात राज्यसरकारचे अपयश असल्यामुळे, हा विषय संवेदनशील असल्यामुळे सरकारचे लॅप्सेस लोकशाहीच्या माध्यमातून जनतेसमोर आणून त्यावर कारवाई करण्याची आवश्यकता आहे. या केसच्या संदर्भात राज्यसरकारकडून जी काही कार्यवाही झालेली आहे, जी काही कृती झालेली आहे ती योग्य आहे की, अयोग्य आहे याची चर्चा या सभागृहात होण्याची आवश्यकता असल्यामुळे नियम 289 अन्वये आज सभागृहाच्या समोर जे काही कामकाज आहे ते सर्व कामकाज स्थगित करुन या विषयावरील चर्चेला त्वरित सुरुवात करावी. या केसच्या संदर्भात शासनाचे काय मत आहे ते जनतेसमोर येऊ द्यावे कारण हे सभागृह लोकशाहीचे सर्वोच्च मंदिर आहे. न्यायालयामध्ये या केसच्या संदर्भात जो काही निर्णय होईल तो होईल. श्री. पदमसिंह पाटील हे माझ्या देखील परिचयाचे आहेत, त्यांना न्यायालयात जे काही सांगावयाचे असतील ते न्यायालयात सांगतील. मी आपल्याला सांगू इच्छितो की, कायद्यासमोर सर्व समान आहेत. अलाहाबाद हायकोर्टाच्या निर्णयामध्ये तत्कालीन प्रधानमंत्री कै. इंदिरा गांधी यांच्या केसमध्ये डीसीपी आणि एसीपी हे जेव्हा स्टेजच्या दो-या बांधतांना सापडले



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ....

त्यावेळी न्यायमूर्ती श्री.जगमोहन नारायण सिन्हा यांनी कै.इंदिरा गांधी यांची निवडणूक अवैध ठरवली होती. मला असे वाटते की, लोकशाहीच्या सूत्रानुसार माणूस कितीही मोठा असला तरी कायद्यासमोर सर्व समान असतात. त्यामुळे कायदा आणि सुव्यवस्थेच्या संदर्भात राज्यसरकार फेल्यूअर आहे. हा प्रश्न गंभीर असल्यामुळे प्रश्नोत्तराचा तास स्थगित करावा आणि या विषयावर सभागृहात चर्चेला सुरुवात करावी अशी माझी आपल्याला विंनती आहे.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : आदरणीय सभापती महोदय, नियम 289 अन्वये या विषयाच्या संदर्भात तातडीने चर्चा व्हावी या करिता आम्ही आग्रही आहोत.. आम्ही आग्रही असण्याची काही कारणेही आहेत . ज्यावेळी कै.पवन राजे निंबाळकर यांचा खून झाल्या होता त्यावेळी त्या संदर्भात या सभागृहात चर्चा झाली होती. त्यावेळी आम्ही या विषयाच्या संदर्भात सी.बी.आय.च्या चौकशीची मागणी केली होती परंतु हे प्रकरण सी.आय.डी.कडे सोपविले होते. सी.आय.डी.च्या तपासात या गुन्हयातील जे आरोपी पकडले गेले होते त्याची नार्कोटेस्ट झाली होती. ही टेस्ट कशा प्रकारे झाली यासदंर्भात दूरदर्शनने त्यातील काही क्षणचित्रे दाखवली होती. नार्कोटेस्टमध्ये या राज्याचे माजी मंत्री आणि विद्यमान खासदार डॉ. पद्मसिंह पाटील यांचे नाव सुध्दा घेण्यात आले होते. त्यामुळे सी.आय.डी. दबाव का आला याची चर्चा आम्हाला या ठिकाणी करावयाची आहे. या खटल्याची जास्त चौकशी न केल्यामुळे माननीय उच्च न्यायालयाला हे प्रकरण सी.बी.आय कडे वर्ग करण्यासंबंधी राज्य शासनाला आदेश द्यावे लागले. राज्य सरकारच्या सी.आय.डी.कडून या केसचा निर्णय लागणार नसल्यामुळे , न्याय मिळणार नसल्यामुळे माननीय .उच्च न्यायालयाने ही केस सीबीआय कडे वर्ग करण्याच्या संदर्भात निर्णय दिला व त्यामुळे ही केस सीबीआयकडे गेली. खरे म्हणजे माझा सीबीआयवर सुध्दा संशय आहे. आता ज्या एजन्सीकडे या केसची चौकशी आहे त्यांच्याकडे आमच्या कै. गोवेकरांच्या चौकशीचे सुध्दा प्रकरण होते. गोवेकर गायब झाला असून तो सापडत नाही, तेव्हा त्याचा खून झाला काय ? यासंदर्भात उच्च न्यायालयाने गोवेकरांची केस सीबीआयकडे दिली होती व या केसचा अहवाल चार महिन्यात सादर करावा असे आदेश दिले होते. परंतु गोवेकरांच्या प्रकरणात कोठे तरी कळ फिरते आणि ते अधिकारीही मॅनेज होतात असा आमच्या मनात संशय आहे. या शासनाबद्दलही आम्हाला शंका आहे.तेव्हा आम्हाला या विषयाच्या संदर्भात चर्चा करावयाची आहे. सिधुदूर्गमध्ये लोकसभेच्या निवडणूकीच्या वेळेस अंकुश राणे नावाच्या व्यक्तिचा खून झाला होता. हा खून झाल्यानंतर ही केस काही तासामध्ये सीआयडीकडे वर्ग करण्यात आली होती. अशा पध्दतीने राजकीय खून लपविण्याची पोलीस यंत्रणेची जी काही धावपळ आणि घालमेल चालली असते त्यावर आम्हाला ख-या अर्थाने चर्चा करावयाची आहे. महाराष्ट्रामध्ये राजकीय कार्यकर्त्यांचे खून होत आहेत. उद्या आम्ही येथे काही बोलावयाचे किंवा नाही याबाबतीत आम्हाला भीती वाटावयास लागली आहे. आम्ही येथे जे काही बोलतो ते जर बाहेर गेले तर आमची कोण सुपारी घेईल काय अशी आम्हाला भीती वाटते..

( बेल वाजविण्यात आली )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते .....

सभापती महोदय, मी आपणास विनंती करतो की,या सदनातील कोणत्याही सदस्याचे नाव सुपारी मध्ये आले तर आम्हाला आश्चर्य वाटावयास नको अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे.यामध्ये माहिती देण्यामध्ये आणखी कोणी विद्यमान ख्ंासदार अडकलेला आहे काय याबद्दल आम्हाला श्ंका वाटते . एक दोन दिवसानंतर अधिवेशन संपलेले असेल. तेव्हा जी नार्को टेस्ट झाली होती त्या संदर्भात आमच्या मनामध्ये काही श्ंका व कुशंका आहेत. या संदर्भात आम्हाला चर्चा करावयाची असल्यामुळे सगळे कामकाज स्थगित करण्यात यावे अशी माझी आपल्याला विनंती आहे. महाराष्ट्राच्या दृष्टीने हा ज्वलंत विषय असल्यामुळे प्रत्येक घरा घरामध्ये तो चर्चिला जात आहे . एका राष्ट्रवादी नगराध्यक्षाचा खून राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्याने काही दिवसापूर्वी केला होता .अनेक ठिकाणी राजकीय कार्यकर्त्याच्या खूनाचे सत्र सुरु झालेले आहे.त्यामुळे या राज्यातील कोणत्याही राजकीय कार्यकत्याला सुरक्षित वाटत नाही. या सदर्भात सभागृहात आता चर्चा होणे आवश्यक आहे. श्री.अण्णा हजारे यांचा खून करण्यासाठी सुध्दा सुपारी देण्यात आलेली आहे. त्यामुळे ते उपोषणाला बसतील व ते मागणी करतील हा भाग वेगळा..

( बेल वाजविण्यात आली )

सभापती महोदय, या सबंधी तातडीने निर्णय घेऊन आजच्या आज चर्चा घेण्यात यावी. अशी माझी आपल्याला विनंती आहे.

---

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, दोन मुद्याच्या संदर्भात मी स्वतंत्र सूचना दिली होती . माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी आपल्या सूचनेत म्हटल्याप्रमाणे कै. पवनराजे निंबाळकर यांच्या हत्येमध्ये खासदार डॉ. पदमसिंह पाटील यांना सी.बी.आय.ने केलेली अटक आणि दुस-या बाजूला त्यांच्यावर श्री.अण्णा हजारे यांच्या खूनाचा सुपारी देण्याचा ठपकाअसल्याचे सुध्दा उघडकीस आले आहे. ते प्रकरण सी.बी.आय.कडे देण्याची आवश्ययकता आहे या मुद्यावर मी आपणाकडे प्रस्ताव दिला होता. "पॉवर करप्टस, पॉवर अबसलुटली " असे म्हटले जाते परंतु सत्ता केवळ सत्तेवरील माणसाला भ्रष्ट बनवत नाही तर सत्ता निसटेल .....

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मला एक तांत्रिक मुद्दा मांडावयाचा आहे. नियम 289 अन्वये जो प्रस्ताव दिला होता त्यात सन्माननीय सदस्यांनी दोन विषय दिले होते. आम्ही जो प्रस्ताव दिला होता त्यात एकच विषय दिला होता . श्री.अण्णा हजारे यांच्या खूनाच्या सुपारी संबंधीचा विषय आम्ही दिलेला नाही. सन्माननीय सदस्यांनी जो प्रस्ताव दिला होता तो माननीय सभापती महोदयांनी वाचून दाखविलेला नसल्यामुळे तो रेकॉर्डवर आलेला नाही.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदयांनी तो प्रस्ताव वाचून दाखविलेला आहे. म्हणूनच मी बोलण्यासाठी उभा आहे.सन्माननीय ज्येष्ठ नेत्यांचे माझ्याकडे लक्ष कमी असते.

नतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील...

सभापती महोदय, सत्तानिष्ठा याचे जे भय असते. त्यामुळे माणसाला भ्रष्ट बनविले जाते. या प्रकरणात खूनाची सुपारी देणे, खून करणे, त्यानंतर ते प्रकरण दडपून टाकणे, त्यांना संरक्षण देणे हे शासनाकडून घडले आहे. शासनाचा संबंध असणे आणि प्रकरण गंभीर असणे हे दोन प्रश्न नियम 289 शी निगडीत असतात. सभापती महोदय, मी या संबंधीचे पुरावे आपणाकडे पाठवितो. ते पाहिल्यानंतर हे प्रकरण किती तातडीने घेंणे आवश्यक आहे हे आपल्या लक्षात येईल. एकाच घरातील 10 जणांना अधिकृत शस्त्रास्त्रांचा परवाना कसा देण्यात आला आहे? अनधिकृत शस्त्रांची यादी माझ्याकडे नाही. परंतु जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेली यादी आपल्याकडे आहे. डॉ. पद्मसिंह पाटील यांच्या कुटुंबातील दहा व्यक्तिंना रिव्हॉल्व्हर, पॉईंट 32 बोअरचे पिस्तूल ही शस्त्रे कुणाला मारण्यासाठी दिली होती? अण्णांना की, मतदारांना धाक देण्यासाठी होती? एकेकाळी ज्यांच्याकडे गृह खाते होते, त्यांच्याकडील शस्त्रे तातडीने ताब्यात घेणे आवश्यक होते. हे परवाने सरकारने दिलेले असल्यामुळे हा सरकारशी निगडीत विषय आहे. हे कोणत्या कायद्याखाली दिले हे सर्व बाहेर आले पाहिजे. मी आपणाकडे ही सर्व कागदपत्रे पाठवितो. म्हणून यासाठी तातडीने चर्चा होणे आवश्यक आहे. माननीय सभापतींनी याची गंभीर दखल घेऊन संपूर्ण कामकाज तहकूब करावे अशी मी विनंती करतो.

श्री. अरुण गुजराथी : सभापती महोदय, ही सन 2006 ची घटना असून ती आजच 24 तासात घडली आहे असे नाही. त्यामुळे या घटनेला तातडी नाही. कायदा व सुव्यवस्थेच्या संदर्भात चर्चा करण्याचा अधिकार विरोधी पक्षाच्या माननीय सदस्यांना किंवा कोणत्याही माननीय सदस्यांना निश्चितपणे आहे. परंतु नियम 289 खाली या विषयावर चर्चा होऊ शकणार नाही. हे मॅटर सबज्युडिस असल्यामुळे विधान परिषदेमध्ये झालेल्या भाषणांचा प्रभाव कोर्टावर होऊ शकतो. आपण कायदा व सुव्यवस्थेवर चर्चा करु शकाल परंतु नियम 289 अन्वये आपल्याला याठिकाणी चर्चा करता येणार नाही.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, हे मॅटर सबज्युडिस नाही.

श्री. अरुण गुजराथी : या प्रकरणी हायकोर्टाने स्थगिती आदेश दिला आहे. हायकोर्टाने निर्देश दिल्यानंतर प्रकरण सी.बी.आय.कडे सोपविण्यात आले.

श्री. नितीन गडकरी : आपण धृतराष्ट्रासारखे वागायला लागला आहात काय?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ SBT/

श्री. कपिल पाटील :सभापती महोदय, या प्रकरणामध्ये साने गुरुजींच्या शिष्यांनी सत्त्याच्या बाजूला उभे राहिले पाहिजे.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, डॉ. पद्मसिंह पाटील यांना सी.बी.आय. ने अटक केल्यानंतर जी परिस्थिती निर्माण झाली. त्या अनुषंगाने माननीय विरोधी पक्षनेत्यांनी नियम 289 अन्वये जो प्रस्ताव आणला आहे, व चर्चेची मागणी केली आहे. त्यामुळे माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयाला धरुन मी या ठिकाणी मुद्दा मांडतो. ही घटना 2006 ची आहे. आज त्या घटनेच्या अनुषंगाने जी कारवाई चालू आहे ती केवळ डॉ. पद्मसिंह पाटील यांच्या बाबतीत नाही तर त्या ठिकाणी जे अनेक आरोपी पकडले आहेत त्यामध्ये भाजपचे एक नगरसेवक श्री. मोहन शुक्ला यांचा सुध्दा समावेश आहे.

श्री. नितीन गडकरी : आम्ही त्यांना आमच्या पक्षामधून काढले आहे, तुम्ही डॉ. पद्मसिंह पाटील यांना पक्षातून काढा.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : तुम्हाला हे कां झोंबले?

श्री. नितीन गडकरी : आम्हाला झोंबले नाही.श्री. शुक्ला यास आमच्या पक्षातून तात्काळ काढले आहे.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : वस्तुस्थिती अशी आहे की, ते भाजपच्या तिकिटावर निवडून आलेले नगरसेवक आहेत. तुम्ही त्यांना तिकिट दिले आहे.

श्री. नितीन गडकरी : ही घटना घडली त्यावेळी ते राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये होते. त्यानंतर राष्ट्रवादी कॉंग्रेसमधून आमच्याकडे आले.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : तुम्ही आर.एस.एस. च्या कार्यकर्त्याला तिकिट द्या अशी भाजपची मागणी असतांना सुध्दा तुम्ही श्री. मोहन शुक्ला यास तिकिट दिले ही वस्तुस्थिती आहे.

श्री. नितीन गडकरी : हा तिकिट वाटपाचा विषय आहे काय? आपण डॉ. पद्मसिंह पाटील हे आपले मित्र आहेत की वैरी आहेत?

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, हे मॅटर सबज्युडिस आहे. याठिकाणी डॉ. पद्मसिंह पाटील यांना नाही तर जे आरोपी या केसमध्ये गुंतले आहेत त्यांना सी.बी.आय. ने अटक केल्यानंतर त्यांची रवानगी कोर्टामध्ये केली आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी . . . .

अद्यापि त्याठिकाणी कोणाच्याही बाबतीत बेल ऑर्डर झालेली नाही. म्हणून आपण या सदनामध्ये सबज्युडिस मॅटरच्या बााबतीत चर्चा करणे हे उचित रहाणार नाही, असा माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी माझ्याबद्दल उल्लेख केला, त्याबाबतीत आहे. ही गोष्ट खरी आहे की, भारतीय जनता पार्टीतील श्री.शुक्ला नावाचे जे नगरसेवक आहेत, त्यांच्यावर याबाबतीत त्यांनी काहीतरी साठगाठ केली असा आरोप आहे. आता मी बोलत नाही. पण त्या पलिकडे अजूनही दोन नावे आहेत. जर मी ती नावे सांगितली तर तुम्ही उठून सभागृहाच्या बाहेर जाल. ते कोण आहेत ? ते लोकप्रतिनिधी आहेत. आपल्याला पुन्हा याच्यामध्ये जावयाचे नाही. मला एकच विनंती करावयाची आहे. मी आणि सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी, पार्टीने श्री.शुक्ला यांस तिकीट दिले. पण ज्यावेळी ही कृती घडली, तेव्हा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये त्याची मुलगी नगरसेवक होती. तसेच तो राष्ट्रवादी काँग्रेसचा प्रमुख नेता होता. जर त्याने हे पाप केले असेल तर ते राष्ट्रवादीमध्ये पदाधिकारी असताना केले असेल, जर तसे असेल तर . . . .

(सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव खाली बसून बोलतात.)

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, तेव्हा आम्हाला माहिती नव्हते. आता त्यांनी म्हटले आहे तर मग सगळे रेकॉर्डवर येऊ द्यावे. सभापती महोदय, याचा आर.एस.एस.बरोबर काहीही संबंध नाही.सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी आर.एस.एस.वगैरे बाबत जो उल्लेख केलेला आहे, तो अप्रस्तुत आहे. कारण त्यांना आपले स्पष्टीकरण करण्याची संधी नाही. म्हणून याबाबतीत सन्माननीय सदस्यांच्या भाषणामध्ये आर.एस.एस.आणि तिकीट वगैरे मुद्दे काढून टाकावेत.

एक सन्माननीय सदस्य (खाली बसून) : ही वस्तुस्थिती आहे.

श्री.नितीन गडकरी : ही वस्तुस्थिती आहे असे सांगणारे तुम्ही कोण ?तुम्ही आर.एस.एस.चे संघचालक आहात काय की भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष आहात ? मी भारतीय जनता पक्षाचा अध्यक्ष आहे आणि मी त्याला तिकीट दिले आहे हे मी आज कबूल करतो. मी घाबरत नाही.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय,तो राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये होता याला काय आधार आहे ?



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : तो राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये होता. त्याची मुलगी तुमच्या पक्षाची नगरसेविका होती.

(काही सन्माननीय सदस्य खाली बसून बोलतात.)

श्री.नितीन गडकरी :याला सगळा पुरावा आहे.

(काही सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना बोलण्यासाठी परवानगी दिलेली नाही.

(काही सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव, आपण खाली बसावे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, पहिली गोष्ट म्हणजे हे प्रकरण आता उघडकीस आले आहे. त्याला जेव्हा तिकीट दिले होते, तेव्हा त्याच्यावर गुन्हा नव्हता.

(काही सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

**सभापती** : याबाबतीतील निर्णय . . . .

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, हे सर्व मुद्दे काढून टाकावेत. या सर्व मुद्यांचा नियम 289 अन्वये काहीही संबंध नाही.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, पण यांनीच श्री.पद्मसिंह पाटील यांना खासदारकी दिली.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, जर हिंमत असेल तर यांनी श्री.पद्मसिंह पाटील यांना काढून टाकावे.

**सभापती** : मी येथे याबाबतीतील माझा निर्णय जाहीर करतो. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी 289 अन्वये प्रस्ताव दिलेला आहे. तसेच सन्माननीय सदस्य सर्वश्री.पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते,नितीन गडकरी यांचाही नियम 289 अन्वये प्रस्ताव आहे. यासंदर्भात मी माझा निर्णय देतो की, जर आपण आजची कामकाज पत्रिका पाहिली तर त्यामध्ये या घटनेशी संबंधित असा कोणताही विषय नाही. म्हणून नियम 289 अन्वये जे प्रस्ताव देण्यात आले आहेत, त्यासंदर्भात सांगावयाचे तर मी या प्रस्तावांना मान्यता देणार नाही. आता याठिकाणी प्रश्नोत्तराचा तास होईल.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेल मध्ये येऊन घोषणा देतात.)

याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी जो हरकतीचा मुद्दा उपस्थित केला होता,

. . . .2 एफ-3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्या अनुषंगाने मी सर्व प्रोसीडींग तपासून घेईन. जर त्यामध्ये एखादा शब्द चुकीचा असेल तर त्याबाबतीत काय निर्णय घ्यावयाचा ते मी ठरवेन.

(घोषणा)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . .2 एफ-4



**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

## अकोट (जि.अकोला) येथे शेतकरी पॅकेजमधील साहित्य घोटाळ्याची करावयाची चौकशी

**(1) * 50309 श्री.पांडुरंग फुंडकर, श्री. नितीन गडकरी, श्री. जगदीश गुप्ता, श्री.सय्यद पाशा पटेल** : सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) कोरडवाहू शेतकऱ्यांच्या शेतावर अनुदान देऊन शेततळे खोदण्याच्या कृषी विभागाच्या महत्वाकांक्षी योजनेत कृषी अधिकाऱ्यांनी मोठया प्रमाणावर गैरव्यवहार केल्यामुळे कृषि खात्याच्या वरिष्ठ आधिकाऱ्यांनी अकोट (जि.अकोला) येथे दिनांक 2 फेब्रुवारी, 2009 रोजी लोकशाही दिन उपक्रमात पंचनामे करुन चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, याप्रकरणात कोणकोणत्या अधिकाऱ्यांनी कोणत्या स्वरुपाचे गैरव्यवहार केलेले आहेत,

(3) या योजनेत लोकांनी केलेल्या तक्रारी व्यतिरिक्त विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्वत:हून गैरव्यवहार व अनियमिततेचे किती प्रकार उघडकीस आणून कारवाई पूर्ण केली आहे,

(4) गैरव्यवहाराच्या सर्व प्रकरणात संबंधितांवर कोणत्या स्वरुपाची कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे ?

**श्री.बाळासाहेब थोरात** : (1) अंशत: खरे आहे.

(2) प्रत्यक्ष स्थळ तपासणीमध्ये मंडळ कृषी अधिकारी, चोहट्टा बाजार व कृषी सहाय्यक, केळीवेळी यांच्याकडून शेततळे तपासणी जागा व प्रत्यक्ष शेततळे खोदकामाची जागा निवडीमध्ये चूक झाली आहे.

(3) उपविभागीय कृषि अधिकारी, अकोट व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी अकोला यांच्या स्तरावर कामांची तपासणी करण्यात आली. सदर तपासणीमध्ये वरीलप्रमाणे शेततळे तपासणी जागेच्या निवडीबाबत झालेल्या चुकी व्यतिरिक्त अन्य कोणत्याही स्वरुपाचा गैरव्यवहार/अनियमितता झाल्याचे दिसून आले नाही.

(4) तक्रारीचे स्वरुप पाहता संबंधित मंडळ कृषी अधिकारी व कृषी सहाय्यक यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे.

(उपप्रश्न विचारण्यात आले नाहीत.)

-----

(घोषणा)

## मराठवाडयात गतवर्षी सोयाबीनच्या पिकाचे उत्पन्न घटल्याबाबत

**(2) *52970 श्री. सुरेश जेथलिया, श्री. किसनचंद तनवाणी** : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) गेल्यावर्षी मराठवाड्यातील सोयाबीनच्या उत्पन्नात जवळजवळ 50 टक्क्यापेक्षा अधिक घट झाली हे खरे आहे काय,

(2) असल्यास, शासनाने सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक मदत करण्याची घोषणा केली होती हे खरे आहे काय,

(3) असल्यास, सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना शासनाने आर्थिक मदतीचे वाटप केले आहे काय,

(4) असल्यास, साधारणत: किती रक्कमेची तरतूद करण्यात आली होती ?





(घोषणा)

ता.प्र.क्र.52970 . . . .

**श्री.बाळासाहेब थोरात** : (1) हे खरे नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(2) प्रश्न उद्‌भवत नाही.
(3) प्रश्न उद्‌भवत नाही.
(4) प्रश्न उद्‌भवत नाही.

(उपप्रश्न विचारण्यात आले नाहीत.)

----

**मौजे चाळमळा (थळ) जि.रायगड येथे मच्छिमारांसाठी असलेल्या जेट्टीची दुरुस्ती करण्याबाबत**

**(3) *50280 श्री.संजय केळकर,श्री.रामनाथ मोते, श्री. विनोद तावडे** : सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मौजे चाळमळा (थळ) जि.रायगड येथे मच्छिमारांसाठी असलेली जेट्टी पूर्णपणे नादुरुस्त झालेली असल्याने सदर जेट्टीची प्राधान्यक्रमाने दुरुस्ती करण्याबाबत जिल्हाधिकारी, रायगड यांना स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार लेखी विनंती केली आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, त्यावर शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येणार आहे,
(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रवीशेठ पाटील** : (1) नाही.
(2) व (3) प्रश्न उद्‌भवत नाही.

(उपप्रश्न विचारण्यात आले नाहीत.)
(घोषणा)

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषण देतात )

**सभापती** : मला अशा परिस्थिती सभागृहाचे कामकाज करणे शक्य नसल्यामुळे, मी सभागृहाचे कामकाज पंधरा मिनिटांसाठी तहकूब करीत आहे.

( यानंतर सभागृहाची बैठक दुपारी 1.50 ते 2.05 वाजेपर्यंत तहकूब झाली )

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( स्थगितीनंतर )

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या ठिकाणी मला एक अत्यंत महत्वाचा मुद्दा मांडावयाचा आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सुपारीचा विषय अत्यंत महत्वाचा आहे. आपल्या नावाने सुध्दा सुपारी दिली गेली होती त्यावेळी या सभागृहामध्ये तो विषय उपस्थित केला होता. हा अत्यंत महत्वाचा विषय आहे. महाराष्ट्रातील जनता घाबरलेली असून दहशतीखाली आहे. राजकीय कार्यकर्त्यांकडून अशा प्रकारे हत्येच्या सुपाऱ्या दिल्या जात आहेत म्हणून आम्ही मागणी करीत आहोत की, सभागृहाचे आजचे कामकाज बाजूला सारुन या विषयावर चर्चा झाली पाहिजे. आमची ही विनंती आपण मान्य करावी.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मला एक मिनिट बोलावयाचे आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आपण आता सभागृहात आलेला आहात त्यामुळे आपल्याला हा विषय माहीत नाही. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांना एक मिनिट बोलू द्यावे.

**उपसभापती** : मी मागे बसलो होतो.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आम्हाला अत्यंत चिंता लागून राहिलेली आहे. मघापासून मी हे सांगण्याचा पयत्न करीत आहे. कोणाची सुपारी कोण घेतो ? या सदनामध्ये आपण आमचे उपसभापती आहात. आपल्याला मारण्याची सुपारी देणारा सदस्य याच सदनातील होता आणि आता ते खासदार झाले आहेत. उद्या या सुपारीमध्ये दोन्ही नावे येण्याची शक्यता कशी नाकारता येईल ? म्हणून आपल्याला मारण्याची जी सुपारी देऊ शकतात ते सुपारी बहाद्दर आहेत म्हणून आम्हाला तीच चिंता लागून राहिलेली आहे. म्हणून यावर चर्चा झाली पाहिजे. अशा प्रकारे सुपारी देऊन राजकीय हत्या घडणार असतील, आपल्या सारख्या या सदनाच्या उपसभापती पदाच्या संदर्भात या सभागृहात चर्चा घडविण्याची पाळी यावी एवढी आमची लांच्छनास्पद गत असेल तर या

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/ SBT

श्री. दिवाकर रावते .....

राजकीय हत्याकांडाच्या संदर्भात चर्चा झाली पाहिजे. महाराष्ट्रामध्ये सर्व घराघरामध्ये यासंदर्भातील चर्चा आहे. त्यामुळे माझी आपल्याला विनंती आहे की, कृपा करुन आपण या चर्चेला मान्यता द्यावी.

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य घोषणा देतात )

**उपसभापती** : सभागृहाची बैठक मी 2.30 वाजेपर्यंत स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक दुपारी 2.09 ते 2.30 वाजेपर्यंत स्थगित झाली )

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री.अजित पवार (जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्री : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाचा सन 2006-2007 चा लेखापरीक्षा अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : लेखापरीक्षा अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

------

श्री.अजित पवार : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाचा सन 2005-2006 चा चव्वेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

------

श्री.अजित पवार : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक्स महामंडळ मर्यादितचा सन 2004-2005 चा 27 वा वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

------

श्री.अजित पवार : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव यांचा सन 2003-2004 व 2004-2005 चा महालेखापाल-2, नागपूर यांचा अलगलेखा अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : अलगलेखा अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

------

श्री.अजित पवार : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे यांचा सन 2007-2008 चा वार्षिक वित्तीय अहवाल सभागृहाच्या पठलावर ठेवतो.

**उपसभापती** : वार्षिक वित्तीय अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

सभागृहाची बैठक 2.45 पर्यंत स्थगित करण्यात येत आहे.

( सभागृहाची बैठक दु.2.33 ते 2.45 पर्यंत स्थगित झाली. )

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MAP/ KGS/ पूर्वी श्री. खंदारे 14:45

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

**नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाबाबत**

श्री. नितीन गडकरी : उपसभापती महोदय, मला आपणास एक विनंती करावयाची आहे. मघाशी आम्ही नियम 289 अन्वये प्रश्नोत्तराचा तास स्थगित करुन तातडीच्या विषयावर चर्चा करण्यासाठी विनंती केली होती. माननीय सभापतींनी आमची विनंती मान्य केली नाही. तेव्हा सत्तारुढ पक्षाचे गट नेते, माननीय विरोधी पक्षनेते आणि विरोधी पक्षाचे गटनेते यांची माननीय सभापतींच्या दालनात बैठक झाली आणि नियम 289अन्वये चर्चा न घेता नियम 97 अन्वये कायदा आणि सुव्यवस्थेच्या विषयावर चर्चा घेण्याचे ठरले. त्यासंदर्भात त्यांनी लिखित प्रस्ताव मागितला असून तो आपणाकडे आलेला आहे. एकंदरीत ज्या घटना घडलेल्या आहेत त्या गंभीर स्वरुपाच्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी श्री. अण्णा हजारेंच्या संदर्भात सांगितले. नाशिकचे प्रकरणे सांगितले. पद्मसिंह पाटील प्रकरण सांगितले, गोवेकर प्रकरण सांगितले. कायदा आणि सुव्यवस्थेच्या दृष्टीने अतिशय गंभीर परिस्थिती निर्माण झालेली आहे. तेव्हा आज सकाळी सभागृहामध्ये या विषयावर नियम 289 अन्वये चर्चा व्हावी असा आम्ही आग्रह धरला होता. परंतु 289 अन्वये दिलेला विषय नियम 97 खाली कन्व्हर्ट करुन कायदा आणि सुव्यवस्थेच्या संदर्भात चर्चा व्हावी अशी माझी विनंती आहे. यासंदर्भात आपण निर्णय घ्यावा आणि चर्चेला सुरुवात करावी. बाकीचे कामकाज उद्या घ्यावे. पहिल्यांदा नियम 97 अन्वये चर्चा सुरु करावी. चर्चेला वेळ ठरवून द्यावा. याबाबतीत आपण मार्गदर्शन करावे अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : उपसभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी सभागृहामध्ये सांगितल्याप्रमाणे माननीय सभापतींनी माननीय विरोधी पक्षनेते आणि गटनेत्यांना आपल्या दालनात बोलाविले होते. जी चर्चा नियम 289 अंतर्गत होऊ शकली नाही ती चर्चा नियम 97 अन्वये कायदा आणि सुव्यवस्था या विषयावर घेता येते का यासंदर्भात माननीय सभापतींनी विचारणा केली होती. माननीय सभापतींनी माननीय विरोधी पक्षनेते आणि गटनेते यांना सांगितले की, आपणा सर्वांची मान्यता असेल तर नियम 97 अंतर्गत कायदा आणि सुव्यवस्थेवर चर्चा घेता येईल. दुसरा एक विषय मी या ठिकाणी मांडू इच्छितो. त्याबाबतीत आपण निर्णय घ्यावा. आजच्या

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. गुरुनाथ कुलकर्णी....)

कामकाजपत्रिकेवर लक्षवेधी, अतिरिक्त अर्थसंकल्पावर चर्चा आणि अन्य विषय आहेत. अतिरिक्त अर्थसंकल्पावरील चर्चेला माननीय विरोधी पक्षनेते सुरुवात करतील. त्यानंतर नियम 97 अंतर्गत चर्चा घ्यावी. नियम 97 अन्वये चर्चेला आमची हरकत नाही. याबाबतीत आपण निर्णय घ्यावा.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी व सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी नियम 97 अन्वये चर्चा घ्यावी असे सांगितले. यावर जास्त विश्लेषण न करता मी सभागृहाचा वेळ घेणार नाही. सभागृहाने सर्वानुमते नियम 289 ऐवजी नियम 97 अन्वये कायदा आणि सुव्यवस्था या विषयावर चर्चा करण्यास संमती दिली आहे. या चर्चेसाठी दीड तासाचा वेळ दिलेला आहे त्यातील 1 तासाची वेळ ही चर्चेकरिता आणि अर्धातास मंत्री महोदयांच्या उत्तरासाठी राहील.

श्री. दिवाकर रावते : उत्तरासाठी मंत्र्यांना सभागृहामध्ये हजर राहाण्यास सांगावे.

**उपसभापती** : नियम 97 अन्वयेच्या प्रस्तावावरील चर्चा दीड तासापेक्षा अधिक वेळ चालणार नाही.

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ KGS/ MAP/ प्रथम श्री.शिगम 14:50

**उपसभापती** .....

माननीय गट नेत्यांची बैठक आणि माननीय सभापती यांनी एकत्रितपणे चर्चा करुन जो काही निर्णय घेतला आहे त्या निर्णयाच्या पलिकडे मी जाणार नाही. दुसरी गोष्ट अशी की, ही चर्चा करीत असताना ज्या बाबी न्यायप्रविष्ट आहेत त्यावर कृपया सन्माननीय सदस्यांनी चर्चा करु नये. तिसरी गोष्ट अशी की, या चर्चेसाठी संबंधित माननीय मंत्री महोदयांच्या उत्तरासाठी अर्धा तासाची वेळ देण्यात यावी. या चर्चेनंतर आज अर्थसंकल्पावरील चर्चेचा पहिला दिवस असल्यामुळे त्या चर्चेला सुरुवात करण्यात येईल.

श्री. बाळासाहेब थोरात : आम्ही दुपारी 12.45 वाजता प्रश्नोत्तराच्या तासापासून उपस्थित आहोत. या चर्चेनंतर सभागृहात नेमके कोणते कामकाज करण्यात येणार नाही याची आम्हाला माहिती मिळाली तर आम्हाला आमच्या कामाचे नियोजन करता येईल.

**उपसभापती** : आता नियम 97 अन्वये चर्चेला सुरुवात होईल. आजच्या कार्यक्रमपत्रिकेत दाखविलेल्या लक्षवेधी सूचना होणार नाहीत. नियम 93 अन्वये निवेदने होणार नाहीत. अर्थसंकल्पावरील चर्चेचा आजचा पहिला दिवस असल्यामुळे ती चर्चा संपन्न होईल. अशा प्रकारचे कामकाज आपल्याला मंजूर आहे काय ?

( अनेक सन्माननीय सदस्य "मंजूर" असे म्हणतात.)

श्री. बाळासाहेब थोरात : ठीक आहे.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी आपापली मते एका तासात संपवावयाची आहेत. माननीय मंत्र्यांच्या उत्तरासाठी आपल्याला अर्धा तासाचा वेळ द्यावा लागेल.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, या चर्चेला सुरुवात होणार आहे. परंतु चर्चेतील मुद्दे लिहून घेण्यासाठी माननीय गृहमंत्री आणि गृह राज्यमंत्री उपस्थित नाहीत. त्यांना कृपया आपण बोलावणे पाठवावे.

**उपसभापती** : मी त्यांना बोलाविणे पाठवितो. तोपर्यंत आपण चर्चेला सुरुवात करावी. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी या चर्चेवरील आपले भाषण सुरु करावे.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : पवनराजे निंबाळकर यांच्या हत्येप्रकरणी विद्यमान खासदार डॉ.पद्मसिंह पाटील यांना झालेली अटक

**मु.शी.** : पवनराजे निंबाळकर यांच्या हत्येप्रकरणी विद्यमान खासदार डॉ.पद्मसिंह पाटील यांना झालेली अटक या विषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, नितीन गडकरी, कपिल पाटील,वि.प.स.यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

**उपसभापती** : या अल्पकालीन चर्चेसंबंधी औपचारिक प्रस्ताव मांडता येणार नाही. या चर्चेसाठी दीड तासाचा वेळ दिलेला आहे. सूचना देणरे सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी आपली सूचना वाचतील आणि भाषण करतील.

श्री. नितीन गडकरी ( नागपूर विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी नियम 97 अन्वये आपल्या पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो.

" पवनराजे निंबाळकर यांच्या हत्येप्रकरणी राज्यातील एक माजी मंत्री व विद्यमान खासदार यांना झालेली अटक, विविध संसदीय आयुधाव्दारे सदर विषय उपस्थित केला असता सरकारकडून तपास चालू आहे अशी उत्तरे देऊन सदर प्रकरण दडपण्याचा प्रयत्न करणे, तपास जाणीवपूर्वक संथगतीने करणा-या अधिका-यांची व संबंधित व्यक्तींची चौकशी करुन त्यांना अटक करण्याची आवश्यकता, सदर सदर हत्या प्रकरणात आघाडी शासनातील माजी मंत्री व विद्यमान खासदार यांनाच अटक झाल्याने सरकारची विश्वासार्हता संपुष्टात येणे, या संपूर्ण प्रकरणाबाबत सरकारने ताबडतोबीने आपली भूमिका स्पष्ट करण्याची आवश्यकता"

सभापती महोदय, मी या चर्चेला सुरुवात करीत आहे, परंतु माझ्या चर्चेची नोंद घेण्यासंबंधी आपण निदेश द्यावेत. या ठिकाणी सन्माननीय मंत्री श्री. बबनराव पाचपुते साहेब उपस्थित आहेत, ते माझ्या मुद्यांची नोंद घेतील व माननीय गृहमंत्र्यांकडे सादर करीत अशी अपेक्षा आहे. सभापती महोदय, आज सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी नियम 289 अन्वये " राज्यातील कायदा व सुव्यवस्थे"च्या स्थितीच्या संदर्भात प्रस्ताव दिला आहे, परंतु तो प्रस्ताव नियम 97 मध्ये रुपांतरीत करुन त्या प्रस्तावावर मी माझे विचार व्यक्त करीत आहे. राज्यात कायदा व सुव्यवस्थेच्या अनुषंगाने सांगावयाचे झाले तर विशेष करुन कै.पवनराजे यांच्या खून खटल्यामध्ये खासदार डॉ. पद्मसिंह पाटील यांना अटक केली गेली, त्यामुळे निर्माण झालेल्या प्रश्नाच्या बाबतीत चर्चा उपस्थित

3....



ABG/ KGS/ MAP/ प्रथम श्री.शिगम 14:50

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी......

झाली आहे. मी पिनपॉईंट चर्चा उपस्थित करणार आहे. उस्मानाबाद जिल्हयात तेरणा सहकारी साखर कारखाना आहे तसेच उस्मानाबाद जिल्हा सहकारी बँक आहे. उस्मानाबाद जिल्हा सहकारी बँकेत 285 कोटी रुपयांच्या घोटाळयाचे प्रकरण मी या सभागृहात उपस्थित केले होते. तसेच उस्मानाबाद सहकारी साखर कारखान्याच्या बाबतीत अनेक वादविवाद बाहेर आले आहेत. हा कारखाना साधारणतः 300 कोटी रुपये तोटयात आहे. परंतु सहकारामध्ये असलेली सत्ताकेंद्र आणि सहकारामध्ये मिळाणा-या सत्ताकेंद्रावर परिवारांचा अधिकार, त्या परिवाराच्या अधिकारामध्ये आपसात होणारे वादविवाद, त्याचे पर्यावसन खूना सारख्या घटना घडतात. याचा हा परिणाम आहे. सभापती महोदय, या ठिकाणी दोन महत्वाचे प्रश्न आहेत. जी गोष्ट बाहेर आलेली आहे. त्यात पहिला प्रश्न असा आहे की, यासंदर्भात महाराष्ट्र सरकारने विशेषतः कळंबोली येथे पनवले पोलीस स्टेशन अंतर्गत गुन्हा कलम 302 अन्वये दाखल केला होता. त्यावेळी श्री.पवनराजे निंबाळकर व त्यांचे वाहन चालक यांची गोळया घालून हत्या करण्यात आली. त्यानंतर अडीच ते तीन वर्षाच्या काळात या लोकांची हत्या कोणी केली यासंबंधीची वेगवेगळया प्रकारे चर्चा महाराष्ट्रात विविध वृत्तपत्रातून, विविध वाहिन्यांवरुन सुरु होती. सभापती महोदय, स्व.पवनराजे निंबाळकर यांचे सुपुत्र मला व माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांना भेटले. त्यांनी आम्हाला विनंती केली की, या घटनेची सी.बी.आय.कडून चौकशी झाली पाहिजे. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी व विरोधी पक्षाच्या सदस्यांनी नियम क्रमांक 93 अन्वये सूचना दिली होती. त्याच बरोबर लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून हा विषय सभागृहात उपस्थित केला.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MAP/ KGS/ 14:55

श्री.नितीन गडकरी........

सभापती महोदय, त्या विषयाला उत्तर देत असताना सरकारने जी भूमिका घेतली त्या भूमिकेमध्ये त्यांना कोणत्याही प्रकारे खुनाचा तपास लागू शकला नाही आणि हे सत्य आहे की या सरकारच्या तीन वर्षामध्ये पवनराजे निंबाळकर यांचा खून कोणी केला त्या मारेकऱ्यांना अटक करणे महाराष्ट्राच्या गृह विभागाला जमले नाही. सभापती महोदय, 3 वर्षामध्ये जे यांना जमले नाही ते सहा महिन्यामध्ये सीबीआयला जमले. या विषयावर ज्यावेळी पवनराजे निंबाळकर यांच्या सुपुत्राने हायकोर्टामध्ये याचिका दाखल केली आणि महाराष्ट्र सरकार राजकीय दबावाखाली या गुन्ह्याची योग्य चौकशी करीत नाही असा आरोप करुन त्यांनी वस्तुस्थिती न्यायालयासमोर मांडली त्यावेळी सन्माननीय हायकोर्टाने निर्णय दिला की, हे प्रकरण सीबीआयकडे द्यावे. मी मघाशी सांगितल्याप्रमाणे सीबीआयकडे हे प्रकरण जाण्याची दोन कारणे आहेत. एक तर हायकोर्टाने सु-मोटो निर्णय घेऊन सीबीआयकडे प्रकरणे सोपवावे किंवा महाराष्ट्र शासनाने एखाद्या प्रकरणाचा तपास करण्यासाठी तशा प्रकारची शिफारस सीबीआयकडे करणे. सीबीआय ही यंत्रणा माननीय पंतप्रधानांच्या अखत्यारित काम करते. सीबीआय केंद्रीय गृहविभागाच्या अखत्यारित काम करीत नाही. त्यामुळे सीबीआय माननीय पंतप्रधानांच्या अंतर्गत काम करीत असल्यामुळे गृह विभागाचा तो भाग असला तरी They are directly reporting to the Hon.Prime Minister. सीबीआयकडे आतापर्यंत अनेक प्रकरणे दिली गेली. मायावती, अमरसिंग यांच्या संबंधातील प्रकरण सीबीआयकडे सोपविले गेले. ही काँग्रेस इन्व्हेस्टिगेटींग ब्युरो आहे. सीबीआयची विश्वासार्हता बरीच खालावली. याची कारणे काय यामध्ये मी जाऊ इच्छित नाही.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सांगितल्याप्रमाणे रमेश गोवेकर यांची हत्या झाल्यानंतर हायकोर्टाने सीबीआयकडे या प्रकरणाचा तपास दिल्यानंतरही या प्रकरणातील मारेकरी सीबीआयला सापडले नाहीत त्यांना या केसमध्ये यश मिळाले नसले तरी पवनराजे निंबाळकरांच्या केसमध्ये सीबीआयने प्रभावीपणे काम करुन त्यातील मारेकरी पकडले. त्यांना ज्यांनी ज्यांनी मदत केली त्यांनाही पकडले आणि त्यातून अशी माहिती पुढे आली की, या प्रकरणामध्ये डॉ.पद्मसिंह पाटील यांचे नाव घेतल्यामुळे त्यांचा संबंध आला असून त्यांना कलम 302 लावून अटक झाली. महाराष्ट्रात खळबळ माजली. ते महाराष्ट्र राज्याचे माजी गृहमंत्री आहेत.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MAP/ KGS/ 14:55

श्री.नितीन गडकरी......

एका राजकीय पक्षाचे ज्येष्ठ नेते आहेत. त्यामुळे या घटनेमध्ये एक प्रश्नचिन्ह निर्माण झाले. सीबीआय जो तपास 6 महिन्यात करु शकते तोच तपास तीन वर्षात हे सरकार का करु शकले नाही. या सरकारला मारेकरी का सापडले नाहीत? महाराष्ट्र राज्याच्या गृहविभागाने ज्या पोलीस विभागाकडे हा तपास सोपविला त्या विभागामध्ये यामध्ये कोणाच्या तरी राजकीय दबावाखाली कारवाई केली नाही असे घडले आहे का? जे सीबीआयला सहा महिन्यात सापडले ते महाराष्ट्राच्या गृहविभागाला 3 वर्षात का सापडले नाही? ज्यावेळी हायकोर्टात पवनराजे निंबाळकर यांचे सुपुत्र गेले त्यावेळी हायकोर्टाने सीबीआयला आदेश दिल्यानंतर मारेकरी सापडतात. प्रश्न असा निर्माण झाला आहे की, पवनराजे निंबाळकर यांचे सुपुत्र हायकोर्टात गेले नसते आणि सीबीआय चौकशी झाली नसती तर सरकारने हे प्रकरण दप्तरी जमा केले असते. सरकारने उत्तर दिले पाहिजे. जे सीबीआयला सहा महिन्यात गवसले ते तुम्हाला तीन वर्षात का सापडले नाही? महाराष्ट्रात आघाडीचे सरकार असले तरी या सरकारमध्ये सातत्याने गृहविभाग हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते डॉ.पद्मसिंह पाटील हे राज्याचे गृहमंत्री होते. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसच्या गृहविभागाचे मंत्री वा त्यांच्या विभागाने हे प्रकरण दडपण्याचा प्रयत्न केला का याची चौकशी केली आहे. यामध्ये बोनाफाईड इन्टेन्शन आहे की मालाफाईड इन्टेन्शन आहे. मला जबाबदारीने आरोप करावयाचा आहे की, महाराष्ट्र सरकारच्या गृह विभागाला तीन वर्षात जे करता आले नाही ते सीबीआयने सहा महिन्यात करुन दाखविले. त्यांनी खुनाचे मारेकरी पकडले. ते भाडोत्री असो, त्यांनी सत्य बाहेर काढले.

2एम.1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .......

मग प्रश्न असा निर्माण होतो की, या प्रकरणात केवळ पवनराजे निंबाळकर यांच्याच संदर्भात नव्हे तर सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी जी नियम 289 च्या प्रस्तावाची सूचना दिली आहे ती सुध्दा महत्वाची आहे. ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक श्री. अण्णा हजारे यांच्या बाबतीत त्यांच्या खुनाची सुपारी दिल्याची चर्चा आहे. याचा अर्थ असा की थोर समाज सेवक श्री. अण्णा हजारे हे सीबीआयमुळे वाचले. जर केस सीबीआयकडे गेली नसती, सीबीआयच्या तपासातून जर हे मारेकरी पकडले गेले नसते तर हे सुध्दा बाहेर आले नसते. म्हणजेच अण्णा हजारे यांची देखील हत्त्या हे मारेकरी करणार होते ही माहिती पवनराजे निंबाळकर यांच्या मारेकऱ्यांकडून उघड झाली आहे. या प्रकरणात कायदा व सुव्यवस्थेचे मोठे लॅप्सेस आहेत. माझे पहिले मत असे आहे की, यामध्ये मी कॉंग्रेसच्या माननीय मुख्यमंत्र्यांना व गृहमंत्र्यांना जबाबदार धरु शकत नाही. पण डोळे बंद करुन गुन्हे होत असतील तर चुपचाप राहणे किंवा डोळेझाक करणे हा देखील गुन्हाच आहे. माननीय मुख्यमंत्र्यांना देखील पवनराजे निंबाळकर यांच्या मुलाने निवेदन दिले होते त्याची प्रत त्यांनी माझ्याकडे दिली होती. याप्रकरणी माननीय मुख्यमंत्र्यांनी कोणती पावले उचलली ? तसेच माननीय गृहमंत्र्यांनी माननीय मुख्यमंत्र्यांशी चर्चा केली होती काय ? गेल्या तीन वर्षात त्यांनी या फाईलच्या संदर्भात काय केले ? ज्यांच्याकडे चौकशी सोपविण्यात आली होती त्या पोलिसांनी काय केले ? अशा सर्वच बाबतीत आता प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. या सर्व विभागांच्या पोलीस अधिकाऱ्यांच्या क्रेडिन्शियल्सचा, गृह खात्याच्या विश्वासार्हतेवरच या निमित्ताने प्रश्न निर्माण झालेला आहे. Either you like it or not पण सीबीआयने केलेल्या तपासावरुन राज्यातील कायदा व सुव्यवस्थेची स्थिती किती चिंताजनक आहे याचा आपण विचार करावा. पश्चिमेकडून अतिरेकी येतात आणि राज्यात शिरुन हॉटेलमध्ये जातात व हत्त्या करुन पळून जातात आणि त्या ठिकाणी कोणाच्या हेल्मेटमधून गोळ्या जातात तर कोणाच्या बुलेटप्रुफ जॅकेटमधून गोळ्या लागतात. इंटेलिजन्स विंगचे काय झाले त्याची चर्चा आपण करतो. नाशिकमध्ये काल एक घटना घडली की, 50 गुंड आले आणि त्यांनी मोटरसायकली जाळून टाकल्या. या राज्यात अनेक खून झाले त्याबद्दल मी बोलणार नाही, इतर सन्माननीय सदस्य बोलतील. पण दुर्दैवाने राजकीय कार्यकर्ते अशा हल्ल्यांमध्ये मृत्यू पावले त्यांच्या हत्त्येची चौकशी पूर्ण होऊ शकली नाही. याचा अर्थ असा की, या

.....2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .....

राज्यात जे सोईचे असेल ते करावयाचे आणि गैरसोईचे असेल ते दाबायचे, हेच राज्याच्या गृह खात्याचे धोरण असेल तर राज्यातील कायदा व सुव्यवस्था कशी राहणार आहे याचा विचारच केलेला बरा. म्हणून मी जबाबदारीने सांगू इच्छितो की, जे सीबीआयला गवसले ते गृह खात्याला गवसले नाही याचे कारण याप्रकरणात गृह खात्याची भूमिका संशयास्पद आहे. गृह खात्याला केवळ खुनाचे मारेकरी पकडण्यातच अपयश आले नाही तर ते पकडले जाऊ नयेत अशाच प्रकारे ही केस सॅबोटेज करण्याचे काम या गृह विभागाने केलेले आहे. एवढेच नव्हे तर आपण हे तत्व मानतो की, राज्यात गुन्हेगार कोणीही असो, छोटा असो अथवा मोठा असो, राजा असो अथवा प्रधान असो अथवा सभापती असो. यासंदर्भात आणिबाणीच्या काळात वादही झाला होता. हेबियस कॉरपसच्या अर्जावर एक प्रसिध्द डिस्कशन झाले होते. त्यावेळी विरोधी पक्षाच्या वकिलाने तत्कालीन ॲटर्नी जनरल श्री. निरन डे यांना सुप्रिम कोर्टाने विचारले होते की, एखादा पदावर असणारा प्रधान मंत्री असेल आणि त्या व्यक्तिने खून केला तर त्याच्यावर कोर्टात केस चालविता येणार नाही असे तुम्हाला म्हणावयाचे आहे काय ? त्यावेळेस श्री. निरन डे यांनी सुप्रिम कोर्टाला सांगितले होते की, "यस मिलॉर्ड" कायदा तसाच आहे आणि मला तेच म्हणावयाचे आहे. त्यानंतर जनता पक्षाचे राज्य आले आणि त्यांनी ती घटनादुरुस्ती रद्द केली. हे राज्य कायद्याचे आहे, हे राज्य जनतेचे आहे. मग माणूस कितीही श्रीमंत असो, राजा असो, फकीर असो, गरीब असो, रंक असो सुशिक्षीत असो अथवा विद्वान असो, कितीही मोठा असला तरी तो कायदा आणि व्यवस्थेसमोर सगळे समान असतात. गुन्हेगाराला जसे जात, पंथ, प्रेम पक्ष वगैरे नसते तसेच कायद्यातील व्यक्तिने वागले पाहिजे म्हणून याप्रकरणात एवढेच मला सांगावयाचे आहे की, या विषयावर राष्ट्रवादी काँग्रेसच्या गृह खात्याने आणि तत्कालीन गृहमंत्र्यांनी हे प्रकरण दाबलेले आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ....

या प्रकरणामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या गृहविभागाने तत्कालीन मंत्र्याने हे प्रकरण दाबले आहे, या प्रकरणामध्ये राज्य शासनाने योग्य प्रकारे चौकशी केलेली नाही, या प्रकरणामध्ये श्री. पद्मसिंह पाटील यांचे नाव आल्यामुळे हे प्रकरण सायबोटेज करुन या प्रकरणाची वाट लावली गेली आहे. हाय कोर्टाच्या निर्णयामुळे हे प्रकरण बाहेर आलेले आहे त्यामुळे राज्यशासनाची वागणूक अतिशय निषेधार्ह आहे त्यामुळे मी राज्याच्या मुख्यमंत्री महोदयांना आवाहन करतो की, कायदा आणि सुव्यवस्थेच्या संदर्भात राज्यसरकारची जी बायस वागणूक आहे ती योग्य नाही. सत्तेवर बसतांना आपण माननीय राज्यपाल महोदयांसमोर जी शपथ घेतलेली आहे त्या शपथेमध्ये आपण माननीय राज्पाल महोदयांसमोर सांगता की, " मी घटनेची शपथ घेऊन असे वचन देतो की, मी राज्यातील कोणत्याही व्यक्तीस जात,धर्म,पंथ,लिंग,भाषा कुठलीही असली तरी या आधारावर मी कोणावरही अन्याय करणार नाही.मी सगळयांना समान वागणूक देईन." अशी तुम्ही माननीय राज्यपाल महोदयांसमोर शपथ घेतलेली आहे. परंतु आपण मात्र माझ्या पक्षाचा तो "राजा" आणि दुसरा तो "बंडू", त्याला मारा लाथा. आपला जो आहे त्याला खपवून घेण्याचे काम या शासनाने केलेले आहे. या प्रकरणामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे वर्तन योग्य नाही. श्री. पद्मसिंह पाटलांना वाचविण्याचे काम शासनाकडून जे होत आहे ते बरोबर नाही. अशा प्रकारे तुमची लोकशाहीवर श्रध्दा आहे? श्री. पद्मसिंह यांना अटक झाल्याबरोबर उस्मानाबाद येथील बसगाडयांची तोडफोड करण्यात आली, बंदचा कॉल करण्यात आला.तुम्हाला सीबीआय आणि न्यायालयाला हे सांगायचे आहे, आमच्या नेत्याने खून केला तरी त्याला अटक करावयाची नाही? ऊस्मानाबाद येथे प्रेसवाल्यांना मारहाण करण्यात आली. अशी तुमची लोकशाहीवरील श्रध्दा आहे? (अडथळा) राष्ट्रवादी पार्टी ही सरदारांची पार्टी आहे. मला एवढेच सांगावयाचे आहे की, श्री. पवनराजे निंबाळकर यांची जी हत्या झाली त्या प्रकरणात पद्मसिंह पाटील यांच्यावर गृहविभागाने कायदेशीर कारवाई केलेली नाही. त्यामुळे ज्या पोलीस अधिका-यांनी कुचराई केलेली आहे, ज्या डिपार्टमेंटच्या अधिका-यांनी कुचराई केलेली आहे, ज्या मंत्र्यांने दबाव आणून कारवाई दाबलेली आहे आणि या प्रकरणात आता जे एक्सपोज झालेले आहे त्यांचे तुम्ही काय करणार हा माझा सवाल आहे. हे शासनाचे लॅप्सेस आहेत, हे गृह विभागाचे लॅप्सेस आहेत म्हणून माझी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती आहे की, माननीय मुख्यमंत्री हे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...2...

श्री. नितीन गडकरी ....

जरी कॉंग्रेस पक्षाचे असले तरी ते न्यायप्रिय आहेत, घटनेची शपथ घेऊन ते मुख्यमंत्री झालेले आहेत. राष्ट्रवादीचे पाप आहे म्हणून ते झाकायचे अशा प्रकारचे काम त्यांनी करु नये. तीन वर्षे हे प्रकरण दाबले गेले त्यासाठी उच्चस्तरीय चौकशी, हायकोर्टाच्या निवृत्त न्यायमूर्ती मार्फत करुन या प्रकरणात सरकारमधील कोण कोण दोषी आहेत त्यांची नावे समोर आली पाहिजे व त्यांच्यावर कठोर कारवाई केली पाहिजे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, हरकतीच्या मुद्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे. या ठिकाणी एका महत्वाच्या विषयावर चर्चा सुरु असतांना गृहविभागाचे कोणीही मंत्री या ठिकाणी हजर नाहीत. आमचे नेते या विषयावर आपले परखड विचार मांडत असतांना गृहविभागाच्या एकाही मंत्र्यांने सभागृहात उपस्थित राहू नये हे काही योग्य नाही. गृहविभागाचे मंत्री उपस्थित नसल्यामुळे आम्ही उपस्थित केलेल्या मुद्यांना न्याय मिळणार नाही, उत्तर मिळणार नाही. गृहखात्याला एक कॅबिनेट व दोन राज्य मंत्री असतांना त्यापैकी एकानेही सभागृहात उपस्थित नसणे हे काही योग्य नाही.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, गृहविभागाच्या मंत्र्यांवर कामाचा बोजा येऊ नये म्हणून गृहविभागाच्या राज्यमंत्र्यांमध्ये कामाच्या संदर्भात विभाजन झाले. विभाजन झाल्यामुळे केवढे मोठे भांडण झाले होते याची आपल्याला माहिती आहे. एका राज्यमंत्र्यांने तर गाडीच्या चाव्या सुध्दा फेकून दिल्या होत्या. त्याच वेळेस महाराष्ट्रातील जनतेला समजले की, गृहखात्याला दोन राज्यमंत्री असून एक राज्यमंत्री शहरासाठी आहेत व दुसरे मंत्री ग्रामीणसाठी आहेत. मंत्री मंडळाने गृहविभागासाठी एवढी मोठी व्यवस्था केली असल्यामुळे संबंधित खात्याच्या एका तरी मंत्र्यांने या चर्चेकरिता उपस्थित रहावयास पाहिजे होते. सदनात मंत्रीमहोदय उपस्थित नसतात त्यामुळे माननीय मंत्रीमहोदयाना नोटीस काढावी लागली होती. वरच्या सभागृहात मंत्री उपस्थित रहात नाही परंतु खालच्या सभागृहात देखील मंत्री उपस्थित रहात नाही. आम्हाला माहिती आहे आपल्याला आता जाण्याचे वेध लागले आहेत परंतु चटावरचे श्राध्दा काय उरकायचे ते पटकन उरकून घ्या.

...3...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** :सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी या चर्चेला सुरुवात केल्याबरोबर गृहमंत्र्यांना सभागृहात उपस्थित रहाण्याच्या संदर्भात मी निरोप दिला होता. संबंधित खात्याच्या राज्यमंत्र्यांनी येथे तातडीने उपस्थित राहणे आवश्यक होते. ही चर्चा सदनाच्या दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी एकमताने घेतलेली असल्यामुळे या चर्चेला गांभीर्य आहे. असे असतांना गृहखात्याचे मंत्री सभागृहात नसणे हे तितकेसे बरोबर नाही.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सभागृहाची बैठक स्थगित करण्यात यावी आणि माननीय मंत्रिमहोदयांना वा राज्य मंत्र्यांना बोलविण्यात यावे अशी माझी आपणास विनंती आहे. या ठिकाणी अतिशय महत्वाच्या विषयावर चर्चा सुरु आहे . या चर्चेकरिता दोन वेळा सभागृहाची बैठक स्थगित करण्यात आली होती आणि एकत्र बसून दोन्ही बाजूच्या गट नेत्यांशी चर्चा केल्यानंतर या सबंधीची चर्चा घेण्याचे ठरविण्यात आले होते. त्या चर्चेच्या बाबतीत शासन जर गंभीर नसेल तर आता चर्चा न करता सभागृहाची बैठक स्थगित करण्यात यावी. मंत्रीमहोदय येईपर्यंत चर्चा करण्यास आम्ही तयार नाही.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, चार राज्यातील गृह मंत्र्यांची नक्षलवाद्याच्या संदर्भात आज सहयाद्री अतिथीगृहावर पूर्व नियोजित बैठक होती. या सभागृहात नक्षलवाद्यांच्या संदर्भातील चर्चेच्या वेळी हा प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. अत्यंत महत्वाचा असा नक्षलवाद्यांचा प्रश्न चार राज्याशी संबंधित आहे. त्यामुळे चार दिवसापूर्वी ही बैठक ठरविण्यात आली होती. सहयाद्री अतिथीगृहावर ही बैठक चालू होती त्यामुळे माननीय गृह मंत्री वा सन्माननीय गृह राज्यमंत्री येथे येतील तोपर्यत चर्चा सुरु करण्यात यावी.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांचा मला आदर वाटतो. त्यांनी असे सागितले की ,जे काही अंगावर आलेले आहे ते आम्ही अंगावर घेणारच आहोत. राष्ट्रवादी पक्षाच्या वतीने त्यांनी अशी भूमिका मांडली होती. या ठिकाणी सभागृहाचे नेते उपस्थित नाहीत. त्यांनी या ठिकाणी उपस्थित राहिले पाहिजे. माननीय गृहमंत्री हे राष्ट्रवादीचे असल्यामुळे ते खालच्या सभागृहात उत्तर देण्यासाठी जाणार आहे काय ? तसे असेल तर या ठिकाणी माननीय गृह राज्यमंत्र्यांनी उत्तर देण्यासाठी यावे. ही चर्चा सुरु होऊन आजा 19 मिनिटे झालेली आहेत अजूनही गृह मंत्री वा गृहराज्यमंत्री येथे आलेले नाहीत. पाच ते दहा मिनिटासाठी बैठक तहकूब करावी. प्रत्येक वेळी आम्ही अवमानित होऊन कामकाज करावयाचे काय ? या विषयाला गांभीर्य नाही काय ? संपूर्ण राज्याचा हा विषय आहे त्यामुळे माननीय मंत्री महोदय येईपर्यत कामकाज तहकूब करावे..

श्री.बबनराव पाचपुते : या विषयावरील चर्चा सुरु ठेवण्यात यावी. मी मुद्दे लिहून घेत आहे आणि उत्तर देण्याची जबाबदारी शासनाने घेतलेली आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांना उत्तर मिळेल.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG

श्री.दिवाकर रावते : दोन्हीही मंत्री अपक्ष आहेत. मंत्र्यांच्या अडचणीबाबत जर पक्षीय मुद्दा असेल तर त्यामध्ये आपण का पडत आहात ?

श्री.पांडुरंग फुंडकर : दहा मिनिटासाठी बैठक तहकूब करण्यात यावी.

श्री.नितीन गडकरी : या ठिकाणी दोन्ही अपक्ष मंत्री उपस्थित आहेत आणि पक्षाचे मंत्री मात्र अनुपस्थित आहेत.

श्री.रमेशचंद्र बंग : सभापती महोदय, मी पक्षातर्फे निवडून आलेलो आहे. मी अपक्ष नाही.

श्री.नितीन गडकरी : सन्माननीय मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील मात्र अपक्ष आहेत. त्याचबरोबर सन्माननीय मंत्री श्री.बबनराव पाचपुते अपक्ष आहेत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण मागच्या घटना आठवाव्यात. आम्ही ज्यावेळी सत्तेवर होतो त्यावेळी आमच्याकडून थोडीशी चूक झाली तरी या सदनामध्ये सूडबुध्दीने ते वागले होते. अर्थात आता आम्ही त्या पातळीवर जाणार नाही.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांच्या भाषणाची लींक तुटता कामा नये .

श्री.नितीन गडकरी : सभागृहाची बैठक दहा मिनिटासाठी स्थगित करण्यात यावी.

श्री.दिवाकर रावते : सहयाद्रीवरील बैठक संपून दोन तास झालेले आहेत.

**उपसभापती** : ठीक आहे. आता सभागृहाची बैठक स्थगित होईल आणि दुपारी 3.30 पुन: भरेल.

( 3.13 ते 3.30 पर्यत बैठक स्थगित झाली )

नंतर श्री,सरफरे

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

**पृ.शी.** : राज्यात बिघडलेली कायदा व सुव्यवस्था.

**मु.शी.** : राज्यात बिघडलेली कायदा व सुव्यवस्था या विषयावर सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, नितीन गडकरी, कपिल पाटील यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

चर्चा पुढे सुरु...

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मला देखील या प्रस्तावावर पाच मिनिटे बोलण्याची संधी मिळावी अशी विनंती आहे.

**उपसभापती** : ही चर्चा दीड तासांनी ऑन लेग ठेवून अर्थसंकल्पावरील चर्चा पूर्ण करु. व त्यानंतर पुन्हा ही चर्चा पुढे सुरु ठेवू.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय गृह राज्यमंत्री सभागृहामध्ये उपस्थित नसल्यामुळे सभागृह स्थगित करावे लागले त्यामुळे माझ्या भाषणाची लिंक तुटली होती. विशेषत: मी या घडलेल्या घटनेचा प्रमुख मुद्दा मांडतांना असे विचारले होते की, या प्रकरणाचा तुमच्याकडे तीन वर्षे तपास असतांना आणि श्री. पवनराजे निंबाळकर यांचे सुपुत्र वारंवार माजी गृहमंत्री श्री. आर.आर. पाटील यांना भेटले तरी तुम्ही गेल्या तीन वर्षामध्ये काय केले? या गुन्हयातील आरोपी आपणास गवसले नाहीत. सी.बी.आय.ला सहा महिन्यात जमले ते तुम्हाला तीन वर्षात कां जमले नाही? हा प्रश्न आहे. जर त्यांचे चिरंजीव हायकोर्टामध्ये गेले नसते आणि हायकोर्टाने सी.बी.आय. कडे इन्क्वायरी दिली नसती तर हे प्रकरण बाहेर आले नसते. हे प्रकरण बाहेर आले याचे कारण हायकोर्ट आहे. याबाबत तुमची भूमिका काय होती? यामधील तुमचे इंटेशन हे मेलाफाईड होते की बोनाफाईड होते? श्री. पवनराजे निंबाळकरांचे सुपुत्र माननीय मुख्यमंत्र्यांना भेटले आणि त्यांनी चौकशीची मागणी केल्यानंतर तुम्ही काय चौकशी केली? कायद्यासमोर सर्व समान असतांना केवळ तुमच्या पक्षाचे माजी गृह राज्यमंत्री व पक्षाचे नेते होते म्हणून तुम्ही काहीही कारवाई केली

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ MMP/

श्री. नितीन गडकरी...

नाही? हे प्रकरण बाहेर न येण्याची कारणे काय? मी याठिकाणी जबाबदारीने आरोप केले की, या प्रकरणामध्ये आघाडी सरकारमधील राष्ट्रवादी कॉंग्रेसची भूमिका संशयास्पद आहे. आपण हे प्रकरण दाबण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणी माझी विनंती आहे की, या प्रकारचे वर्तन पाहिल्यानंतर यामध्ये गृह विभागाच्या पोलीस अधिकाऱ्यांचे काही लॅप्सेस आहेत की नाहीत, मंत्र्यांचे आहेत की नाहीत याची चौकशी झाली पाहिजे. गेल्या तीन वर्षात या प्रकरणी जी हेळसांड झाली त्याची माननीय मुख्यमंत्र्यांनी निवृत्त न्यायमूर्तींकडून चौकशी जाहीर करुन त्यामधून सत्य बाहेर आणले पाहिजे. ही चौकशी कुणामुळे झाली नाही हे सत्य सभागृहासमोर आणले पाहिजे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ MMP/ SBT/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 15:35

श्री.नितीन गडकरी . . . .

सभापती महोदय, मला विश्वास आहे की, कॉंग्रेस पक्षाच्या माननीय ज्येष्ठ नेत्या श्रीमती सोनिया गांधी आणि या देशाचे माननीय पंतप्रधान श्री.मनमोहन सिंग हे न्यायप्रिय आहेत. त्यांनी या प्रकरणामध्ये सी.बी.आय.कडून कठोर कारवाई होत असताना कधीही ती कारवाई थांबविली नाही. किंबहुना ही कठोर कारवाई करण्यामध्ये त्यांनी न्यायपूर्ण भूमिका घेतली आहे, त्याबद्दल मी निश्चितच त्यांना धन्यवाद देतो आणि या प्रकरणामध्ये पुढे जाऊन निवृत्त न्यायमूर्तीकडून या प्रकरणाशी माननीय गृहमंत्र्यांचा, राष्ट्रवादी पक्षाचा कसा दबाव आहे, असे का झाले ? याची चौकशी करावी. लोकशाहीच्या दृष्टीने सांगावयाचे तर हाय कोर्टाच्या आदेशामुळे ही गोष्ट सी.बी.आय.ला जमली.परंतु ही गोष्ट सरकारला जमली नाही हे सरकारच्या सामुहिक जबाबदारीचे अपयश आहे. म्हणून या राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांना आपले अपयश धुवून काढावयाचे असेल तर त्यांनी या प्रकरणाची चौकशी निवृत्त न्यायमूर्तींमार्फत करावी आणि तीन महिन्याच्या आत याबाबतचा अहवाल तयार करुन पुढील अधिवेशनामध्ये जरुर सादर करावा अशी माझी या सदनामध्ये मागणी आहे. या प्रकरणामध्ये . . ..

**उपसभापती** : हे मॅटर सी.बी.आय.कडे आहे आणि पुन्हा त्याची चौकशी . . . .

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मी त्याबद्दल बोलत नाही. त्या केसच्या चौकशी बाबत सांगत नाही. मला त्या चौकशीमध्ये हस्तक्षेप करावयाचा नाही. परंतु सरकारला ही बाब तीन वर्षामध्ये का जमली नाही ? हे प्रकरण कोणत्या कारणामुळे दाबले गेले ? कोणाच्या सांगण्यावरुन दाबले गेले ? हे प्रकरण दाबण्याचा प्रयत्न कोणी केला ? माननीय गृहमंत्र्यांनी केला की पक्षाच्या नेत्यांनी केला ? याबाबतीत कार्यवाही का झाली नाही ? यातील गोष्टी का बाहेर आल्या नाहीत ? हे खूनेकरी सी.बी.आय.ने पकडले आहेत, मग गृह विभागाने का पकडले नाहीत ? गुरुनाथजी, या मध्ये पाणी नेमके कुठे मुरलेले आहे ? तुम्हालाही माझे म्हणणे आवडेल. या सर्व गोष्टी बाहेर आल्या पाहिजेत असे मी म्हटलेले आहे. म्हणून यासंदर्भातील चौकशी झाली पाहिजे. यामधील सत्य बाहेर आले पाहिजे आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे धोरण काय आहे हे देखील स्पष्ट झाले पाहिजे. माननीय गृहमंत्र्यांचे धोरण स्पष्ट झाले पाहिजे आणि राज्याचे माननीय मुख्यमंत्री म्हणून त्यांनी याठिकाणी सदरहू प्रकरणाची निवृत्त न्यायाधीशांच्या मार्फत चौकशी करुन त्याची सविस्तर माहिती अहवालाच्यारुपाने सभागृहासमोर सादर करावी.असे झाले तर या प्रकरणाच्या माध्यमातून या राज्या

. . . .2 क्यु-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी . . . .

तील जनतेचा लोकशाहीवरील विश्वास वाढेल, कायदा व सुव्यवस्थेवरील विश्वास वाढेल. गुरुनाथजी, तुमच्या पक्षाकडे गेली साडेनऊ वर्षे कायदा व सुव्यवस्थेच्या संबंधातील विभाग आहे. पण तुम्ही महाराष्ट्राची वाट लावली, सत्यानाश केला. तुम्ही सगळा महाराष्ट्र डुबवला. आज महाराष्ट्रामध्ये कायदा व सुव्यवस्थेवर कोणाचा विश्वास राहिलेला नाही ही परिस्थिती आहे आणि वरुन तुम्ही कॉंग्रेसच्या नेत्यांच्या नावाने खडे फोडता. पण याबाबतीत सर्व चौकशी झाली पाहिजे, हे सत्य बाहेर आले पाहिजे आणि ते महाराष्ट्रातील जनतेला समजले पाहिजे. मग त्यात जो कोणी गुन्हेगार असेल, त्यांच्यावर सी.बी.बाय.कारवाई करील, प्रकरण कोर्टामध्ये जाईल आणि मग जी काही कारवाई व्हावयाची आहे ती होईल. त्यातून अजून काही लोकांची नावे घेतली जात आहेत आणि तसे काही असेल तर त्यांची चौकशी होईल आणि यामध्ये जे कोणी असतील तर ते त्याला फेस करतील. पण कायद्यासमोर सर्वजण समान आहेत. कायद्यासमोर कोणीही लहान-मोठा नाही. मघाशी मी कै.श्रीमती इंदिरा गांधी यांच्या केसच्या संबंधातील अलाहाबाद हाय कोर्टाचा निर्णय सांगितला होता. त्यामुळे महाराष्ट्र शासनाने यासंदर्भात कठोर कारवाई करुन यातील सर्व लॅप्सेस जनतेसमोर आणले पाहिजेत. मग ते ॲडमिनिस्ट्रेटीव्ह लॅप्सेस असतील, पोलीस अधिकाऱ्यांचे लॅप्सेस असतील किंवा पोलिटीकल लॅप्सेस किंवा मंत्री महोदयांचे वर्तन असेल इ.बाबी समोर आल्या पाहिजेत. त्यावर सवाल-जबाब झाले पाहिजेत, ते रेकॉर्डवर आहे पाहिजे आणि यातील सत्य महाराष्ट्रातील जनतेला समजले पाहिजे. This is the failure of the Government, this is the failure of the Home Minister. म्हणून याबाबतीतील सर्व माहिती उघड व्हावयास पाहिजे अशी मी या चर्चेच्या निमित्ताने मागणी करतो आणि राष्ट्रवादी कॉंग्रेसला पूर्णपणे जबाबदार धरतो. त्यांच्याशी वर्तणुकीची चौकशी झाली पाहिजे एवढेच सांगून माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

----

. . . .2 क्यु-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, माननीय सभापतींनी महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनतेच्या भावना लक्षात घेऊन, एका महत्वाच्या विषयावरील चर्चेला अनुमती दिली, त्याबद्दल मी त्यांना मनापासून धन्यवाद देतो. कारण सध्या विधानसभेचे अधिवेशन सुरु आहे आणि बाहेर राजकीय सुपारीची एवढया मोठया प्रमाणात राजकीय उलथापालथ होत असताना, त्याबाबत सरकारचे काय म्हणणे आहे? अशी विरोधी पक्षाकडून मागणी करण्यात आली नाही तर संसदीय कार्यपध्दतीच्या बाबतीत लोकांच्या मनामध्ये संशय निर्माण होईल म्हणून मी माननीय सभापतींना मनापासून धन्यवाद देतो.

सभापती महोदय,याठिकाणी अनेक प्रश्न निर्माण झालेले आहेत.या महाराष्ट्र राज्याचे माजी गृह मंत्री, ऊर्जा मंत्री आणि धाराशीव येथील विद्यमान खासदार,ज्यांना सी.बी.आय.ने खूनाच्या आरोपाखाली अटक केलेली आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ SBT/ MMP/ प्रथ सौ. रणदिवे.... 15:40

श्री. दिवाकर रावते..

ज्यांचा उल्लेख आदरणीय श्री.शरद पवार साहेबांनी "आदरणीय श्री. पद्मसिंह पाटील"असा केला. एका गुन्हेगाराच्या बाबतीत असा उल्लेख करावा काय? अशा प्रकारची जनमानसात चर्चा आहे, त्यासंदर्भात या सभागृहात चर्चा करण्यात येत आहे. सभापती महोदय, ही चर्चा नव्याने करण्यात येत आहे, अशातला भाग नाही. यापूर्वी साधारणपणे सन 2008 च्या एप्रिल महिन्यात या सभागृहात ही चर्चा झाली होती. तत्कालीन गृह मंत्र्यांनी याबाबतीत जे केलेले होते त्यामध्ये असे म्हटले आहे की, "त्या आरोपींची लाय-डिटेक्शन टेस्ट व ब्रेन मॅपिंग टेस्ट करण्यात आल्या आहेत" हे सगळे रेकॉर्डवर आहे. "इस्माईल दस्तगीर पटेल,फिरोज बशीर खान, तानाजी धर्मराज पाटील, सिध्दिकी इब्राहिम शेख ऊर्फ गोलाभाई अशा प्रकारची आरोपींची नावे होती." त्यावेळी "सदनामध्ये हे सगळे छोटा-राजन टोळीशी संबंधीत आहेत असे सांगण्यात आलेले आहे." या संदर्भात शासननेच निवेदन केलेले आहे. त्यामध्ये असे म्हटले आहे की, "दि.28 मार्च, 2008 रोजी करण्यात आलेल्या नार्को टेस्टची व्हीडीओ सीडी नवीन मुंबई पोलिसांना प्राप्त झाली. या व्हीडीओ सीडीचे अवलोकन करता पवनराजे निबांळकर यांचे खूनाचे संदर्भात त्यांनी 1) महेंद्रसिंग बिश्त 2) फिरोज खान 3) अजितबाबा 4) डॉ. पद्मसिंह पाटील 5) डी.के.राव 6) विकी मल्होत्रा 7) छोटा राजन व 8) राणा दादा यांची नावे नमूद केली आहेत."सभापती महोदय, हे अजितबाबा कोण आहेत, हे माहीत नाही. सभापती महोदय, नार्को टेस्टमध्ये उघडकीस आलेली नावे जाहीर रित्या सभागृहात सांगण्यात आलेली आहेत. ही नावे मी सांगत आहे, अशातला भाग नाही. सभापती महोदय, हा राजकारणाचा विषय नाही. तत्कालीन गृह मंत्र्यांनी सदनामध्ये ही नावे सांगितलेली आहेत आणि ती सर्व नावे रेकॉर्डवर आलेली आहेत. आता हा राणा दादा कोण आहे? अजितबाबा कोण आहे? आणि डॉ. पदमसिंह पाटील यांचे नावही त्यामध्ये नमूद केले आहे. निवेदनामध्ये पुढे असे म्हटले आहे की, "तसेच पवनराजे यांची हत्या ज्या वेळी झाली त्यावेळी नसून विलास जाधव यांची ज्यावेळी हत्या

झाली त्यावेळी तो नॅशनल हाय-वे-वर उभा असल्याबाबत दिसून येते. तसेच तानाजी पाटील हे स्वत: पवनराजे यांचा नातेवाईक असल्याबाबत व त्यांच्याकडून वेळोवेळी आर्थिक मदत घेत असल्याबाबत नमूद केले आहे. वर नमूद व्यक्तीपैकी डी.के.राव, (दि.17-11-1998 पासून) व विकी मल्होत्रा (दि.02-08-2005 पासून ) हे दोघे सदर घटनेचे वेळी जेलमध्ये असल्याचे अद्याप

..2..

SMT/ SBT/ MMP/

श्री. दिवाकर रावते....

पावेतोच्या तपासणीमध्ये निष्पन्न झाले आहे." असे म्हटले आहे. यामध्ये कोण आरोपी जेलमध्ये होते, कोण जेलच्या बाहेर होते हे सगळे नार्को टेस्टचे प्रकरण आहे. पुढे असे म्हटलेले आहे की,"दि.15 जानेवारी,2008 रोजी श्रीमती आनंदीबाई पवनराजे निंबाळकर यानी सदर गुन्हयाचा तपास स्वतंत्र तपास यंत्रणेमार्फत प्राधान्याने सी.बी.आय.मार्फत करण्यात यावा अशा प्रकारची मागणी केली होती." अशा प्रकारची मागणी त्यांनी कां केली? एवढे सगळे घडल्यानंतर सुध्दा या खून खटल्याच्या बाबतीत कोणत्याही प्रकारची हालचाल दिसून येत नाही, या शासनाकडून योग्यती दखल घेतली जात नाही, अशा प्रकारचे निदर्शनास आले, त्यावेळी त्यांनी ती मागणी केली होती. सभापती महोदय, या सगळया निवेदनामध्ये मी जात नाही. या निवेदनावरुन हे सिध्द झाले आहे की, नॉर्को टेस्टमध्ये डॉ. पद्मसिंह पाटील यांचे नाव विधिमंडळाच्या रेकॉर्डवर आलेले आहे आणि ते आरोपी आहेत अशा प्रकारचे निदर्शनास आले असताना त्याना त्यावेळी अटक का झाली नाही, असा आता प्रश्न निर्माण झालेला आहे. त्यावेळी त्यांना कां अटक केली नाही? याचा अर्थ असा होतो की, सी.बी.आय.कडे हे प्रकरण वर्ग होईपर्यंत राज्याची पोलीस यंत्रणा त्यांना झुकते माप देत होती. किंबहुना हया खटल्याकडे दुर्लक्ष करीत होती. सभापती महोदय, दुर्लक्ष करीत होती असे नाही तर दुर्देवाने कोठल्यातरी राजकीय दबावाने महाराष्ट्राच्या पोलिसांनी या प्रकरणामध्ये योग्य गती घ्यावी, अशा प्रकरची परिस्थिती नव्हती. पोलीस यंत्रणा सक्षम असून आणि योग्य काम करण्याच्या योग्यतेची असून देखील या प्रकरणामध्ये त्यांना पुढचे पऊल टाकले जाऊ देत नव्हते. हा राजकीय दबाव ज्या गृह मंत्र्यांच्या करकिर्दीमध्ये निर्माण झाला आहे तो प्रश्न या संदर्भात निर्माण झालेला आहे. डॉ. पद्मसिंह पाटील यांना कलम 302 खाली अटक करण्यात आली असे मी दूरदर्शनवर पाहिले होते. म्हणजे खूनाच्या गुन्हयाखाली त्यांना अटक करण्यात आली होती. येथेच ग्यानबाची मेख आहे. खुनाच्या जागेवर पद्मसिंह पाटील नव्हते. तेव्हा कलम 120 (ब) खाली खुनाच्या गुन्हयाचे कटकारस्थान करणे याखाली त्यांना अटक करावयास पाहिजे होते. सी.बी.आय.ने त्यांना कलम 302 खाली कशी काय अटक केली? (अडथळा) कलम 120 (ब) हे खुनाच्या गुन्हयापेक्षाही जास्त गंभीर आहे.

यानंतर श्री. बरवड....

अप्रकाशित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ......

मला एका गोष्टीचा आनंद आहे की, आता श्री. उज्ज्वल निकम यांच्याकडे जाण्याची गरज नाही. सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांच्यासारखे खंदे वकील या ठिकाणी आहेत. आम्ही वकील नाही. खऱ्याचे खोटे आणि खोट्याचे खरे करणे म्हणजे वकिली व्यवसाय अशी माझी शंका आहे. सीआयडीने हे सर्व शोधले होते परंतु पुढची गती घेतली नाही म्हणून श्री. पवनराजे निंबाळकर यांचे चिरंजीव उच्च न्यायालयात गेले आणि याची चौकशी सीबीआय कडे द्या अशी मागणी केली. त्यानंतर हे प्रकरण सीबीआयकडे आले. सीबीआय यंत्रणा सुध्दा कोणाच्या तरी दबावाखाली काम करीत आहे असे माझे शंभर टक्के मत आहे. केंद्राच्या विरोधात जो जो कोणी गेला त्याच्या मागे सीबीआय लागली. मग सुश्री मायावती असो किंवा मुलायमसिंग यादव असो. कितीही चोरी करा. चारा चोर श्री. लालुप्रसाद यादव तुरुंगात जाणार होते परंतु ते मंत्री झाल्यापासून सगळे बंद झाले. क्वात्रोची मामा यांना क्लिन चिट दिली. म्हणजे चोरी झालीच नाही. सीबीआयचा हा काय प्रकार आहे हे कळत नाही. शिखांचे हत्याकांड घडले त्यामध्ये कालच्या निवडणुकीमध्ये श्री. जगदीश टायटलर यांना सुध्दा क्लिन चिट दिली. नंतर त्यांची उमेदवारी रद्द करण्याची पाळी आली. काँग्रेसच्या 125 वर्षाच्या काळात अशा प्रकारे उमेदवारी रद्द करण्याची पाळी केवळ सीबीआयमुळे आली. सीबीआय नक्की काय करते ? मुलांचे जे हत्याकांड घडले त्यामध्ये जे संबंधित होते ते जामिनावर सुटले होते. त्यामुळे सीबीआयची काय गडबड आहे हे कळत नाही. सीबीआयबद्दल शंका निर्माण झाली की, हा खटला सीबीआयकडे आल्यानंतर ते पूर्णत्वास नेतील की नाही ? गेले सात आठ महिने सीबीआय त्यावर काम करीत आहे. नेमका निवडणुकीचा निकाल लागला. दोन महिने श्री. शरद पवार साहेबांनी या महाराष्ट्रामध्ये काँग्रेसच्या विरोधात जो धुमाकूळ घातला त्यावर बारीक नजर ठेऊन असलेले पूर्ण ताकदीने सत्तेमध्ये आल्याबरोबर सर्व धडाधड चालू झाले. डॉ. पद्मसिंह पाटील आरोपी आहेत असे या सदनामध्ये सांगितले गेले होते. सीबीआय ने फार काही कर्तृत्व केले अशातील भाग नाही. 2008 मध्ये याबाबत सांगितले आणि 2009 साली त्यांना पकडण्याचे काम सीबीआयने चालविले आहे. सीबीआय देखील नक्की काय करीत आहे ? वर साटेलोटे झाले की मग त्यांना सोडून देणार काय अशी मला शंका वाटते. सन्माननीय सदस्य



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

श्री. गुरुनाथ कुलकर्णी म्हणतात की, बाब सबज्युडिस आहे. ते आरोपी आहेत असे कोठे सिध्द झ ाले आहे ? ते गुन्हेगार कोठे आहेत ? असे असे ते म्हणाले. त्यांची अडचण मला मान्य आहे. भारतीय जनता पक्षाचा नगरसेवक पकडला गेल्याबरोबर दोन तासाच्या आत भारतीय जनता पक्षाने त्याची पक्षातून हकालपट्टी करुन राजकीय सचोटीचे काम केले तसे आपण करणार आहात काय ? यामध्ये सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांचा व्यक्तिगत प्रश्न नाही.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : खासदाराला निलंबित करण्याचा अधिकार राज्य सरकारला नसतो. तो अधिकार केंद्राचा असतो. केंद्राने त्याबाबतीत कारवाई करावयाची असते.

श्री. नितीन गडकरी : जनरल सेक्रेटरी म्हणून आपल्याला केंद्राकडे शिफारस करण्याचा अधिकार आहे. आपण ते करु शकता.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : तो प्रश्न वेगळा आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या चर्चेतून एक भीती वाटते की, उद्या त्यांची युती तुटली तर हे पोटनिवडणुकीमध्ये उमेदवार उभा करतील काय ?

श्री. नितीन गडकरी : तेलगीचा माल कोणी खाल्ला ?

(सत्ताधारी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य बोलण्याचा प्रयत्न करतात )

श्री. दिवाकर रावते : मला समोरच्या बाजूच्या सन्माननीय सदस्यांना सांगावयाचे आहे की, आपण या ठिकाणी मला बोलावयास लावू नका. मला ती नावे घेण्यास लावू नका.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ SBT/ यापूर्वी श्री.बरवड 15:50

श्री.दिवाकर रावते....

हा विषय डायव्हर्ट झाला तर सत्ताधारी पक्षाच्या ज्येष्ठ नेत्यांची नावे घेण्यापर्यंत आम्हाला पोहोचवू नका. येथे सांगण्यासारखे खूप आहे. सावली जरी पायाखाली असली आणि उजेड बाजूला असला तरी सावली पायाखालीच असते. एवढे लक्षात घेतले पाहिजे. काही सन्माननीय नेते असतात त्यांच्याबाबतीत आपण सभागृहात बोलू नये, एवढे पथ्य तुमच्या आमच्याकडून पाळले गेले पाहिजे. डॉ.पद्मसिंह पाटील यांना सी.बी.आय.ने अटक केली आहे. राज्य पोलिसांनी अटक केलेली नाही त्यामुळे यासंबंधी खूप विस्ताराने चर्चा करावी अशातील भाग नाही. श्री.गोवेकर यांच्या हत्येसंबंधातील आरोपींना हजर करण्याबाबत हायकोर्टाने शासनाला 4 महिन्यांपूर्वी आदेश देऊनही आरोपी सापडत नाहीत. याप्रकरणातील संशयीत आरोपी सुध्दा सापडत नाहीत, इतके राज्य पोलीस निकम्मे आहे. सी.बी.आय.ला तेथे मॅनेज करण्यात आले आहे असे आमचे ठाम मत झाले आहे. सी.बी.आय.चे अधिकारी हात हलवत बसले आहेत, त्यांना याप्रकरणातील आरोपी सापडतच नाहीत. सी.बी.आय.मध्ये जे चालले आहे त्याबाबत विधिमंडळाच्या माध्यमातून सांगण्याची का पाळी येत आहे ? केंद्रामध्ये मॅनेज न होता योग्य पध्दतीने सी.बी.आय.ने तपास करुन श्री.पवनराजे निंबाळकर यांच्या खुन्याला आदरणीय श्री.पवार साहेब म्हणाल्याप्रमाणे कायदा आपली काळजी घेईल. त्याप्रमाणे कायद्याद्वारे योग्य ती काळजी घ्यावी. या खून प्रकरणाला वाचा फुटलेली आहे ती पूर्णत्वास नेण्यासाठी सी.बी.आय.ने समर्थपणे काम करावे ही भूमिका या चर्चेच्या पाठीमागची आहे. यासंबंधी दोन गोष्टींचा उलगड होत नाही, त्याचा सन्माननीय गृहमंत्र्यांनी करावा. उच्च न्यायालयाच्या आदेशामुळे सी.बी.आय.कडे तपास आला. पण तोपर्यंत पोलिसांना या गुन्हयाचे धागेदारे मिळलेले असताना देखील हा खून खटला पुढे का गेला नाही, याबाबत कोणाचा दबाव होता, ज्यांच्या काळात होता, ते तत्कालीन सन्माननीय गृहमंत्री यांनी त्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे हा खरा विषय आहे. मी असे म्हणणार नाही की, त्यांचे चिरंजीव राज्याचे राज्यमंत्री आहेत, त्यांच्या घरामधून त्यांना नेले आहे. कारण ज्यावेळी त्यांना चौकशीसाठी नेण्यात आले त्यावेळेपर्यंत ते गुन्हेगार नव्हते. ते पळाले असते, फरार झाले असते आणि त्यानंतर सापडले असते, म्हणजे एखादा गुन्हेगार पळाल्यानंतर त्याला फरार घोषित केल्यावर जर तो कोणाकडे सापडला तर त्याला आश्रय दिला होता असे म्हणता येईल. तेवढयापर्यंत मी जाणार नाही. पण याप्रकरणाने दुर्दैवाने त्यांनी आपल्या मुलाच्या करियरचा प्रश्न सुध्दा निर्माण करुन ठेवला आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ SBT/

श्री.दिवाकर रावते....

राज्याच्या एका राज्यमंत्र्यांच्या घरामध्ये त्यांच्या वडिलांना सरकारी निवासस्थानातून अटक केली अशाप्रकारची बातमी संपूर्ण हिंदुस्थानात प्रसारीत झाली. सरकारी निवासस्थानातून अटक होणे हे कितपत योग्य आहे, कितपत भूषणावह आहे ? मी असे म्हणणार नाही की, त्यांनी राजीनामा द्यावा. प्रत्येकाने आपापली नैतिकता पाळावयाची असते. जो नैतिकता पाळत नाही तो त्याच्या मार्गाने जात असतो. म्हणून तत्कालीन सन्माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांची जबाबदारी होती असे आमचे म्हणणे आहे. त्यावेळी पोलिसांना माहीत असताना सुध्दा पोलिसांनी आपली जबाबदारी टाळली असेल तर संबंधित पोलीस अधिका-यांवर का कारवाई होऊ नये असा प्रश्न येथे निर्माण होतो. सी.बी.आय.ला सर्व आरोपी मिळालेले असतील तर ही कारवाई त्यावेळीच होणे आवश्यक होते. याप्रकरणामध्ये कलम 302, 120-ब खाली कारवाई होईल की अन्य कलमाखाली होईल हा विषय नंतरचा आहे. परंतु 2006 साली झालेल्या गुन्हयाचा तपास सी.बी.आय.च्या ताब्यात येईपर्यंत त्याला वाचा फुटत नव्हती आणि वाचा न फुटण्यासाठी जे जबाबदार आहेत त्यासंदर्भात शासनाची काय भूमिका असणार आहे, कोणाला दोषी धरणार आहे ? की प्रधान समितीप्रमाणे सर्वांना क्लीन चीट दिली जाणार आहे, सर्व काही योग्य आहे, काही झालेच नाही, सर्व अधिकारी योग्य होते. आता ते स्टेटमेंट देत आहेत, राज्य सरकारचे काय दुर्दैव आहे ? ते श्री.नागरे-पाटील काय म्हणत आहेत, पोलीस काय म्हणत आहेत, ते दोघे एकमेकाबद्दल काय म्हणत आहेत, एका खोलीत ते दोन तास होते असे काय म्हणतात ? 26 नोव्हेंबरच्या घटनेच्या संदर्भात पोलिसांचे एवढे धिंडवडे निघत आहेत. श्री.नागरे-पाटील यांची मर्दुमकी सुध्दा दुर्दैवाने रस्त्यावर येऊ लागली आहे. त्यांच्या धाडसाबद्दल आम्हाला कौतुक वाटले होते. पण काल त्यांच्या संदर्भात कोर्टात जी माहिती उघड झ ाली त्याच्यातून पोलिसांची बेअब्रु होत असल्याचे दिसून आले आहे. तेव्हा माननीय गृहमंत्र्यांना सांगेन की, याप्रकरणामध्ये पोलिसांचे आणखी धिंडवडे काढण्यापेक्षा जे पोलीस अधिकारी जबाबदार होते त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन त्यांच्याविरुध्द कारवाई करावी. त्यावेळी हे आरोपी पकडले असतील तर त्यांच्यावर कोणाचा राजकीय दबाव होता, तेही या सदनाच्या माध्यमातून कळले पाहिजे अशी मी आग्रहाची विनंती करतो, या विषयावर चर्चा उपस्थित करण्यासाठी आपण परवानगी दिल्याबद्दल आपल्याला धन्यवाद देतो आणि माझे भाषण संपवितो. जय हिंद, जय महाराष्ट्र

--------- यानंतर श्री.शिगम

अस्पष्टत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 15:55

श्री. कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : उपसभापती महोदय, आपण आणि माननीय सभापतींनी एका महत्वाच्या चर्चेला वेळ दिली त्याबद्दल मी आपणा दोघांना धन्यवाद देतो. राज्याच्या कायदा आणि सुव्यवस्थेचे धिंडवडे का निघले हे आज आपण सकाळपासून पहात आहोत. पण ज्याच्या हातात गृहखात्याची सुत्रे आहेत त्यांनी गेल्या तीन वर्षापासून काय केले हा खरा प्रश्न आहे. या राज्यामध्ये खैरलांजीनंतर जो जनक्षोभ उसळला त्यानंतर तुम्ही दाद घेतली. मनोहर कदमने जो उत्पात घडविला होता त्याला वाचविण्याचे काम देखील तुम्हीच केले. आता तुमच्या पक्षातील मंडळी सरळ सरळ खुनाची सुपारी देत आहेत. तरी तुमचे कायद्याचे हात तेथे पर्यन्त पोहोचत नाही. असे असले तर तुम्हाला राज्य करण्याचा अधिकार राहात नाही. सभापती महोदय, मी हे अधिवेशन सुरु झाल्यापासून आठवडाभर सातत्याने आग्रह धरला होता की श्री. अण्णा हजारेची सुपारी कोणी दिली हे स्पष्ट झालेले असताना तुम्ही काय करणार ? या प्रश्नाचे उत्तर मिळत नव्हते. त्याबाबतीत माननीय गृहराज्यमंत्र्यांनी मोघम उत्तर दिले. आम्ही तीन दिवस आग्रह धरल्या नंतर निवेदन आले ते वर्तमानपत्रातील बातम्यांचे कात्रण कागदावर चिकटवून आमच्यापुढे ठेवण्यात आले. तुम्ही कोणती अधिकृत माहिती सीबीआयकडून घेतलीत आणि आमच्यापुढे ठेवलीत ? पवनराजे प्रकरणामध्ये सीबीआयने वर्तमानपत्रामध्ये जे सांगितले ते आम्ही वाचले आणि तेच तुम्ही आम्हाला सांगितले. पण पकडलेल्या त्याच अरोपीने श्री. अण्णा हजारे यांच्या खुनाची सुपारी ज्या व्यक्तीकडून आली होती हे स्पष्टपणे सांगितल्यानंतर सुध्दा तुम्ही काही केले नाही. असे कोणते दडपण तुमच्यावर आहे की ज्यामुळे तुम्ही तेथपर्यन्त पोहोचू शकत नाही. उशिरा का होईना सीबीआयने कारवाई केली. ही कारवाई तुम्ही नाही तर सीबीआयने केली. प्रकरण कोर्टात गेल्यानंतर कोर्टाने सीबीआयला या प्रकरणी आदेश दिले आणि सीबीआयने निवडणुकीनंतर या प्रकरणाला हात घातला आहे. पवनराजे यांची हत्त्या कोणी केली हे गेल्या दोन-तीन वर्षापासून महाराष्ट्रातील सर्वांना माहीत आहे. श्री. अण्णा हजारेंच्या मागे कोण लागलेले आहे हे या सभागृहाला आणि महाराष्ट्रातील जनतेला माहीत होते. परंतु सत्तेवर बसलेल्यांनी झोपेचे सोंग घेतलेले आहे आणि सोंग घेतलेल्यांना उठवता येत नाही.. श्री. अण्णा हजारे यांना आम्ही संरक्षण देत आहोत असे गृह मंत्र्यांनी सांगितले. त्यांना मारण्यासाठी जी मंडळी काम करीत होती

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. कपिल पाटील....)

त्याच्यापर्यन्त तुम्ही पोहाचला नाही त्यामुळे तुमच्याकडून या प्रकरणी चौकशी होईल यावर या सभागृहाचा आणि महाराष्ट्राचा विश्वास नाही. म्हणून माझी मागणी आहे की, या प्रकरणी तुम्ही आधी काय केले हे नेमके सांगावे. तसेच श्री.अण्णा हजारे यांच्या प्रकरणाची चौकशी सीबीआयकडे सुपूर्द करावी. ती केल्या शिवाय तुम्ही तेथेपर्यन्त पोहोचाल याबद्दल मला खात्री नाही, विश्वास नाही. सभापती महोदय, श्री. अण्णा हजारे यांनी काय गुन्हा केला होता ? श्री. अण्णा हजारे हे जेव्हा प्रकरणे काढतात त्यावेळी अनेक जण दुखावतात. दोन्ही बाजूकडून मंडळी दुखावली गेली आहेत. परंतु त्यांनी त्यावेळी श्री. अण्णा हजारे यांना संपवावे असा विचार कधी केला नाही. पण या मंडळींनी त्यांना आयुष्यातून संपविण्याचा कट रचला. तरी श्री.अण्णा हजारे फार मागे लागतात अशी उलट चर्चा केली जाते. सभापती महोदय, मी मघाशी असे म्हणालो होतो की, यांच्या घरामध्ये किती शस्त्रे आहेत ? अधिकृत परवाना मिळालेली शस्त्रे 10आहेत. डॉक्टर साहेबांकडे चार शस्त्र परवाने आहेत. जसे सिनेमामध्ये रजनीकांत हातामध्ये चार-चार पिस्तुले घेऊन ठोकतात तसे हे दोन हातात दोन पिस्तुले घेऊन ठोकतात की काय ? म्हणजे एक पवनराजेसाठी आणि एक श्री.अण्णा हजारेसाठी आणि बाकीची दोन कुणासाठी ? गृहराज्यमंत्र्यांच्या नावावरही शस्त्र परवाने आहेत. घरातील प्रत्येक सदस्यासाठी शस्त्र परवाने आहेत. एका घरात 10 शस्त्र परवाने कशासाठी लागतात ? पोलीस तुमच्या दिमतीला आहेत आणि तरी देखील तुम्हाला शस्त्रे लागतात. लोकशाहीमध्ये राज्यकर्त्यांना जर स्वत:ला शस्त्रे बाळगावी लागत असतील तर या देशातील आणि या राज्यातील जनतेने कुणावर विश्वास ठेवायचा ? कारण ज्या राज्यकर्त्यांच्या हातात पिस्तूल आहे ते आपल्याच कपाळावर, आपल्याच छातीवर रोखले गेले आहे, ही भीती त्याच्या मनात आहे.

...नंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(**सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.हेमंत टकले**)

श्री.कपिल पाटील...........

निवडणुका आल्या की प्रचंड पैसा ओतायचा. कारण भय असते की, सत्ता आपल्या हातून निघून जाईल. म्हणून खोऱ्याने पैसा ओतायचा आणि वाटेल तो कारभार करायचा. मुंबई आणि आसपासच्या जमिनी कोणाच्या नावावर झाल्या? कोण खरेदी करतो? ठाणे जिल्हयात याच मंडळींनी मिठागरे ताब्यात घेतली. हेच होते. मच्छिमारांची मिठागरे ताब्यात घेतली. जमिनीचा सोस, पैशाचा सोस आणि रक्ताचाही त्यात सोस. महाराष्ट्राच्या राजकारणाचे गुन्हेगारीकरण, माफियाकरण पूर्वी कधीही एवढे झाले नव्हते. लोक तुम्हाला क्षमा करणार नाहीत. लोकसभेच्या निवडणुकांमध्ये दाखवून दिले. प्रचंड सत्तेचा माज होता. त्यांनी नशा उतरवून दाखविली. 8 लोक निवडून आले. 4 स्वत:च्या ताकदीवर. 4 तुमचेच आहेत. उर्वरित 4 जण स्वत:च्या ताकदीवर निवडून आले.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचा या घटनेशी कोणत्याही प्रकारचा संबंध नाही असे राष्ट्रीय अध्यक्षांनी जाहीर केले आणि पक्षातर्फे राज्य शाखेच्या प्रदेशाध्यक्षांनी जाहीर केले. केवळ गोंधळ निर्माण करण्यासाठी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे नाव घ्यायचे. आमच्या जागा कमी झालेल्या नाहीत, फक्त एक जागा कमी झाली.

श्री.कपिल पाटील : पक्षाच्या प्रमुखाला खुलासा करावा लागला. माझा प्रश्न साधा आहे. तीन वर्षे तुमचे हात कुठे गेले होते? लोक विचारतात, तुमच्या हातात सुरक्षेची दोरी होती. तुमचे राज्य दहा वर्षे आहे. कोणाला संरक्षण देत होतात?

श्री.राम पंडागळे (जागेवर बसून) : त्यावेळी मुख्यमंत्री कोण होते?

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य श्री.राम पंडागळे खाली बसून बोलले की, त्यावेळेला मुख्यमंत्री कोण होते? तुम्हाला बोलायला सांगितले ते कोण होते हे सांगा. त्यांनी उठून उभे राहून सांगावे की, महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांनी सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांना बोलायला सांगितले आहे. उलट आघाडी सरकार त्यांच्या नेतृत्वाखाली राज्य करीत होते. सन्माननीय श्री.विलासराव देशमुख यांनी सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांना एन.सी.पी.च्या विरोधात

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण........

बोलायला सांगितले आहे असे त्यांना म्हणावायचे आहे का? सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील हे काँग्रेस पक्षाचे तत्कालीन मुख्यमंत्र्यांचे दलाल म्हणून एनसीपीला बदनाम करण्यासाठी चर्चेमध्ये सहभागी झालेले आहेत असे त्यांचे म्हणणे आहे का?

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी बरोबर सांगितले आहे. या चर्चेत दोन्ही बाजूचे सदस्य जे बोलत आहेत ते बरोबर आहे. कोण पकडले, कोणाचे पकडले हे त्यांनाही माहिती आहे, यांनाही माहिती आहे. त्यामुळे स्वाभाविक ते शुक्ला कोणाचे होते? तुम्ही तिकिट दिले....

श्री.मधुकर चव्हाण : तुम्ही खरोखर दलाल आहात. सत्ता त्यांच्याकडून घ्यायची आणि विरोधी पक्षात बसायचे.

श्री.कपिल पाटील : मी माझ्या ताकदीवर निवडून आलो आणि तुम्हाला पाडून आलो आहे.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, दलाल हा शब्द रेकॉर्डवरुन वगळण्यात यावा.

2डब्ल्यू.1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्री. हेमंत टकले)** : सर्व सन्माननीय सदस्यांना माझी विनंती आहे की, ज्या विषयावर सभागृहात चर्चा सुरु आहे त्या विषयाला अनुसरुनच सन्माननीय सदस्यांनी आपले विचार मांडावेत. एखाद्या सन्माननीय सदस्यांना एखाद्या वेगळ्या मुद्याबाबत बोलावयाचे असेल तर त्यांनी पीठासीन अधिकाऱ्यांची परवानगी घेऊनच बोलावे, कोणीही खाली बसून बोलू नये.

श्री. कपिल पाटील : महोदय, मी एकच सांगतो की, या सभागृहात मी स्वत:च्या ताकदीवर निवडून आलेलो आहे आणि एकाच वेळेस भारतीय जनता पक्ष आणि काँग्रेसच्या उमेदवारांना पाडून व त्यांच्या बेरजेपेक्षा जास्त मतांनी तसेच त्यांचे डिपॉझिट पाडून निवडून आलो आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य जे बोलत आहेत त्यावरुन हा निरोप समारंभ आहे की काय अशी शंका येते.

श्री. कपिल पाटील : .......अडथळा.........महोदय, मला आपण संरक्षण द्यावे. कारण अगोदरच आम्हाला बोलण्यासाठी पाच मिनिटे वेळ मिळतो व त्यातही अडथळे येतात.

मघाशी मी म्हणत होतो की, एकाच घरात दहा-दहा शस्त्रांचे परवाने का दिले जातात त्याचा खुलासा झाला पाहिजे. अशा प्रकारे जी अनधिकृत शस्त्रे असतील त्यांचे परवाने शासन रद्द करणार काय ? एवढी शस्त्रे त्यांना कशासाठी पाहिजेत. डॉ. पद्मसिंह पाटील यांच्या कुटुंबियांकडे 10 शस्त्रे आहेत, ती शस्त्रे कोणाला मिळाली आहेत. अशा शस्त्रांचे परवाने काढून घेतले पाहिजेत. कारण त्या भागातील लोकांना धाक वाटतो म्हणून अशा अनधिकृत शस्त्रांचा शोध घेतला पाहिजे. या भागात सर्वांना तसा धाक वाटत असल्याने त्यांच्याविषयी कोणीही बोलण्यास पुढे येत नाही. तसेच समाजसेवक श्री. अण्णा हजारे यांचा खून झाला नाही म्हणून हे प्रकरण सोडून द्यावयाचे असे असेल तर यापुढे राज्यात अनेक सुपाऱ्या दिल्या जातील आणि त्याच्या विरोधात कोणी बोलू नये असे सत्ताधाऱ्यांना वाटत असेल तर कोणतीही कायदा व सुव्यवस्था राज्यात राहणार नाही.

त्याचबरोबर मुंबईत अनेक ठिकाणी असा धाक दाखवून जमिनी बळकावल्या जातात त्या कोणाच्या दबावाला बळी पडून घेतल्या जातात त्याची चौकशी होणे आवश्यक आहे. कारण अशा जमिनी घेतांना पिस्तुलाचा धाक दाखवून त्या बळकावल्या जातात. तसेच जे पैसे दिले ते घ्या आणि जमीन खाली करा असे सांगून जमिनी घेतल्या जातात हेच आपल्या गृह खात्याचे संरक्षण

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील.....

आहे काय. या सर्व प्रकरणांची चौकशी झाली पाहिजे. ती जर आपण केली नाही तर मुंबईच्या आजुबाजूचा परिसर थोड्या काळात खाली होऊन जाईल. आज मुंबईतील जमिनीचे मालक विस्थापित होत आहेत. तसेच अशा जमिनी घेताना केवळ टोकन मनी म्हणून काही रक्कम दिली जाते आणि उर्वरित रकमेसाठी वर्षानुवर्षे थांबावे लागते, असे हे माफिया तंत्र मुंबईत सुरु आहे. या गुंडांना जर पकडले आणि त्यांच्या पाठीवर वळ निघाला तर त्याची कळ दुसरीकडेच लागते, अशा प्रकारे त्यांना कोणाचे संरक्षण आहे याचीही चौकशी झाली पाहिजे. म्हणून माझी मागणी आहे की, गृह खात्याकडून याप्रकरणी न्याय मिळू शकत नाही. तत्कालीन गृहमंत्री श्री. आर.आर.पाटील हे सज्जन गृहस्थ होते म्हणून त्यांच्या प्रचाराला समाजसेवक अण्णा हजारे हे आले होते. परंतु सत्ताधारी पक्षाचे गृहमंत्रीपद हे माननीय श्री. आर.आर.पाटील यांच्यासारख्या सज्जन गृहस्थाकडे असताना देखील ते संरक्षण देऊ शकले नाही.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील ...

सभापती महोदय, माननीय आर.आर.पाटील हे जेव्हा आमदारकीच्या निवडणुकीला उभे राहिले होते तेव्हा माननीय अण्णा हजारे हे त्यांच्या निवडणुकीच्या प्रचारासाठी गेले होते. एक चांगला माणूस निवडून यावा हा त्यामागील उद्देश होता. माननीय अण्णा हजारे आबांच्या प्रचारासाठी गेले होते परंतु माननीय तत्कालीन गृहमंत्री सुध्दा माननीय अण्णा हजारे यांना संरक्षण देऊ शकले नाहीत. ज्यांनी अण्णा हजारेंची सुपारी दिली होती त्यांच्या हातापर्यंत सुध्दा ते पोहचू शकले नाहीत. आज गृहमंत्री श्री. जयंत पाटील यांचे हात सुध्दा बांधले गेले आहे. त्यांचे हात का बांधले गेले याची आपल्याला कल्पना आहेच. या सरकारकडून या प्रकरणामध्ये न्याय मिळेल याची मला सुतराम शक्यता वाटत नाही. मुंबईच्या आजूबाजूला जमिनीच्या खरेदीचे व्यवहार मोठया प्रमाणात सुरु आहेत. त्याची सुध्दा चौकशी व्हावी अशी माझी विनंती आहे. या सरकारकडे हे प्रकरण गेल्या तीन वर्षापासून असतांना या शासनाने या प्रकरणात काहीही कारवाई केली नाही. हे सरकार फक्त शाहू, फुले आणि आंबेडकरांचे नावे घेते परंतु आदिवासींसाठी,अल्पसंख्याकासाठी काहीही करीत नाही. युतीच्या काळात सुध्दा एवढा अत्याचार आदिवासी आणि अल्पसंख्याकावर झाला नव्हता एवढा अत्याचार या आघाडी शासनाच्या काळात झालेला आहे. गेल्या दोन तीन वर्षाची आकडेवारी पाहिली तर प्रकाश पडू शकेल. हे सरकार कोणासाठी राज्य करीत आहे ते समजून येईल. हे सरकार पंडित नेहरु आणि महात्मा गांधीचे नाव घेतेपरंतु यांचे राज्य शस्त्रावर, माफियांच्या पैशावर चालते, ताकदीवर चालते. त्यामुळे या राज्याच्या गृहखात्याकडून न्याय मिळेल असे वाटत नाही. निवडणुकीचे घोडा मैदान आता जवळ आलेले आहे. निवडणूकीला सामोरे जावयाचे असेल तर तुम्ही राज्यातील जनतेला सांगितले पाहिजे की, आम्ही गुन्हेगारांना जेरबंद केलेले आहे, आमचे हात स्वच्छ आहे. त्यामुळे यासंदर्भातील उत्तर आज आम्हाला आपल्याकडून हवे आहे. मी या प्रश्नावर अधिक बोलत नाही परंतु या प्रश्नाचे उत्तर मिळाले नाही लोक तुम्हाला कधीही क्षमा करणार नाही एवढे सांगून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

--------

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी (नामनियुक्त ) : सभापती महोदय, ही चर्चा सुरुवातीला नियम 289 अन्वये घेण्यात येणार होती परंतु आता ही चर्चा नियम 97 अन्वये सुरु असून या चर्चेमध्ये माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे. खरे म्हणजे या चर्चेत मी भाग घेणार नव्हतो परंतु मला नाइलाजाने या चर्चेत भाग घ्यावा लागला आहे. या चर्चेच्या संदर्भात मी माननीय विरोधी पक्ष नेते तसेच इतर सन्माननीय सदस्यांची भाषणे काळजीपूर्वक ऐकलेली आहेत. केंद्रामध्ये कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस आणि इतर मित्र पक्षाचे सरकार आहे तसेच राज्यामध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस आणि कॉंग्रेसचे हे सरकार सत्तेवर आहे. आमच्या पक्षाचे नेते केंद्रातील सरकारमध्ये कृषी मंत्री आहेत. राज्यातील आणि केंद्रातील सरकारमध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेसपक्षाचा समावेश आहे. असे असतांना या शासनाने आमच्या घटक पक्षाच्या खासदाराला अटक करण्याचे नैतिक धर्य दाखवले आहे. निपःक्षपाती या प्रकरणाची चौकशी व्हावी म्हणून हे प्रकरण सीबीआयकडे देण्याचे धैर्य या शासनाने दाखवलेले आहे. एका खासदाराविरुद्ध कारवाई करुन अटक करण्याचे धैर्य या आघाडी शासनाने दाखवलेले आहे ही वस्तुस्थिती कोणालाही नाकारता येणार नाही. कोणाच्या दबावाखाली कारवाई करण्यात आली अशी या ठिकाणी जी चर्चा झाली ती योग्य नाही असे माझे मत आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी जो उल्लेख केला की, राष्ट्रवादी कॉंगेस पक्षाकडे गृह विभाग असल्यामुळे या प्रकरणात योग्य न्याय मिळणार नाही, पक्षाचे प्रमुख कार्यरत नाही त्यामुळे या प्रकरणात योग्य कारवाई होणार नाही असा जो उल्लेख केलेला आहे तो योग्य नाही. राष्ट्रवादी पक्षाच्या नेत्यावर या विभागाचा कारभार लादला गेला आहे असे जे चित्र निर्माण केले आहे ते योग्य नाही. राज्यामध्ये आघाडी सरकार आहे. या राज्यात केवळ राष्ट्रवादी पक्षाचे सरकार नसून ाष्ट्रवादी कॉंग्रेसपक्ष हा लोकशाही आघाडी सरकारमधील एक घटक पक्ष आहे. सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील हे नेहमी विशिष्ट हेतू मनात ठेवून बोलतात परंतु वास्तवही विसरत असतात हे मी सभागृहाला सांगू इच्छितो. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष आघाडी सरकारमधील घटक पक्ष आहे. कॉंग्रेस आणि राष्ट्रवादी कॉंग्रेसचे राज्यात गेल्या 10 वर्षापासून सरकार सत्तेवर आहे.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी ..

सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी असे सांगितले की, राष्ट्रवादी पक्षाकडे गृह खाते साडे नऊ वर्षापासून असल्यामुळे त्यांनी राज्यातील कायदा व सुव्यवस्थेची वाट लावली आहे. अशा प्रकारे बोलण्याचा त्यांचा जो सूर आहे त्याला विरोध करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे. सभापती महोदय, आपण सर्व जण राजकारणातील माणसे आहोत .काही गोष्ट लोक विसरु शकतील परंतु तुम्ही आम्ही ते विसरु शकत नाही. या ठिकाणी विरोधी पक्ष नेते आणि सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते तसेच अन्य सन्माननीय सदस्य उपस्थित आहेत त्यांना मी सांगू इच्छितो की, आपण मागच्या घटना आठवाव्यात. युतीचे शासन ज्यावेळी होते त्यावेळी आपल्या पक्षाचे गृह मंत्री होते. त्यावेळी राज्यातील कायदा व सुव्यवस्थेची काय परिस्थिती होती हे आपण आठवा. मुंबई शहरात चांगल्या प्रकारे लग्न समारंभ होऊ शकत नव्हते ही वस्तुस्थिती आपण नाकारणार आहात काय ? आज आपले जे घटक पक्ष होते त्या सर्व घटक पक्षाच्या सदस्यांना वा अन्य व्यक्तिंना ए.के. 47 सह एक एक बॉडी गार्ड देण्यात आला होता .गावा गावामध्ये ए.के 47 घेऊन बॉडी गार्ड सह हे सर्वजण फिरत होते ही बाब आपण विसरणार आहात काय ? युतीचे शासन असतांना मी जेव्हा रत्नागिरी आणि सिंधुदूर्ग मध्ये जावयाचो तेव्हा ए.के. 47 असलेल्या बॉडीगार्डसह प्रत्येक कार्यकर्ता अनेक गावागावामध्ये जात होता . ही गोष्ट आपण विसरणार आहात काय ? श्री.छगन भुजबळ हे ज्यावेळी विरोधी पक्ष नेते होते त्यावेळी त्यांचा बंगला उद्ध्वस्त करण्यासाठी आणि त्यांना जीवे मारण्याचा जेव्हा प्रयत्न झाला तेव्हा श्री.गोपीनाथ मुंडे हे उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री होते हे आपण विसरला आहात काय ? त्यावेळी राज्यात अराजकतेची निर्माण झाली होती. त्यामुळे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे नाव आपण घेता कामा नये. पक्षाच्या एखाद्या आमदाराने , खासदाराने वा कार्यकर्त्याने एखादे कृत्य केल्यानंतर जर तुम्ही संपूर्ण पक्षाचे नाव घेऊन पक्षाला झोडपण्याचे आणि बदनाम करण्याचे काम करणार असाल तर त्याला मला विरोध असून तो विरोध व्यक्त करण्याकरिता मी येथे उभा आहे..... अडथळा...

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील सभागृहात बोलतात परंतु मघाशी श्री.राम पंडागळे यांना तुम्ही जे काही सागितले ते सर्वच चूक आहे असे मी म्हणणार नाही काही प्रमाणात ते खरे असू शकेल. आज ती परिस्थिती बदललेली असू शकेल. राज्याचे अगोदरचे मुख्यमंत्री आणि श्री.कपिल पाटील यांचे जवळचे सबंध होते आणि त्या सबंधाचा वापर ते



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG

श्री.गुरुनाथ कुलकर्णी...

राजकीयदृष्टया करीत होते हे सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांना आणि आपणा सर्वांना मान्य आहे

श्री.दिवाकर रावते (बसून) : हा इतिहास आहे ..

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सन्माननीय सदस्यांनी माझ्या भाषणात अडथळा आणण्याचे काम करता कामा नये. एकदा गट नेत्यांनी बोलल्यानंतर पुन्हा पुन्हा बोललेच पाहिजे असे नाही. त्यामुळे प्रत्येक वेळी न बोलता त्यांनी संयम ठेवला पाहिजे.

श्री.कपिल पाटील : माझा हरकतीचा मुद्दा आहे. आम्ही ज्येष्ठ सन्माननीय सदस्यांकडून कामकाज शिकत असतो . सन्माननीय सदस्यांनी बोलतांना मघाशी माजी उपमुख्यमंत्र्यांच्या नावाचा उल्लेख केला होता परंतु ते आता सभागृहात उपस्थित नसल्यामुळे त्यांच्या नावाचा उल्लेख मागे घ्यावा एवढीच माझी त्यांना विनंती आहे.

श्री गुरुनाथ कुलकर्णी :. माझ्याकडून काही आक्षेपार्ह विधान केले गेले असेल तर ते मी मागे घेतो. तेलगी प्रकरणाबाबत मी सांगू इच्छितो की श्री.छगन भुजबळ हे त्यावेळी गृहमंत्री व उपमुख्यमंत्री असतांना त्यांचा छळ करण्यात आला होता. नागपूरच्या अधिवेशनात इतका हा:हाकार उडाला होता की, गृहमंत्रीपद नको असे म्हणण्यापर्यंत त्यांना जेरीस आणण्याचा प्रयत्न करण्यात आला होता या प्रकरणी सीबीआयने चौकशी केल्यानंतर श्री.छगन भुजबळ तेलगी प्रकरणात दोषी आढळून आलेले नाहीत ही वस्तुस्थिती आहे. परंतु त्याना राजीनामा द्यावा लागला होता.

एक सन्माननीय सदस्य (बसून ) : त्यांची नार्कोटेस्ट करण्यात आली होती.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : नार्को टेस्टच्या बाबतीत तुम्हाला माहिती नसेल नार्कोटेस्टबद्दल मी सांगू इच्छितो की,

Sir, no person can be convicted on the basis of the Narco Test. It is only the additional evidence. It is not a substantive evidence. For your information , it is only the part of the evidence. म्हणून जो पर्यत sत्याला कोरॅबिटीव्ह इव्हीडन्स मिळत नाही Sir, no person cannot be convicted on the basis of the Narco Test.

नंतर श्री.सरफरे ..

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी...

शेवटी माननीय श्री. छगन भुजबळ यांना राजीनामा देऊन बाहेर पडावे लागले.माननीय श्री. आर. आर. पाटील यांनी सुध्दा राज्याचे गृहमंत्री पद यशस्वीपणे संभाळले. त्यांच्या काम करण्याच्या पध्दतीबद्दल राज्यातील लोक वाहव्वा-वाहव्वा करीत होते. ते कुणाच्याही एक पैश्याचे देणे-घेणे लागत नव्हते. कुणाच्या पोस्टींगसाठी कधी पैसे घेतले नाही. अशाप्रकारची परिस्थिती राज्याने पाहिलेली असतांना त्यांना सुध्दा सत्तेवरुन जावे लागले.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, माननीय सदस्य आता म्हणाले की, माननीय श्री. आर.आर. पाटील हे कुणाचेही देणे-घेणे लागत नव्हते. याचा अर्थ बाकीचे मंत्री घेणे लागतात असा त्याचा अर्थ होतो.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : कुणीही पैसे घेत नाहीत. सभापती महोदय, मला याठिकाणी एवढेच सांगावयाचे आहे की, एवढे चांगले कामकाज करीत असतांना सुध्दा त्यांना सत्तेवरुन जावे लागले...

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सद्या सत्ताधारी पक्षामध्ये असलेले एक मंत्री त्यावेळी विरोधी पक्षनेते होते. त्यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस आणि कॉंग्रेस आघाडीचे सरकार पाडणार होते. त्यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस आणि कॉंग्रेसच्या सर्व आमदारांना घेऊन ते बेंगलोरला गेले होते. त्यांच्या हॉटेलचे बिल तेलगीने अधिकृतपणे भरले आहे त्याचे ईव्हिडन्स आहे. त्या हॉटेलचे बिल तेलगीने कां भरले? ते भरण्याची गरज काय होती? त्या आमदारांच्या विमानाने जाण्या-येण्याचा सर्व खर्च तेलगीने केला होता.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : त्या संपूर्ण तेलगीच्या देण्या-धेण्याच्या प्रकरणामध्ये कुठे संबंध आला आहे काय? माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण जर तेलगीचे प्रकरण उद्या उकरुन काढले तर तेलगीच्या प्रकरणातील गुन्हे आपल्या युती सरकारच्या काळात दाखल केले होते, जास्तीत जास्त गुन्हे दाखल केले होते. परंतु तुम्ही त्याचा तपास केला नाही. या उलट धुळे येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयाच्या उद्घाटनाचा जाहीर कार्यक्रम करण्यात आला. त्यावेळी त्या पुतळयाच्या कार्यक्रमासाठी आपण सर्वजण गेले होते. ही वस्तुस्थिती आपणास नाकारता येणार नाही. आपण जर उकरुन काढण्याचा प्रयत्न कराल तेवढे त्यामध्ये गुंतून जाल एवढेच मला या ठिकाणी सांगावयाचे आहे. म्हणून आपण नाकाने कांदे सोलण्याचा प्रयत्न करु नका. शेवटी "हमाम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी ....

में सब नंगे होते है!" तुम्ही उद्या जर माझ्या घरावर दगड मारण्याचा प्रयत्न केला तर उद्या या बाजूकडून सुध्दा तुमच्याकडे दगड येतील हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे. म्हणून जर आपल्याला व्यक्तीवर चर्चा करावयाची असेल तर जरुर करावी परंतु याठिकाणी माझ्या पक्षाचे आपण नाव घेऊ नका. एवढेच मला याठिकाणी सांगावयाचे आहे. धन्यवाद, जय हिंद, जय महाराष्ट्र.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ MAP/

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

श्री. परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या सभागृहामध्ये कायदा व सुव्यवस्थेच्या प्रश्नावर अनेक वेळा चर्चा झालेली आहे. सत्ताधारी पक्षाकडून पोलीस यंत्रणेवर घालण्यात येणाऱ्या दबावाची अनेक उदाहरणे सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये आपणास पहावयास मिळतील. आज सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये कोणत्याही निवडणुकीच्या वेळी कुणी तरी बेपत्ता होतो किंवा त्याची हत्त्या होते. अशाप्रकारचे अनेक प्रकार या जिल्हयात होत असतात. माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी या ठिकाणी भाषण केले. त्यांच्याच पक्षाचे एक तालुका अध्यक्ष श्री. सत्यवान भिसे यांची मर्डर झाली. ही घटना लोकांसमोर झाली, पोलिसांनी त्या आरोपींना अटक केली. परंतु त्यानंतर पुरावे न मिळाल्यामुळे सर्व आरोपी निर्दोष सुटले. आरोपी सुटल्यानंतर त्या बाबत हे राज्य सरकार हायकोर्टामध्ये गेले नाही. त्यामुळे तेथील सर्व कार्यकर्त्यांमध्ये भीतीचे वातवरण सतत असल्यामुळे....

श्री. राजन तेली : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे...

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, ते प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे...

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, आता ते प्रकरण न्यायप्रविष्ट राहिलेले नाही. या ठिकाणी कायदा व सुव्यवस्थेच्या प्रश्नावर चर्चा सुरु आहे...

**उपसभापती** : माननीय सदस्यांनी न्यायप्रविष्ट बाबींवर चर्चा करु नये.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, ते प्रकरण न्यायप्रविष्ट नाही. त्या प्रकरणाचा निकाल लागला आहे...

श्री. राजन तेली : सभापती महोदय, चुकीचे रेकॉर्ड होऊ नये म्हणून माझा हरकतीचा मुद्दा आहे...

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ MAP/ KGS/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 16:25

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, याचप्रमाणे सिंधुदूर्ग जिल्ह्यातील पोट निवडणुकी-मध्ये . . . ..

श्री.राजन तेली : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माझे असे म्हणणे आहे की, श्री.सत्यवान भिसे हत्याकांड झाले, त्यासंदर्भात राज्य शासनाने हाय कोर्टामध्ये अपील केले आणि हाय कोर्टाने सुध्दा यामध्ये जे कोणी सहभागी होते, ज्यांनी धाडसी, अधिकारवाणीने हे घडविले, त्या सर्वांवर ताशेरे ओढले आणि संबंधित त्या केसमधून निर्दोष सुटलेले आहेत हे याठिकाणी समोर यावे म्हणून मी बोललो आहे.

श्री.परशुराम उपरकर : ते कधी सुटले ?

श्री.राजन तेली : ते कधी सुटले याबाबतीत तुम्ही चौकशी करावी.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, माझ्या सांगण्याचे हेच तात्पर्य आहे की, पोलीस यंत्रणेने चुकीचा तपास केल्यामुळे हे सर्व आरोपी सुटलेले आहेत. यामध्ये संबंधितांचा खूनच झाला नाही किंवा त्यांना मारहाणच झाली नाही अशा प्रकारचा निर्णय जर समोर येत असेल तर पोलिसांनी चुकीच्या पध्दतीने तपास केलेला आहे असे म्हणावे लागेल.

सभापती महोदय, याचप्रमाणे पोटनिवडणुकीमध्ये श्री.रमेश गोवेकर हे बेपत्ता झालेले आहेत. प्रत्येक अधिवेशनामध्ये श्री.रमेश गोवेकर यांच्या संबंधात आवाज उठविला जात आहे. ही केस देखील या सभागृहाने आणि हाय कोर्टाने सी.बी.आय.कडे तपासणी साठी दिली. याबाबतीत सी.बी.आय.ने चौकशी केली, पण त्यातून काही निष्पन्न झाले नाही. यासंबंधात काही पुरावे देखील ठेवण्यात आलेले नाहीत आणि शासकीय यंत्रणेवर दबाव आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यावेळी निवडणुकीच्या कालावधीमध्ये श्री.रमेश गोवेकर बेपत्ता झाले आणि 16 तारखेला एक मृतदेह किल्ल्याजवळ मिळाला. त्यानंतर तो मृतदेह तेथून 21 तारखेला काढण्यात आला, म्हणजे पाच दिवस तो मृतदेह तेथेच सडत ठेवला. आजपर्यंत कोणीही व्यक्ती हरविल्याची केस करण्यात आलेली नाही, तो मृतदेह कोणाचा आहे हे पोलिसांना माहिती नाही आणि पोलीस यंत्रणेने देखील हा मृतदेह कोणाचा आहे हे शोधण्याचाही प्रयत्न केलेला नाही. तेव्हा खरोखर श्री.रमेश गोवेकर यांची हत्या झालेली आहे काय ? किल्ल्याजवळ जो मृतदेह सापडला, तो श्री.रमेश गोवेकर यांचा होता काय ? या घटनेच्या बाबतीत श्री.रमेश गोवेकर यांच्या कुटुंबियांनी तक्रार केलेली आहे. असे असतानाही तेथून मृतदेह काढत असताना, पंचनामा करताना वेळी श्री.गोवेकर यांच्या कुटुंबियांना

. . . .3 ए-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर . . . .

तेथे बोलविण्यात आले नाही. आपण याठिकाणी ज्या विषयाच्या संबंधात चर्चा करीत आहोत, तसाच प्रकार झालेला असल्याने, या घटनेच्या बाबतीत देखील तपास करुन, पूर्णपणे चौकशी करण्यात यावी. एवढेच मला सांगावयाचे आहे.

-----

. . . .3 ए-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, याठिकाणी श्री. पवनराजे निंबाळकर यांची जी हत्या झाली आणि त्यामध्ये खासदार मंत्री श्री.पद्मसिंह पाटील यांचे नाव पुढे आलेले आहे.

**उपसभापती** : मला असे वाटते की, सभापती सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांचे भाषण झाल्यानंतर व ही चर्चा संपल्यानंतर मी लगेच 2009-2010 च्या अर्थसंकल्पावरील चर्चा सुरु करतो आणि नियम 97 अन्वये सुरु असलेली चर्चा नंतर घेऊ.

(काही सन्माननीय सदस्य खाली बसून बोलतात)

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आम्ही भाषण करण्यासाठी नाव दिलेले आहे.

**उपसभापती** : मी ही चर्चा करण्यासाठी नकार दिलेला नाही. माझे असे म्हणणे आहे की, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांचे भाषण झाल्यानंतर मग अर्थसंकल्पावरील चर्चेला सुरुवात करु या आणि त्यानंतर ही चर्चा सुरु करु.

श्री.विनोद तावडे (खाली बसून) : सभापती महोदय, मग याचे गांभीर्य निघून जाईल.प्लीज.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, याठिकाणी आमचे मित्र, सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी असे सांगितले की, श्री.पद्मसिंह पाटील यांना अटक केली आहे, त्याबाबतीत पक्ष अभिनवेश आणू नका. हे मान्य आहे. आपण येथे एक गोष्ट सांगितली की, जर या सर्व प्रकरणाचा कुठल्याही बाजूने अन्वयार्थ काढला तरी याबाबतीत शासनावर ठपका येतो. जी गोष्ट सी.बी.आय.ने शोधून काढलेली आहे, ती गोष्ट त्या काळातील गृह विभागाला का शोधून काढता आली नाही ? आपण येथे असेही सांगितले की, नार्को टेस्ट हा मुख्य पुरावा असल्याचे लक्षात धेत नाहीत. It is an additional evidence. जसा परिस्थितीजन्य पुरावा असतो, तसा वस्तुस्थितीजन्य पुरावा नसतो. मग जर त्यावेळेला नार्को टेस्ट श्री.पद्मसिंह पाटील यांचे नाव घेतले गेले होते, तर अशा वेळी त्यांना या संपूर्ण संशयातून बाहेर काढण्यासाठी, आपण आता माननीय माजी गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील साहेबांची स्तुती केली की, त्यांनी कोणाचेही पैसे खाल्ले नाहीत, त्यांनी भ्रष्टाचार केला नाही. ही गोष्ट मान्य आहे. आम्ही त्याबद्दल काही बोलत नाही. पण याचा अर्थ असा आहे की, त्यांनी दबावाखाली काम केलेले आहे. जर त्यांनी दबावाखाली काम केले नसते तर तीन-साडेतीन वर्षे मोकाट सुटलेली लोक आहेत, तसे ते सुटले नसते.श्री.पारसमल जैन यांच्या बाबतीत लोकसत्तेमध्ये आणि अन्य वर्तमान पत्रामध्ये याबाबतीत सर्वकाही पूर्णपणे माहिती....

. . . .3 ए-4



श्री.मधुकर चव्हाण . . . .

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

आलेली आहे. श्री.पारसमल जैन यांनी सांगितले आहे की, मला तेरणा साखर कारखान्याच्या डिस्टीलरी प्रकल्पाचे प्रमुख श्री.बंदाडे यांच्याकडे त्यांनी नेले आणि असे सांगितले की, श्री.निंबाळकर यांच्यामुळे श्री.पद्मसिंह पाटील यांची राजकीय बदनामी झालेली आहे. त्यामुळे त्यांना संपवावयाचे आहे. म्हणून 30 लाख रुपयांची सुपारी देण्यात आली. तसेच त्यांनी नंतर असेही सांगितले की, मला श्री.अण्णा हजारे यांना देखील मारण्यासाठी सुपारी देण्यात आली होती.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ MAP/ प्रथम सौ. रणदिवे.... 16:30

श्री. मधुकर चव्हाण....

पण मी ती सुपारी घेतली नाही. सभापती महोदय, या ठिकाणी नार्को टेस्टबद्दल उल्लेख करण्यात आला आहे. मग सगळया आरोपींच्या नार्को टेस्ट कशासाठी घेण्यात येतात? साध्वीची नार्को टेस्ट कशासाठी घेतली? बाकीच्यांच्या नार्को टेस्ट कशासाठी घेतल्या? त्यांचा छळ होईपर्यंत त्यांना कशासाठी त्रास देण्यात आला, त्यांना अशा प्रकारचा त्रास त्यांना द्यायला नको होता. If it is not a principle evidence तर शासनाने या नार्को टेस्ट घ्यावयास नको होत्या. आधुनिक तंत्रांचा उपयोग गुन्हा शोधण्यासाठी केला जातो. काही वेळेला गुन्हेगार निर्ढावलेले असतात तसे या प्रकरणात निर्ढावलेलेच होते. जर या प्रकरणात निंबाळकरांची पत्नी हायकोर्टात गेली नसती, तिने आग्रह केला नसता आणि माननीय उच्च न्यायालयाने न्यायबुध्दीने सी.बी.आय.कडे चौकशी करण्याचे आदेश दिले नसते तर हे प्रकरण तसेच दाबले गेले असते आणि गुन्हेगार मोकाट सुटले असते. मला या ठिकाणी भिती अशी वाटते की,महाराष्ट्राचा बिहार होईल की काय? कारण बिहारमध्ये किंवा उत्तरेकडील राज्यांमध्ये हेच चालते. समाजामध्ये अन्य जे गुन्हागार आहेत त्यांनी एकमेकांच्या सुपाऱ्या घेऊन एकमेकांना ठार मारणे हे निषेधार्ह आहेच. पण त्यांची जी गुन्हेगारी प्रवृत्ती आहे ती प्रवृत्ती लक्षात घेऊन तर्काच्या आधारावर ते क्षम्य आहे. पण राजकारणामध्ये समाजाचे नेतृत्व करणारी माणसे आहेत, ज्यांनी समाज जीवनाला दिषा द्यायची आहे.सभापती महोदय, या राज्याचे जे गृह मंत्री होते ते 30 लाखाची सुपारी देऊ शकतात काय? या ठिकणी श्री. शुक्ला यांच्याबद्दल सांगण्यात आले. होय, आम्हाला त्याबद्दल लाज वाटते, आम्हाला माहीत नव्हते की, तो इतका नालायक माणूस निघेल. पण आम्ही त्याना पक्षातून एका मिनिटात काढले. आपण या ठिकाणी एकमेकांवर दोषारोप करायला नको. आपण आपापल्या ठिकाणी राहून स्वत:ला सुधारण्याचा प्रयत्न केला पाहिजे. राष्ट्रवादीच्या हातातून ते खाते काढून घेण्यात यावे, अशा प्रकारे नैतिकतेच्या दृष्टीने त्यांनी ते वाक्य उच्चारावयास नको होते मी श्री. कपिल पाटील यांना सांगू इच्छितो की, त्यांना अशा प्रकारे सांगण्याचा काय अधिकार आहे? मला मान्य आहे. आमचे येथे राष्ट्रवादीच्या बाबतीत काही म्हणणे नाही तर राज्य कसे चालले आहे, त्याबाबतीत आमचे म्हणणे आहे. कोणाचे खून कधी झाले याबाबत या ठिकाणी उदाहरणे देण्यात आली. शिवसेनेचे परळचे आमदार आमचे मित्र श्री. विठ्ठल चव्हाण यांचा खून कोणाच्या काळात झाला, श्री. प्रेमकुमार शर्मा यांचा खून कोणाच्या काळात झाला, श्री. रामदास नायक यांचा खून कोणाच्या काळात झाला.

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मधूकर चव्हाण...

श्री. रमेश मोरे यांचा खून कोणाच्या काळात झाला. दाऊद पळून गेला त्याला पळून जाण्यासाठी मदत केली ते राज्य मंत्री कोण होते हे सगळयांना माहीत आहे.कोणाच्या विमानातून कोण गुन्हेगार पळाले याची आम्हाला या ठिकाणी चर्चा करावयाची नाही. अगदी राजकीय अभिनिवेशातून बोलावयाचे झाले तर आसे बोलता येईल पण मला बोलण्याचा अधिकार नाही म्हणून एक सहकाकरी या नात्याने सांगू इच्छितो की, ज्यांचे नाव नार्को टेस्टमध्ये घेतले होते त्यांना खासदारकीचे तिकीट का दिले? असे आम्ही विचारु शकतो. पण तो आमचा प्रश्न नाही. सभापती महोदय, दोनत्तीन गोष्टींचा उल्लेख करुन मी माझे भाषण पूर्ण करणार आहे.

सभापती महोदय,जी गोष्ट सी.बी.आय.ने आता शोधून काढली ती गोष्ट माननीय आर.आर.पाटील यांच्या अखत्यारित असलेल्या पोलीस खात्याला कां शोधता आली नाही? याचा सरळ अर्थ असा आहे की, जे आपल्याला नको आहेत, त्यांना गुन्हेगार जाहीर करा, जंगजंग पछाडा, त्यांना त्याठिकाणी बीऑन्ड बार्स ठेवा, जे हवे आहेत त्यांना सरंक्षण द्या, असा त्याचा अर्थ आहे. महाराष्ट्रातील राजकारणातील लोक अशा तऱ्हेने एकमेकांना सुपारी द्यायला लागले तर लोकांचा विश्वासच उडून जाईल. वर्तमानपत्रातून अशी बातमी छापून आली की, डॉ. पद्मसिंह पाटील यांची बदनामी तेरणा साखर कारखान्या बद्दल झाली. सन्माननीय सदस्य श्री.रावते साहेबांनी सांगितले ते खरे आहे. आम्ही येथे कोणाची प्रकरणे बाहेर काढली किंवा बाहेर काही विरोधी बोलतो तर समोरची माणसे आम्हाला ठार मारण्याची सुपारी देतील. दुसरी एक गोष्ट मला या ठिकाणी सदनाच्या लक्षात आणून द्यावीशी वाटते. पापाच्या पैशाला शेवटी पापाच्या मार्गानेच पाय फुटतात. या सगळया बँका सगळयांनी मिळून लुटल्यात.सत्तेवर असणारी माणसे 30-30 लाख रुपयांची सुपारी ठार मारण्यासाठी देतात. सी.बी.आय.ने पूर्ण चौकशी करुनच त्यांना अटक केली आहे. माझी या ठिकाणी अशी मागणी आहे की, पवनराजे निबांळकरांची हत्या झाल्यानंतर या तीन वर्षाच्या काळात सी.बी.आय.ने आता जे शोधून काढले ते पोलीस खात्याने त्या काळामध्ये श्री .आर.आर.पाटील यांच्या नेतृत्वाखाली कां शोधून काढले नाही? याची चौकशी करणे आवश्यक आहे मग कोणाच्या दबावाखाली हे खाते काम करीत होते हे लक्षात येईल. महाराष्ट्रामध्ये अशा तऱ्हेने सुपाऱ्या देऊन खून करण्याचे प्रकार जर वाढायला लागले तर सामाजिक जीवनात कोणी

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण..

कोणाची भ्रष्टाचाराची प्रकरणे बाहेर काढणार नाही. श्री. अण्णा हजारेंबद्दल एखाद्याचे मतभेद असू शकतात परंतु त्यांना ठार मारण्यासाठी अशा तऱ्हेची सुपारी दिली जाते ही अतिशय गंभीर गोष्ट आहे.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/ पूर्वी कु. थोरात 16:35

श्री. मधुकर चव्हाण .....

सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी असे म्हणाले की, कोणाच्या वेळी काय झाले हे सोडून द्या. सन्माननीय श्री. गोपीनाथराव मुंडे गृहमंत्री असतानाच्या संदर्भात विलासरावांचे नाव घेतल्याबरोबर सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील म्हणाले की, ते सभागृहात नाहीत त्यामुळे तो उल्लेख कामकाजातून काढून टाकावा. पण श्री. गोपीनाथराव मुंडे सुध्दा या सभागृहात नाहीत. त्यामुळे त्यांच्या नावाचा उल्लेख कामकाजातून काढा असे ते म्हणाले नाहीत. त्यामुळे त्यांच्या हेतूबद्दल मला शंका आहे. ते कोणाच्या सांगण्यावरुन बोलत असतात ? तो मुद्दा आज नाही. या सगळ्या प्रकरणाची चौकशी होणे अत्यंत आवश्यक आहे असे मला वाटते. जसे गुन्हेगाराचा शोध लागलेला आहे तसे राजकीय क्षेत्रामध्ये महाराष्ट्राच्या गृहमंत्री पदावर असलेल्या एका व्यक्तीने सुपारी दिल्यानंतर तीन वर्षे सत्य शोधून काढण्यामध्ये कोण दबाव आणत होता ? आम्ही या ठिकाणी बोलत होतो की, पोलीस खात्याच्या बाबतीत Sir, they are not akin to the Law and Order problem. ते कायद्याकडे किंवा नियमाकडे झुकलेले पोलीस नाहीत. Sir, they are akin to the Ruling Party. ते पोलीस सत्ताधारी पक्षाकडे झुकलेले आहेत. पूर्वीच्या काळामध्ये असे म्हटले जात होते की, Judiciary must akin to the Ruling Party. तीन जज्जेसना सुपरसीड करुन दुसऱ्याची नेमणूक केली होती. ज्यावेळी पोलीस खात्यातील माणसे अशा तऱ्हेने राजकीय क्षेत्रातील माणसांच्या दबावाला बळी पडून इतका मोठा खून झालेला असताना त्यातील सत्य शोधून काढण्याच्या बाबतीत गप्प बसत असतील तर महाराष्ट्राच्या कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने ही अत्यंत चिंतेची गोष्ट आहे. म्हणून याचा गांभीर्याने विचार करुन तीन वर्षाच्या काळात हे शोधण्यामध्ये कोणाला अपयश आले, कोण दबावाला बळी पडले याचीही चौकशी केली पाहिजे. श्री. आर. आर. पाटील साहेबांनाही विचारले गेले पाहिजे की, आपल्यावर कोणाचा दबाव होता. सीबीआयने जे शोधून काढले ते आपण त्यावेळी का शोधून काढले नाही ? याबाबत महाराष्ट्र शासनाने अत्यंत गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

---

...2...



RDB/ KGS/ MAP

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : यानंतर सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे बोलतील. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, दुपारी 4.30 वाजता या चर्चेची वेळ संपत होती. मी आणखी फार तर 15 मिनिटे चर्चेला परवानगी देईन. त्यानंतर ताबडतोब अर्थसंकल्पावरील चर्चेला सुरुवात होईल.

डॉ. नीलम गोऱ्हे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सगळ्यात महत्वाचे म्हणजे परवा ज्यावेळी सीबीआयने डॉ. पदमसिंह पाटील यांना ताब्यात घेतले त्यावेळी शनिवारची रात्र होती. त्यामुळे महाराष्ट्रभर गोंधळ उडाला. त्यांना चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे की, अटक केली आहे याबाबत काही कळण्यास मार्ग नव्हता. आज देखील सीबीआयने वाहिन्यांवरुन जे काही सांगितले ते आपल्याला माहीत आहे. प्रत्यक्षात त्यांना कस्टडीमध्ये ठेवले आहे आणि लगेचच दोन-तीन तासांमध्ये त्यांना रक्तदाबाचा त्रास सुरु झाला हे बातम्यांमधून आपल्याला कळलेले आहे. उस्मानाबादमध्ये पत्रकांरावर दगडफेक झाली. अनेक पत्रकारांचे कालपासून फोन येत आहेत. स्वत: आपण उस्मानाबादला जाणता. पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद, पोलीस उपअधीक्षक, उस्मानाबाद आणि उस्मानाबाद शहराचे पोलीस निरीक्षक हे तिघेही जण गेले दोन दिवस रजेवर आहेत. शनिवार पासून त्यांनी रजा घेतलेली आहे. मला पहिला प्रश्न असा उपस्थित करावयाचा आहे की, तीनही महत्वाचे अधिकारी जर रजेवर असतील तर उस्मानाबाद शहरातील कायदा व सुव्यवस्थेची जबाबदारी कोण सांभाळत आहे ? माझ्या माहितीप्रमाणे तुळजापूरचे पोलीस निरीक्षक श्री. नागनाथ गायकवाड यांच्याकडे आता उस्मानाबाद शहराचा चार्ज आहे, ही गोष्ट खरी आहे काय ? अनेक लोकांचे फोन येत आहेत की, कोणतीही बातमी आम्ही म्हणू त्याच्या विरोधात दिली तर तुम्हाला बघून घेऊ. त्या ठिकाणी पालकमंत्री सुध्दा जागेवर नाहीत. त्यांचे पुत्र श्री. राणा जगजितसिंह पाटील हे स्वत: राज्यमंत्री आहेत. स्वत: गृह राज्यमंत्र्यांनी उस्मानाबादला भेट द्यावी. तेथील नगराध्यक्ष स्वत: दगडफेक करण्यास उतरलेले आहेत. गाड्या फोडल्या गेल्या आहेत. उस्मानाबाद शहर जळत आहे. अशा वेळेला आपण भूतकाळाबद्दल चर्चा करीत आहोत तसेच पुढे कोणाला कशी शिक्षा होणार आहे यावर चर्चा करीत आहोत. परंतु महाराष्ट्राचे माजी गृहमंत्री, ज्यांच्याकडे हजारो लोकांनी निवेदने दिली ते आज अटकेत असताना उस्मानाबाद पोलिसांवर कोणत्या प्रकारचा दबाव आहे ? आपण दोन दिवस सगळ्या वाहिन्यांवर ऐकले असेल. श्री. पवनराजे निंबाळकर यांचे पुत्र

...3...

अशुध्दित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ......

ओम यांनी सातत्याने उस्मानाबादमधील 4 एसपींची नावे घेतली. ते सातत्याने शब्द वापरत होते. माझ्या माहितीप्रमाणे श्री. पवनराजे निंबाळकर यांचे पुत्र हे शिवसेना-भाजपमध्ये नाहीत. कोण येणार, कोण येणार नाही याचा विचार आम्ही कधीच करीत नाही आणि कोणते नासके आंबे गेले याचाही विचार आम्ही करीत नाही. यामध्ये प्रश्न असा आहे की, चार पोलीस अधिक्षकांवर जाहीरपणे आरोप झाला की, त्यांनी कोणत्याही प्रकारे दखल घेतली नाही. आज देखील पोलीस अधिक्षक का रजेवर आहेत ? उस्मानाबाद शहराच्या संदर्भात आपण जेव्हा उत्तर द्याल तेव्हा त्यांना सीबीआयकडून कसा न्याय मिळेल हे जसे आपण बघू

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MAP/ यापूर्वी श्री.बरवड 16:40

डॉ.नीलम गोऱ्हे....

तसे सामान्य जनतेच्या मनामध्ये हे देखील प्रश्न आहेत. जणू काही पूर्वीच्या काळातील ही महानाट्ये आहेत. 'क्राईम ॲण्ड पनिशमेंट', 'ऑथेल्लो', 'बेकेट', ही त्यावेळची महानाट्ये आहेत. श्री.पवनराजे मर्जीतून उतरले म्हणून त्यांचा खून झाला. आता डॉ.पद्मसिंह पाटील कोणाच्या मर्जीतून उतरले म्हणून हे महानाट्य घडत आहे, असे प्रश्न आज जनतेच्या मनात आहेत. न्याय आणि खेळ खंडोबा करावयाचा नसेल तर ज्या गोष्टी ख-या आहेत त्या जनतेसमोर आल्या पाहिजेत. आयबीएन-लोकमतच्या व्हॅनवर हल्ला झाला आहे त्यातील आरोपींना शिक्षा होणार आहे काय ? बिहारमध्ये लोकसभेच्या निवडणुकीमध्ये या प्रवृत्तीचे उमेदवार पराभूत झाले आहेत. श्री.नीतीशकुमार यांनी फास्ट ट्रॅक कोर्ट निर्माण केल्यामुळे त्या कोर्टांनी अनेक गुंडांना शिक्षा केली हे त्यांच्या पराभवाचे कारण आहे. त्यामुळे तेथील जनतेचे धैर्य वाढले आहे. ज्या ज्या लोकांनी उस्मानाबाद जिल्हयात धमक्या दिलेल्या आहेत, त्याची सन्माननीय गृह राज्यमंत्री दखल घेणार आहेत काय ? सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी असे म्हणाले की, राष्ट्रवादी पक्षाला बदनाम करु नका. मी त्यांचे स्पीरिट समजू शकते. पण आपण स्वत: उस्मानाबादमध्ये जाऊन पत्रकारांना धीर देणार आहात काय ? येथे सभागृहात बोलणे आणि प्रत्यक्षात तेथे काही घडत आहे यामध्ये खूप फरक आहे. उस्मानाबादचे पत्रकार आजही म्हणत होते की, आम्ही सन्माननीय मुख्यमंत्र्यांना भेटून संरक्षणाची मागणी करतो. तेथे हा कोणता प्रकार चालला आहे ? मला सभागृहाचा अधिक वेळ घ्यावयाचा नाही. पहिला जो मुद्दा होता तो असा की, यापूर्वीच्या सावंत समितीचा अहवाल आलेला होता त्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे हे आजही सभागृहाला समजलेले नाही. दुसरा महत्वाचा मुद्दा असा आहे की, जे पोलीस अधिकारी घरगडया सारखे वागत होते असा त्यांच्यावर आरोप जाहीरपणे होत आहे ते तसे काय वागले ? तिसरा महत्वाचा मुद्दा असा आहे की, उस्मानाबाद शहरामध्ये वरिष्ठ पोलीस पाठवून तेथील लोकांचे नीतीधैर्य वाढविण्यासंबंधी शासन जबाबदारी घेणार आहे काय याची उत्तरे आजच्या आज मिळाली पाहिजेत हीच अपेक्षा व्यक्त करुन मी माझे भाषण संपविते, जय हिंद, जय महाराष्ट्र.

------

2....

08-06-2009 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 3D-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, एका महत्वाच्या विषयावर सभागृहात चर्चा उपस्थित करण्यात आलेली आहे. त्या चर्चेत भाग घेण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, खरे म्हणजे श्री.पवनराजे निंबाळकर हत्या प्रकरणात डॉ.पद्मसिंह पाटील यांचे नाव असणे हे या सभागृहाला आणि खालच्या सभागृहाला नवीन नाही. यासंदर्भात या सदनात सातत्याने चर्चा झालेंली आहे आणि त्या चर्चेला जी उत्तरे देण्यात आली होती ती सगळयात चिंतेची बाब आहे. विरोधी पक्षाकडून सातत्याने एका विषयाच्या संदर्भात शासनाकडे पाठपुरावा करीत आहे. जसे 'सामना' या मराठी चित्रपटामध्ये मारुती कांबळेचे काय असा प्रश्न विचारला जातो, तसेच श्री.पवनराजे निंबाळकर यांच्या हत्येच्या प्रकरणाचे पुढे काय झाले असे सातत्याने विचारण्यात येत होते. पण सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी म्हटल्याप्रमाणे स्वच्छ, साफसुथरा असे तत्कालीन गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील हे नेहमी उभे राहून सांगत असत की, एक जरी याबाबत पुरावा सापडला तर या पदावर मी एक क्षणभरही राहणार नाही. अशाप्रकारे ते भाषणे करीत असत. सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी म्हटल्याप्रमाणे श्री.आर.आर.पाटील हे प्रामाणिक असतीलही. मग त्यांच्यावर कोणी दबाव आणला होता काय, असा कोणता मातब्बर नेता होता की ज्यांचा दबाव श्री.आर.आर.पाटील यांच्यावर पडू शकतो ? कारण श्री.चतुर्वेदी यांच्या अटकेबाबत हाच प्रकार झाला. मुंबईतील बिल्डर आणि मुंबईतील आय.पी.एस.अधिका-यांचे सगनमत झाले होते. या बिल्डरला काम मिळू नये आणि त्या बिल्डरला मिळावे यासाठी प्रयत्नशील असणारे एक अतिरिक्त आयुक्त श्री.बिपीन बिहारी हे रस्टीकेट झाले. ज्यामध्ये श्री.अनामी रॉय यांचे नाव आले, श्री.अरुण पटनाईक यांचे नाव आले, त्यांना वाचविण्याचे सगळे प्रयत्न झाले. त्यावेळी सुध्दा साफसुथरे अशी प्रतिमा असलेले श्री.आर.आर.पाटील हेच गृहमंत्री होते. मग सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी म्हटल्याप्रमाणे ही वस्तुस्थिती असेल तर त्यांच्यावर अजून वरुन दबाव असावा आणि हे सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी आपल्या वक्तव्यात मान्य केले आहे असे माझे मत आहे. आपल्या राज्यात राजकारणाचे गुन्हेगारीकरण झालेले आहेच, त्याची मला चिंता वाटत आहे. पण पोलिसांचे राजकीयीकरण होत

3...



NTK/ KGS/ MAP/

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

असल्याचे स्पष्ट झाले आहे. म्हणजे 26 नोव्हेंबर रोजी हल्ला झाल्यामुळे तत्कालीन मुख्यमंत्री, तत्कालीन केंद्रीय गृहमंत्री, तत्कालीन उपमुख्यमंत्री हे आपल्या पदावरुन गेले. हे सर्व पायउतार होऊन सुध्दा एका अनामी रॉय यांना वाचविण्यासाठी सत्ताधारी पक्षातील लोकांनी आकाश पाताळ एक केले होते.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MAP/ KGS/ (पूर्वी श्री. खंदारे) 16:45

(श्री. विनोद तावडे.....

आकाश पाताळ एक केल्यानंतर अनामी रॉय यांना वाचविण्याचे कारण हे होते की हे अनामी रॉय चतुर्वेदीच्या केसमध्ये उपयोगी पडले, पवनराजेंच्ये केसमध्ये उपयोगी पडले. त्यांना वरुन कोणी तरी सांगितले होते. त्यांच्यावर कारवाई केली तर आपल्या वरच्या नेत्याचे वाभाडे निघतील की काय याची त्यांना चितां लागली होती. म्हणजे पोलिसांचे राजकीयकरण करणे चालू आहे. महाराष्ट्राचा सुवर्ण महोत्सव साजरा करताना महाराष्ट्राच्या सीआयडी खात्याला इतक्या खालच्या दर्जावर नेऊन ठेवण्याचे काम कधीच झाले नव्हते. सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये आपल्या विविध खात्यांच्या कामगिरीचा गौरवपूर्ण उल्लेख व्हावयास पाहिजे. परंतु आज आपल्या खात्याचा दुदैवाने कोणत्या पध्दतीने उल्लेख करावा लागत आहे ? सभापती महोदय, त्यावेळच्या गृह मंत्र्यांनी सभागृहामध्ये असे उत्तर दिले होते की, या केसमध्ये राजकीय भांडवल करण्याची काही आवश्यकता नाही. तानाजी पाटील आणि ज्या लोकांची नावे मी घेतली त्यातील दोन लोक जेल मध्ये आहेत. ते लोक जेलमध्ये असल्याचे पुरावे आमच्याकडे आहेत. मग जेलमधून बाहेर पडून ते खून कसे करतील. या सभागृहामध्ये आणि खालच्या सभागृहामध्ये जेलमधून बाहेर पडून खून कसे केले जातात याचे अनेक किस्से सांगितले गेले होते. हे तर त्याहून भयानक आहे. गृहमंत्र्यांनी सांगितले की ते जेलमध्ये होते आणि जेलमध्ये जे लोक होते ज्यांची नावे नार्कोटेस्टमध्ये आलेली आहेत त्यांनी जेलमधून बाहेर येऊन हे केलेले आहे. म्हणजे आपले पोलीस खाते किती स्वच्छ किती साफ, पैसे न घेणारे आहे हे त्यांच्या या वक्तव्यातून उघड होते. सभापती महोदय, जे निवेदन गृहमंत्र्यांनी आपल्या संमतीने या सभागृहामध्ये केले होते त्या निवेदनामध्ये गृहमंत्र्यांनी सांगितले होते की 28.5.2008 रोजी सदर नार्कोटेस्टची व्हीडीओ सीडी नवी मुंबई पोलिसांना प्राप्त झाली. त्या सीडीचे अवलोकन करताना पवनराजे निंबाळकर यांच्या खुनाच्या संदर्भात त्यांनी महेंद्रसिंग बिस्त,फिरोज खान, अजितबाबा, पद्मसिंह पाटील, डी.के.राव, विकी मल्होत्रा, छोटा राजन, आणि राणादादा यांची नावे नमूद केली आहेत. तसेच ज्यावेळी पवनराजेंची हत्त्या झाली त्यावेळचे विलास जाधव वगैरे उल्लेख पुढे आहे... पुन्हा त्या निवेदनामध्ये त्यावेळच्या गृहमंत्र्यांना आमचे मित्र सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी सल्ला दिला असावा, कादेशीर माहिती दिली असावी आणि त्यामुळे श्री. आर.आर.पाटील बोलायला विसरले नाहीत की नार्कोटेस्टवर

...2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. विनोद तावडे...)

भारता व्यतिरिक्त सर्वत्र बंदी घालण्यात आलेली आहे. तसेच कोर्टापुढे नार्कोटेस्टचे निष्कर्ष हे विधिग्राह्य पुरावा म्हणून स्वीकारले जात नाहीत. जेव्हा तेलगीच्या नार्कोटेस्टमध्ये भुजबळ साहेबांचा उल्लेख आला तो पुरावा मानून झी टी.व्ही.वर ॲटॅक केल्याचे नाटक करुन त्यांचे गृहमंत्री पद हडप केले. त्यावेळी नार्को टेस्टमधील वक्तव्य खरे मानले.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सन्माननीय सदस्य चुकीची माहिती देत आहेत. रेकॉर्डवर चुकीचे येऊ नये म्हणून त्यांनी केलेल्या वक्तव्यामध्ये दुरुस्ती मी करु इच्छितो. त्यावेळी झी टी.व्ही.वर जो विडंबनाचा कार्यक्रम झाला तो चुकीचा झाला होता त्यामुळे काही कार्यकर्त्यांनी चिडून तेथे हल्ला केला होता. त्यामुळे नार्कोटेस्ट आणि त्या प्रसंगाचा काही संबंध नाही हे मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो.

श्री. विनोद तावडे : तेलगीच्या नार्कोटेस्टमध्ये माननीय मंत्री महोदय श्री. छगन भुजबळ यांचा उल्लेख करण्यात आलेला होता.

**उपसभापती** : आता मिडियासंबंधी भाषणामध्ये उल्लेख करण्यात आला त्यासंदर्भाने मी सांगू इच्छितो की मिडियावर जे काही दाखविले जाते किंवा कधी कधी जे काही मिडिया प्रसिध्द करते ते सगळेच आपण ग्राह्य धरण्याची गरज नाही. या सभागृहाने यासंदर्भात अनेक वेळा अनुभव घेतलेला आहे. मिडियाच्या संदर्भात ब-याच लोकप्रतिनिधींनी हजार वेळा सांगितले आहे की, मिडियाची भूमिका ही निश्चितपणे आक्षेपार्ह असते.

...नंतर श्री. खंदारे...

अमुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**उपसभापती.....**

आणि कदाचित काही वेळेला संयुक्तिक नसते. कधीकधी ते खोटेही असू शकते. त्यामुळे त्यांनी दाखविलेल्या सगळ्याच गोष्टी फार सत्य आहे असे मानण्याची काही गरज नाही असे माझे स्पष्ट मत आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी याठिकाणी सन्माननीय श्री.छगन भुजबळ यांचा संदर्भ देऊन ती बाब वारंवार सांगू नये. सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण पुढे सुरु करावे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय श्री.छगन भुजबळ वा अन्य कोणाचे नाव घेत नाही. ज्यावेळी तत्कालीन गृहमंत्री या सभागृहात म्हणत होते की, कोर्टामध्ये नार्को टेस्टचे निष्कर्ष विधिग्राह्य पुरावा म्हणून मानत नाही. जो निष्कर्ष तुम्ही डॉ.पद्मसिंह पाटील यांच्या प्रकरणात लावला तो निष्कर्ष तुम्ही श्री.छगन भुजबळ यांच्या प्रकरणी का लावला नाही. सर्व प्रकारचे निष्कर्ष त्यावेळी ग्राह्य धरले गेले नाही हे माझी बोलणे नाही. या सभागृहातील त्यावेळचे उपमुख्यमंत्री यांनी दिलेले स्टेटमेंट आहे. माझ्या मनातील मी सांगत नसून प्रोसिडिंगमधील भाग वाचून दाखवित आहे. त्यात स्पष्टपणे जे म्हटले आहे ते सांगितल्यानंतर सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुळकर्णी यांना अडचण काय आहे? या सभागृहामध्ये ही चर्चा उपस्थित करताना आमची प्रामाणिक इच्छा होती की, जर या राज्यात खरोखर कायद्याचे राज्य आहे, या राज्यामध्ये पोलिसांवर आमचा राजकीय दबाव नाही असे तुमचे म्हणणे असेल तर पवनराजे निंबाळकरांच्या पत्नी व मुलगा यांनी मागणी केली, अण्णा हजारे यांनी मागणी केल्यानंतरही शासन मान्य करायला तयार नाही. मग या सर्व पार्श्वभूमीवर आपण जनतेपुढे काय तोंड घेऊन जाणार आहात. आपण म्हणजे तुम्ही. आम्ही नाही. हे सार्वभौम सभागृह आहे. आपण सुवर्ण महोत्सव साजरा करणार आहोत. राज्यातील अनेक गौरवशाली परंपरांचा उल्लेख करणार आहोत. हे कोणत्या गौरवशाली पंरपरेत बसते? मग हिंमत का नाही? अमूक एक नाव आले, ताबडतोब समज देऊन ही तुमची चूक आहे, याबाबत पक्षाने केलेली ही कारवाई आहे असे म्हटले असते तर आम्ही समजू शकलो असतो. नेहमी ताठ उभे राहणारे ॲड.गुरुनाथ कुळकर्णी आज आम्हाला तसे दिसलेले नाहीत. ते पक्षाशी बांधिल असतील याची आम्हाला प्रामाणिक खात्री आहे. कोकणातील माणूस दबणारा नाही. मागील कोणत्या प्रकरणाबाबत मला बोलायचे नाही. परंतु मला मनापासून वाईट वाटले. 26/11 च्या घटनेबद्दल नागपूरच्या अधिवेशनात चर्चा झाली. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, केंद्रीय गृहमंत्री यांना पायउतार व्हावे लागले. एक पोलीस अधिकारी वाचला. आता सगळे वाभाडे बाहेर





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

पडत आहेत. तुमचे अधिकारी काय करीत होते? तुमचे अधिकारी कुठे होते, काय करीत होते हे रोज एक्स्प्रेस, लोकसत्तेमध्ये छापून येत आहे. स्व.कामटे यांच्या पत्नी श्रीमती विनिता कामटे यांना आपले पोलीस अधिकारी माहिती द्यायला तयार नाहीत. ज्यांच्या पत्नीने या देशासाठी सर्वस्व गमावले त्यांना पोलीस आयुक्त माहिती द्यायला तयार नाहीत. त्यांना माहितीच्या अधिकाराखाली जाऊन माहिती मागण्याचा निर्णय घ्यावा लागतो आणि पर्याय नाही म्हणून तुम्हाला माहिती द्यावी लागली. श्रीमती कामटे यांनी माहितीच्या अधिकाराखाली पोलीस आयुक्तांकडे अपील केल्यानंतर जॉईंट कमिशनर, कमिशनर, तुमच्या पक्षाचे असणारे गृहमंत्री यांच्या माध्यमातून माहिती मिळविण्यासाठी भटकावे लागते. सरकार आपण चालवित आहात, त्यामध्ये एवढी संवेदनशीलता पाळत नाही?

3जी.1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ....

हे असे एका प्रसंगातूनच घडले नाही तर चतुर्वेदी, निंबाळकर, पद्मसिंह पाटील, अनामी रॉय या सर्वच प्रकरणांमध्ये घडले. अशा प्रकारे हे पोलीस अधिकारी राजकीय नेत्यांना विकत घ्यायला लागले हे वास्तव अशा घटना घडल्यानंतर समोर येतात हे दुर्दैव आहे. त्यामुळे पोलिसांचे राजकीयकरण आणि राजकारणाचे गुन्हेगारीकरण हे थांबविण्याची प्रतिज्ञा राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्ताने राजकारणी घेणार का हा प्रश्न स्वत:ला विचारावा एवढेच आवाहन करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

------

**उपसभापती** : सभागृहात जी चर्चा सुरु आहे त्या चर्चेचे उत्तर माननीय गृहमंत्री स्वत: देणार असल्याचा निरोप त्यांनी पाठविला आहे. म्हणून सन्माननीय सदस्य श्री. जयप्रकाश छाजेड यांचे भाषण संपल्यानंतर माननीय गृहमंत्री सभागृहात येईपर्यंत आपण अर्थसंकल्पावरील चर्चा सुरु करु, अशी माझी विनंती आहे.......अडथळा.....ज्यावेळेस ही चर्चा सुरु होती त्यावेळेस माननीय सभापतींच्या दालनात सर्व गटनेत्यांसह सर्व उपस्थित होते. त्यानुसार ही चर्चा ताबडतोब संपवून आताच चर्चा करावयाचे ठरले होते.

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, सभागृहात अजून चर्चा सुरुच आहे. माननीय गृहमंत्री जर येऊ शकत नसतील तर उत्तर उद्या ठेवावे, अशी माझी सूचना आहे.

**उपसभापती** : आजच चर्चा संपवावयाची असे ठरले आहे.

श्री. अरविंद सावंत : महोदय, पॉइंट ऑफ इन्फर्मेशनच्या माध्यमातून मला असा मुद्दा उपस्थित करावयाचा आहे की, या सर्व चर्चेला सुरुवात करण्यापूर्वी आपण म्हणाला होता की, चर्चेसाठी एकूण वेळ दीड तासाचा असून त्यापैकी एक तास चर्चा व माननीय मंत्री महोदयांना उत्तरासाठी अर्धा तास. त्यावर सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव असेही म्हणाले होते की, दोन्ही पक्षाकडिल वेळेचे वाटप कृपया सांगावे.

**उपसभापती** : यासंबंधी माझे उत्तर असे आहे की, सभागृहाला विश्वासात घेऊनच आपण सभागृहाचे कामकाज करीत असतो. सभागृहात असे ठरले होते की, या चर्चेत फक्त तीन चार सन्माननीय सदस्यांनीच बोलायचे. परंतु त्यानंतर माननीय गटनेत्यांचा निरोप आला व त्याप्रमाणे

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** ........

इतर सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी दिली. म्हणून सन्माननीय सदस्यांनी देखील सभागृहाचे कामकाज करण्यासाठी मला सहकार्य करावे, अशी माझी विनंती आहे. परंतु तसे होत नाही असे दिसते म्हणून मी जसे ठरले आहे त्याच पध्दतीने कामकाज करणार, वेगळ्या पध्दतीने जाणार नाही. आता सन्माननीय सदस्य श्री. जयप्रकाश छाजेड यांनी आपले भाषण सुरु करावे.

श्री. जयप्रकाश छाजेड (विधानसभेने निवडलेले) : महोदय, अत्यंत महत्वाच्या विषयावर सभागृहात चर्चा सुरु आहे. गेल्या दोन दिवसांपासून ज्या घटना घडत आहेत त्या विषयावर गांभीर्याने आपण विचार करणे आवश्यक आहे. सभागृहात चर्चा करीत असताना एखादी घटना अथवा एखादा प्रसंग घडला तर त्याचा उपयोग राजकारणाकरिता करुन जाहीर सभेत भाषण करतात त्याप्रमाणे सन्माननीय सदस्य भाषण करुन एखाद्या पक्षाला बदनाम करण्याचा प्रयत्न करतात....अडथळा....

श्री. दिवाकर रावते : सभागृहात भाषण करताना कुठल्याही पक्षाचे नाव घेतलेले नाही.

श्री. विनोद तावडे : महोदय, हा एक प्रकारे हेत्वारोप आहे....अडथळा.....तुम्ही खून करा आणि आम्ही बोलायचे सुध्दा नाही काय ?

श्री. जयप्रकाश छाजेड : महोदय, सन्माननीय सदस्य ऐकून सुध्दा घेणार नाहीत काय ? बोलायचेच झाले तर आपल्याबद्दलही भरपूर बोलता येईल.

श्री. विनोद तावडे : महोदय, हा आमच्यावर हेत्वारोप आहे, तो कामकाजातून काढून टाकावा.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री. जयप्रकाश छाजेड :सभागृहामध्ये चर्चा करीत असतांना, एखाद्या घटनेवर बोलत असतांना, ज्या वेळेला तुम्ही पक्षाचे नाव घेऊन एका पक्षाला बदनाम करण्याचे काम या ठिकाणी सुरु आहे. राष्ट्रवादी पक्षाचे नाव घेऊन राष्ट्रवादी पक्षाला बदनाम करण्याचे काम या ठिकाणी सुरु आहे. आपल्या भाषणामध्ये विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी अनेक वेळा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नाव घेतलेले आहे. राजकीय दृष्टिकोनातून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला बदनाम करण्याचा प्रयत्न या ठिकाणी सुरु आहे. त्यामुळे या प्रश्नाचे गांभीर्य घालवू नये अशी माझी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे.

श्री. दिवाकर रावते : श्री. पद्मसिंह पाटील हे राष्ट्रवादी पक्षाचे खासदार नाहीत का? एवढया प्रश्नाचे आपण उत्तर द्यावे.

श्री. जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, ज्या गोष्टी माहीत आहेत त्या गोष्टींच्या संदर्भात विनाकारण आरडाओरड करण्यात काही अर्थ नाही. माझी आपल्याला विनंती आहे की, व्यक्ती सापेक्ष असू शकतो परंतु पक्ष हा निरपेक्षच असतो. माणूस जेव्हा दस-याची चूक दाखवतो त्यावेळेस एक बोट दुस-याकडे करतो त्यावेळेस चार बोटे स्वत:कडे असतात हे आपण विसरु नये. या घटनेमध्ये बीजेपीच्या नगरसेवकाचा सुध्दा हात होता हे आपण विसरु नका एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. या घटनेमध्ये काय काय झालेले आहे याची महाराष्ट्रातील तमाम जनतेला माहिती आहे. बीजेपीच्या नगरसेवकानेच या प्रकरणात सुपारी घेतली होती. त्यामुळे उगीच पक्षाच्या संदर्भात चर्चा करु नका अशी माझी विनंती आहे. माननीय मुख्यमंत्री, तत्कालीन गृहमंत्री आता सभागृहात उपस्थित नाहीत त्यांच्या बद्दल अशा प्रकारे बोलणे योग्य नाही. या ठिकाणी कायदा आणि सुव्यवस्थेच्या संदर्भात चर्चा सुरु आहे. काल नाशिक शहरातील सिडको भागात जवळपास 50 मोटरसायकलींना आगी लावण्यात आलेल्या आहेत. या मोटर सायकली कामगारांच्या होत्या. दहा दिवसापूर्वी नाशिकमध्ये एका पोलिसावर हल्ला करण्यात आला होता. या पोलिसाला आता दवाखान्यात भरती करण्यात आलेले आहे. त्यामुळे यासंदर्भात माझी विनंती आहे की, या प्रकरणात जे गुन्हेगार आहेत त्यांच्यावर कडक कारवाई झाली पाहिजे एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

-----------------

...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. वसंत पवार ( नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, कायदा आणि सुव्यवस्थेच्या संदर्भात या ठिकाणी चर्चा सुरु आहे. काल रात्री 3-4 वाजेच्या सुमारास 34 कामगारांच्या मोटारसायकलींना त्यांच्याच गाडीतील पेट्रोल काढून आगी लावण्यात आल्या. नाशिक शहरातील सिडकोच्या परिसरात रात्रीच्या गस्तीची जबाबदारी ज्यांच्यावर होती त्यांना यासंदर्भात मी जाब विचारला होता. एवढया मोठया प्रणात मोटरसायकलींना जेव्हा आगी लावण्यात येतात त्यावेळेस त्या ठिकाणच्या गस्तीवरील पोलीस नेमके काय करीत होते ? त्यामुळे नाशिक शहरातील ज्या 34 कामगारांच्या मोटरसायकलींना आगी लावण्यात आल्या त्यासंदर्भात माननीय गृहमंत्र्यांनी चौकशीचे आदेश द्यावेत अशी विनंती करतो.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ MMP/ SBT/ KGS/ प्रथम श्री.जुन्नरे 17=05

डॉ.वसंत पवार ..

दुसरी गोष्ट अशी आहे की , पत्रकार संघटनेचे अध्यक्ष श्री. अनिल ठाकरे यांचा खून झाला होता परंतु त्याच्या मारेक-यांना पोलिसांनी पकडल्याबद्दल मी पोलिसांना धन्यवाद देतो.

श्री.विनोद तावडे :.हा जर महत्वाचा विषय असेल तर सकाळी तुम्ही नोटीस का दिली नाही.?

डॉ.वसंत पवार : मी नोटीस दिली होती परंतु त्याची तुम्हाला माहिती नाही. ही नोटीस तुम्हाला देण्याची गरज नाही. मी माननीय सभापती महोदयांना नोटीस दिलेली असल्यामुळे त्याबाबतीत तुम्ही त्यांना विचारावे.

सभापती महोदय, यानंतर मला हद्दपारीच्या केसेसच्या बाबतीत असे सांगावयाचे आहे की, मुंबईतून हद्दपार झालेल्या व्यक्ती नाशिकमध्ये आल्या आहेत की काय व त्यामुळे नाशिकमधील गुन्हेगारी वाढली आहे काय याबद्दल मला श्ंका वाटते. माननीय गृह मंत्र्यांना माझी अशी विनंती आहे की, नाशिकमधील हद्दपार करण्यासंबंधीची जी प्रकरणे मंत्रालयात मंजुरीसाठी आली होती यापैकी किती प्रकरणे राजकीय दबावाखाली रद्द करण्यात आली आणि हददपारीचा निर्णय रद्द झाला होता याचा तपशील माननीय गृह मंत्र्यांनी सभागृहाच्या पटलावर ठेवावा तसेच नाशिकच्या कायदा व सुव्यवस्थेची स्थिती चांगली ठेवावी अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG

श्री.नितीन राऊत ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, आज या ठिकाणी डॉ. पदमसिंह पाटील खासदार यांना दिनांक 6 जून 2009 रोजी ..

श्री.दिवाकर रावते : ते कोणत्या पक्षाचे आहेत हे सांगावे. कारण हा डिसक्वालिफिकेशनचा विषय आहे.

श्री.नितीन राऊत :सभापती महोदय, या ठिकाणी कायदा व सुव्यवस्थेसंबंधी चर्चा झाली असून त्याला उत्तर देण्याकरता मी उभा आहे तेव्हा आपण मला संरक्षण द्यावे.

सभापती महोदय, या ठिकाणी कायदा व सुव्यवस्थेच्या संदर्भात अत्यंत चांगल्या प्रकारची चर्चा झाली आहे. या चर्चेत ज्या सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला त्यांची नावे मी नंतर सांगणारच आहे परंतु प्रथम मला हे सांगावयाचे आहे की, दिनांक 6 जून 2009 रोजी खासदार डॉ पदमसिंह पाटील यांना सी.बीआय.ने पवनराजे निंबाळकर यांच्या हत्येच्या प्रकरणात अटक केल्यानंतर दिनांक 7 जून 2009 रोजी या संदर्भात डॉ. पदमसिंह पाटील यांच्या समर्थकाकडून एस.टी.बसेसवर दगडफेकी सारख्या घटना घडल्या आहेत. तसेच शिवसेनेच्या वतीने डॉ. पदमसिंह पाटील यांना वरील प्रमाणे अटक झाल्याने त्यांच्या खासदारकीच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी दोन ठिकाणी रास्ता रोको आंदोलनाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावरुन कायदा व सुव्यवस्थेला जो धोका निर्माण झाला होता त्याची माहिती देण्यासाठी मी येथे उभा आहे.

सभापती महोदय, उस्मानाबाद शहरात दिनांक 7.6.2009 रोजी सकाळी 8 ते 8.50 च्या दरम्यान बांगड ऑईल मिल ते ताजमहाल टॉकीजच्या दरम्यान एस.टी.बस क्रमांक एमएच-20-डी-4338,4702 व 6075 या तीन एस.टी.बसेसवर 20 ते 25 व्यक्तिंच्या जमावाने मोटार सायकलवर येऊन दगडफेक करण्यात आल्याने बसच्या काचा फुटल्याने तीन्ही बसचे मिळून 2000 रुपयांचे नुकसान झाले आहे व यामध्ये एका एस.टी.बसचा ड्रायव्हर काच लागून किरकोळ जखमी झाल्याने या बाबत पोलीस स्टेशन उस्मानाबाद (शहर) येथे गु.र.नं.122/2009 कलम 143,149,341,336,337,427 भा.दं.वि.3,5 सार्वजनिक मालमत्ता नुकसान प्रतिबंधक कायदा 135 मु.पो.का व 7 क्रिमिनल लॉ अमैन्डमेन्ट अन्वये गुन्हा दाखल झाला आहे.

नंतर श्री.सरफरे

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन राऊत...

सभापती महोदय, दुसरी दगडफेकीची घटना 08.50 वा. ज्ञानेश्वर मंदिर, उस्मानाबाद समोर 10 ते 15 जणांच्या गटाने एस.टी.बस क्रमांक एमएच-20-डी-6247 व 6911 या दोन एस.टी. बसेसवर दगडफेक करुन काचा फोडून 4000/- रु. चे नुकसान केल्याने त्याबाबत पो.स्टे. उस्मानाबाद (शहर) येथे गु.र. नं 123/2009 कलम 143, 147, 149, 341, 336, 427 भा.दं.वि. 3,5 सार्वजनिक मालमत्ता नुकसान प्रतिबंधक कायदा, 135 मु. पो.का. व 7 क्रिमिनल लॉ अमेंडमेंट ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल झाला आहे.

तिसरी घटना 08.40 ते 08.50 वा. च्या दरम्यान नगर परिषद उस्मानाबाद समोर 10 ते 15 जणांच्या गटाने आयबीएन लोकमत वृत्त वाहिनीच्या वाहनांवर दगडफेक करुन गाडीच्या काचा फोडून 1,00,000/- रु. चे नुकसान केले व या मध्ये सदर गाडीचा चालक किरकोळ जखमी झाला आहे. या संदर्भात पो. स्टे. उस्मानाबाद (शहर) येथे 124/2009 कलम 143, 147, 149, 336, 337, 427 भा.दं.वि. 135 मुं.पो.का. व 7 क्रिमिनल लॉ अमेंडमेंट ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल झाला आहे.

वरील नमूद तिन्हीही गुन्हयातील आरोपींचा एकच गट असून त्यांनी मोटार सायकलवर येऊन सदर वाहनांवर दगडफेक केल्याचे निष्पन्न झाले आहे. त्या संदर्भात 1 आरोपींना अटक करण्यात आलेली आहे.

पोलीस स्टेशन शिराढोण हद्दीमध्ये शिराढोण टी पॉईंट येथे 11.00 वा. 04 जणांनी दोन मोटार सायकलवर येऊन एस.टी.बस क्रमांक एमएच-20-डी-7078 यावर दगडफेक केल्याने बसच्या काचा फुटून 15,000/- रु. चे नुकसान झाले आहे. या बाबत पो. स्टे. शिराढोण येथे गु.र.नं. 52/2009 कलम 341, 336, 427, 34 भा.दं.वि. 3,5 सार्वजनिक मालमत्ता नुकसान प्रतिबंधक कायदा, 7 क्रिमिनल लॉ अमेंडमेंट ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल झाला असून सदर गुन्हयातील तीन आरोपीतांना अटक करण्यात आलेली आहे.

उमरगा शहर येथे शिवसेना व भ्रष्टाचार निर्मूलन समितीच्या 25 ते 30 कार्यकर्त्यांनी शिवसेना आमदार श्री. रविंद्र गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली 12.00 ते 12.30 वा. दरम्यान राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 9, अशोक चौक उमरगा येथे डॉ. पद्मसिंह पाटील यांच्या खासदारकीच्या पदाचा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. नितीन राऊत...

राजीनामा मागण्यासाठी जिल्हा दंडाधिकारी उस्मानाबाद यांच्या बंदी आदेशाचे उल्लंघन करुन रास्ता रोको आंदोलन केले. या बाबत पो. स्टेशन उमरगा येथे गु.र. नं. 89/2009 कलम 341, 143 भा.दं.वि. व 135 मु.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी अटक नाहीत.

शिवसेनेच्या वतीने नळदुर्ग एस.टी. स्टँड समोर 18.00 वा. जिल्हा उप प्रमुख श्री. कमलाकर चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली रास्ता रोकोचे आयोजन हे डॉ. पद्मसिंह पाटील यांच्या खासदारकीच्या पदाच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी करण्यात आले होते. सदर वेळी शिवसेनेचे 7-8 कार्यकर्ते उपस्थित होते. परंतु ऐन वेळी रास्ता रोको आंदोलन रद्द करुन आंदोलकांनी, आंदोलनाच्या ठिकाणी नायब तहसीलदार यांना निवेदन दिले.

या सोबत वरील नमूद असलेल्या गुन्हयांबाबतची माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

सभापती महोदय, याठिकाणी कायदा व सुव्यवस्थेच्या प्रश्नासंबंधी सभागृहाचे सन्माननीय ज्येष्ठ सदस्य व भाजपाचे प्रदेशाध्यक्ष श्री. नितीन गडकरी साहेबांनी महाराष्ट्र शासनाने श्री. पवन राजे निंबाळकर यांचे हत्त्या प्रकरण दाबण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणाला तीन वर्षे होऊन देखील तपास केला नाही अशी माहिती त्यांनी दिली.

(यानंतर सौ.रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन राऊत . . ..

सभापती महोदय, मी आपणास सांगू इच्छितो की, यासंबंधात ज्या आरोपींना पकडण्यात आले आहे, त्यांना देखील महाराष्ट्र शासनाच्या पोलिसांनीच पकडलेले आहे. परंतु याचा तपास सी.बी.आय.कडे असल्यामुळे त्यांच्याकडे त्या आरोपींना सुपूर्द करण्यात आले आहे.

सभापती महोदय, याठिकाणी माननीय श्री.अण्णा हजारे यांच्या हत्त्येच्या शडयंत्रासंबंधी माननीय गृहमंत्र्यांनी काय केले किंवा सरकारने काय केले ? असे प्रश्न उपस्थित करण्यात आले. याबाबतीत सांगावयाचे तर सरकारने संपूर्ण नि:पक्षपातीपणाने या प्रकरणाची छाननी करुन, त्याची माहिती सी.बी.आय.कडे दिलेली आहे.

सभापती महोदय, याठिकाणी सर्वश्री.दिवाकर रावते, कपिल पाटील, ॲड.गुरुनाथ कुलकर्णी, सर्वश्री.परशुराम उपरकर, मधुकर चव्हाण, डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री. विनोद तावडे, जयप्रकाश छाजेड आणि डॉ.वसंत पवार यांनी आपले विचार मांडलेले आहेत. मी एवढेच सांगू इच्छितो की, या संपूर्ण प्रकरणामध्ये राज्यात कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या कामामध्ये सरकारने योग्य ती पावले उचलली आहेत आणि योग्य ती खबरदारी घेतलेली आहे. अशा प्रकारे राज्यामध्ये शांतता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केलेला आहे. एवढेच मला सांगावयाचे आहे.

-----

. . . .3 के-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम उभे राहून बोलतात.)

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आम्ही माननीय मंत्री महोदयांचे उत्तर शांतपणे ऐकलेले आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी दिलेले उत्तर आपल्याला मान्य आहे काय ?

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, सरकारने या प्रकरणाच्या बाबतीत काय दिवे लावलेले आहेत, ते सांगितलेले नाही.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, कार्यकर्त्यांना कोणत्या कलमाखाली अटक केली ? ते सांगितले. संबंधित खासदारानां कोणत्या कलमाखाली अटक केली ते सांगितलेले नाही. . . .

**उपसभापती** : आता या विषयावरील चर्चा पूर्ण झालेली आहे.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात व नंतर माननीय उप सभापतींच्या आसनाजवळ जातात.)

**उपसभापती** : आता माननीय वित्त मंत्र्यांनी आजच्या कामकाज पत्रिकेवर दाखविण्यात आलेला अनु.क्र.6 वरील प्रस्ताव मांडावा.

(गोंधळ)

. . . .3 के-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



APR/ 17:15

**पृ.शी.**: नियम स्थगित ठेवणे

**मु.शी.**: नियम स्थगित करण्याबाबत वित्त मंत्र्यांचा पस्ताव

डॉ.सुनील देशमुख (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र विधान परिषद नियम 289 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो :-

"महाराष्ट्र विधान परिषद नियमातील नियम 228 (1) मधील सात दिवसांच्या कालावधी बाबतची तरतूद सन 2009-2010 च्या अतिरिक्त अर्थसंकल्पावरील चर्चेच्या संदर्भात स्थगित करण्यात यावी."

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

(गोंधळ)

**उपसभापती** : मी आता सभागृहाचे कामकाज 5 वाजून 30 मिनिटांपर्यंत स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक 5 वाजून 18 मिनिटांनी, 5 वाजून 30 मिनिटांपर्यंत स्थगित झाली.)

----

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगिती नंतर )**

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. हेमंत टकले )**

**पृ.शी.**: अतिरिक्त अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा.

**मु.शी.**: सन 2009-2010 च्या अतिरिक्त अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा.

**तालिका सभापती** :आजपासून अतिरिक्त अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेस प्रारंभ होईल.

( विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात )

**तालिका सभापती** : आजपासून अतिरिक्त अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेस प्रारंभ होईल. ही चर्चा दिनांक 8 व दि.9 जून, 2009 अशी एकूण दोन दिवस होणार आहे. चर्चेसाठी एकूण जो वेळ उपलब्ध होईल त्यापैकी वित्त मंत्र्यांच्या उत्तरासाठी असलेला एक तास जमेस धरुन निम्मा वेळ सत्ताधारी पक्षांच्या सदस्यांकरिता आणि निम्मा वेळ व विरोधी पक्षाचे सदस्य व स्वतंत्र सदस्य यांना देण्यात येईल. या चर्चेत भाग घ्यावयाचा घ्यावयाचा असेल त्यांनी आपली नावे व ते ज्या तारखेस बोलू इच्छितात ती तारीख आपल्या प्रतोदांमार्फत माझ्याकडे त्वरित पाठवावी.

( विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात )

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य ॲड. गुरुनाथ कुलकर्णी यांनी आपले भाषझ सुरु करावे.

( विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य माननीय तालिका सभापतीच्या आसनाजवळ जाऊन घोषणा देतात )

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : अशा परिस्थितीत सभागृहाचे कामकाज करणे मला अशक्य असल्यामुळे मी सभागृहाचे कामकाज 15 मिनिटांसाठी तहकूब करीत आहे.

( सभागृहाची बैठक सायंकाळी 5.32 ते 5.51 पर्यंत तहकूब झाली. )

यानंतर श्री. बरवड....

अशुध्दित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

( स्थगितीनंतर )

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. हेमंत टकले )**

( माननीय तालिका सभापती स्थानापन्न होताच विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य त्यांच्या आसनासमोर एकत्र जमून घोषणा देण्यास सुरुवात करतात )

**तालिका सभापती** ( श्री. हेमंत टकले ) : आता अर्थसंकल्पावरील चर्चेला सुरुवात होईल. सन्माननीय सदस्य ॲड. गुरुनाथ कुलकर्णी यांनी आपले भाषण सुरु करावे.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माझी आपल्याला विनंती आहे की, आपण विरोधी पक्षाच्या सर्व सन्माननीय सदस्यांना पोडियमवरुन खाली येण्यास सांगावे.

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य घोषणा देत असतात )

**तालिका सभापती** : सभागृहाची बैठक दहा मिनिटांकरिता स्थगित करण्यात येत आहे.

( सभागृहाची बैठक सायंकाळी 5.53 ते 6.03 वाजेपर्यंत स्थगित झाली )

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

( विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य आपापल्या जागा सोडून घोषणा देत असतात.)

**उपसभापती** : सर्व सन्माननीय सदस्यांनी कृपया आपले आसन ग्रहण करावे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या सदनाचे सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब यांना वाकोला पोलीस स्टेशनमध्ये अटक झालेली आहे. रिलायन्स कंपनीने विजेची दरवाढ केल्यामुळे शिवसेनेच्यावतीने तेथे मोर्चा गेला होता. त्याचे नेतृत्व सन्माननीय सदस्य ॲड.परब करीत होते. या मोर्चाचे शिष्टमंडळ इमारतीमध्ये वर संबंधितांना भेटण्यासाठी गेले होते. खाली जे निदर्शक बसले होते त्यात महिला सुध्दा होत्या. आता सुपारीचे देणाऱ्यांचेच राज्य आहे. सुपारी घेणाऱ्यांनी बहुतेक अंबानी यांची सुपारी घेतली असावी. त्याठिकाणी कोणताही अनुसूचित प्रकार घडलेला नव्हता, प्रक्षोभक परिस्थिती निर्माण झालेली नव्हती. काहीही भानगड उद्‌भवलेली नव्हती. निदर्शक खोली घोषणा देत होते. पोलिसांना त्याचा एकदम राग आला. शिष्टमंडळ रिलायन्सच्या अधिका-यांना भेटून खाली येत असताना पोलिसांनी महिलांवर प्रचंड लाठीमार सुरु केला, त्यामुळे काही महिला जखमी झालेल्या आहेत. या विधिमंडळामध्ये कायदा व सुव्यवस्थेवर चर्चा चालू असताना पोलिसांची गुंडगिरी चालू आहे त्याचा कसा निषेध करावयाचा असा प्रश्न निर्माण झाला आहे. आता त्यांना घेराव घालण्यात आलेला आहे. ज्या पोलिसांनी या महिलांवर लाठीमार केलेला संबंधितांना ताबडतोब निलंबित करण्यात यावे अशी मी मागणी करतो आणि त्याबाबतचे या सदनात निवेदन जर आता करणे शक्य असेल तर आता करावे किंवा उद्या तातडीने निवेदन करण्यात यावे. ज्या पोलीस अधिका-यांनी महिलांवर लाठीमार करुन अत्याचार करण्याचा प्रयत्न केला आहे त्यांना ताबडतोब निलंब करावे अशी मी आपल्यामार्फत शासनाला विनंती करतो.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी आता व्यक्त केलेले विचार विचारात घेऊन सन्माननीय गृह राज्यमंत्र्यांना माहिती घेण्यासाठी किमान एक तासाचा अवधी तरी लागेल. तोपर्यंत सभागृहाचे कामकाज सुरु ठेवावयाचे किंवा कसे याबाबतचा निर्णय घेऊ.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, कारण नसताना निदर्शन करणा-या महिलांवर लाठीमार करण्यात आलेला आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : शासनाला या प्रकरणी निवेदन करायला सांगा.

डॉ. दीपक सावंत : अधिका-याला आजच्या आज निलंबित करा.

**उपसभापती** : या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांनी जी घटना सभागृहामध्ये नमूद केली त्याची रीतसर चौकशी करुन त्या संदर्भात जी काही कार्यवाही किंवा कारवाई करायची ती त्यांनी करावी...

श्री. दिवाकर रावते : संबंधित पोलिस अधिका-याला निलंबित करावे..

**उपसभापती** : या प्रकरणी चौकशी करुन योग्य ती कारवाई करावी.

श्री. दिवाकर रावते : माननीय राज्यमंत्री महोदय श्री. नितीन राऊत हे म्हणतील की माझ्याकडे गृह (ग्रामीण)चा कार्यभार आहे. गृह (शहरे)चा कार्यभार दुस-या राज्यमंत्री महोदयांकडे आहे.

**उपसभापती** : ते शासनाच्यावतीने उत्तर देत आहेत.

श्री. नितीन राऊत : उपसभापती महोदय, आपण दिलेल्या निर्देशाचे पालन होईल.

**उपसभापती** : मी सन्माननीय सदस्यांना विनंती करतो....

श्री. दिवाकर रावते : ...हा विषय वेगळा आहे आणि मघाचचा विषय वेगळा आहे.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांच्या भावना फारच तीव्र झालेल्या आहेत. सभागृहाची बैठक उद्या सकाळी 10.00 वाजता भरेल...

श्री. पांडुरंग फुंडकर : सकाळी 10.00 वाजण्याच्या ऐवजी नियमित बैठक सकाळी 11.00वा. सुरु करावी.

**उपसभापती** : परिस्थिती अशी आहे की, तुम्ही सर्व सन्माननीय सदस्य प्रश्न सुरु झाला किंवा आणखी काही प्रसंग आला की सभापतींकडे संरक्षण मागता. मी आपल्या दहशतीखाली काम करतो. आता मला या प्रसंगी संरक्षण द्या असे म्हणण्याची वेळ आलेली आहे.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : बाहेरगावचे सन्माननीय सदस्य आमदार निवासामध्ये राहातात. परंतु मुंबईतील अनेक सन्माननीय सदस्यांना कोणाला भांडूपहून तर कोणाला विलेपार्ल्याहून तर कोणाला चेंबूरहून सकाळी येथे येण्यासाठी ट्राफिकमुळे दोन दोन तास लागतात. म्हणून सभागृहाची बैठक सकाळी 11.00 वाजता ठेवावी असे आपण ठरविले होते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2..

**उपसभापती** : ठीक आहे. सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या मंगळवार, दिनांक 9.6.2009 रोजी सकाळी 11.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 6 वाजून 7 मिनिटांनी मंगळवार, दिनांक 9 जून 2009 रोजीच्या सकाळी 11.00 वाजेपर्यन्त स्थगित झाली.)

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही